
# माणूस

शनिवार २५ मार्च १९७८
७५ पैसे



आदिवासींच्या
कल्याणासाठी
स्वतंत्र
जिल्हा
हवा.

पृष्ठ...६



राजधानी दिल्ली
दलित पँथर्सचे
भट्टा
मजदूर
आंदोलन

पृष्ठ...१

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सतरावे-अंक त्रेचाळीस
२५ मार्च १९७८
मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४४३४५९
¤

# विधायक कामातून पक्षसंघटन

निळू दामले

माजगावकरांनी अेका चांगल्या प्रश्नाला वाचा फोडलेली आहे. (संदर्भ : माणूस दि. १८ मार्चच्या अंकातील संपादकीय लेख) — जनता पक्षाने आज किमानपक्षी राज्याच्या स्तरावर आपल्या भविष्याचा नीटपणे विचार करायला हवा. लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाला मिळालेला विजय म्हणजे अेका लाटेचा विजय होता, कार्यकर्त्यांच्या त्यागाला दिलेली ती पावती होती. पण लाटेने समाजाची बांधणी होत नसते! समाजात परिवर्तन घडविण्यास हवा उपयोगी पडत नसते, त्यासाठी मेहनत करावी लागते. कार्यकर्त्यांच्या त्यागाचीही तीच कथा. एकदा त्यागाचे बी पेरले की अेकदाच त्याचे पीक येणार. खोडवा घेतला तर फार तर विधानसभेचे पीक घेता येते, पण केवळ अेक वेळच्या त्यागावर नवा समाज उभा राहत नाही. कोण्या अेके काळी लोकांनी स्वातंत्र्यासाठी त्याग केला, पण नंतर काय झालं? आपण सोसतो आहोतच. जनता पक्षाने त्या गोष्टीची पुनरावृत्ती करू नये.

कॉंग्रेसला सत्तेमधून घालविणे आवश्यक होते ते खरे आहे; पण त्यापायी जनता पक्षानेही कॉंग्रेससारखे वागण्याला सुरुवात करावी असा तर अर्थ होत नाही? राजकारण म्हटले, सत्ता म्हटली की तडजोडी आल्याचे हे आता सामान्य माणसालाही कळते; पण तडजोडींचे प्रमाण अेकंदर व्यवहारात किती असायला हवं? ज्यांच्या राजकीय चरित्राबद्दल शंख करण्यात हयात गेली, त्यांच्या सत्तेचे दंडुके पाठीवर झेलण्यात उभे राजकीय आयुष्य खर्ची पडले अशांशी सोयरीक करून जनसामान्यांचे राजकारण करता येईल असे म्हणवत नाही. ज्या भ्रष्टांना थारा दिला आहे त्यांच्याच कलाने राजकारण करावे लागत असते हे जनता नेत्यांना माहीत नाही असे म्हणवत नाही, पण अनेक अनाकलनीय कारणांसाठी सत्ताग्रहण करणे व त्यासाठी नको ते उद्योग जनता पक्ष करीत आहे. जनता पक्षातली बव्हंशी जुन्या विरोधी पक्षातली मंडळी स्वार्थासाठी, सत्तेच्या भ्रष्ट मोहापायी हे राजकारण करीत आहेत असे कोणी म्हणणार नाही. त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्याला वाटते की, भलत्याच आशावादापाठी जनता पक्ष लागला आहे. कदाचित्त असेही म्हणता येईल की वेगानं बदलणाऱ्या प्रवाहात कसे हात मारावे याबाबत जनता पक्षाच्या नेतृत्वात गोंधळ आहे, काम करावे कसे याचे नेमके आकलन त्यांना होत नसावे.

विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाला मिळालेल्या कमी जागांसाठी अनेक कारणे सांगता येतील; पण त्यातले प्रमुख कारण जनता पक्षाजवळ चांगले संघटन नाही, राज्य करायला निघण्याचे वेळी कार्यकर्त्यांची फळी नाही हे आहे. संघटना नव्हती म्हणून उमेदवार सापडले नाहीत. उमेदवार नव्हते म्हणून मारामाऱ्या, बेबनाव, रुसवे-फुगवे वगैरे झाले. संघटनाबांधणी वर्षभराच्या काळात अगदीच अशक्य होती काय? जनता पक्षाने वर्षभराचा काळ नीटपणे वापरून घेतला नाही असेच म्हणावे लागते. निवडणुका होत्या, बाकीची कामे पडली होती वगैरे कारणे कितीही खरी—खोटी असली तरी कार्यक्रमांच्या द्वारे संघटना उभी करणे पक्षाला जमले नाही ही गोष्ट खरी आहे.

आता मागच्या गोष्टी विसरून पुढला विचार तरी केला जायला हवा.

दोन स्तरांवर पुढचा विचार करता येऊ शकतो. माजगावकरांनी लोहियावाद्यांच्या नकारात्मक भूमिकेचा उल्लेख केला आहे. केवळ नकारात्मक भूमिका घेऊन चालणार नाही, तर त्याला विधायक कार्याचीही जोड द्यावी लागेल असे माजगावकरांना अभिप्रेत असावे. खुद्द लोहियाही जेल, मतपेटी आणि फावडे अशीच त्रिसूत्री कायम सांगत आले

पृष्ठ २३ वर

# येथे दलित पँथर्सने एक चांगली संघटना बांधली आहे

निशिकांत भालेराव, नवी दिल्ली

माणसाच्या आयुष्याची किंमत काय ?

फक्त दोनशे रुपये !

तुमच्या–आमच्या अंगावरून कोणी ट्रक नेऊन ठार मारले व घरच्यांना २०० रुपये महिना देतो, गप्प बसा असे सांगितले तर कसे वाटेल ?

नुसत्या कल्पनेने अंगावर शहारे यावेत अशी ही घटना आपल्याला वाटते.

पण विटांच्या भट्ट्यात काम करणाऱ्या मजुरांना आता हे सारे नित्याचेच झाले आहे. भट्ट्यांमध्ये काम करताना अंगावर चिमणी पडून जेव्हा एखादा कामगार कोसळतो तेव्हा अत्यंत थंडपणे भट्ट्यांचा मालक हुकूम सोडतो. 'अरे, बघता काय ? सुटलाय ना तो ? टाका त्याला भट्टीत ! जळणाचा खर्च वाचवा रे !' असे म्हणून आधीच जळलेल्या मजुराला चार-पाच जण मिळून ज्या विटा त्यांनी हातांनी बनविलेल्या असतात त्या विटांच्या तप्त भट्टीत फेकले जाते. रक्ताच्या ज्वालांनी विटा भाजून निघतात !

सर्व जण मुर्दाड होऊन बघतात.

चांदपूर येथील विटांची एक भट्टी. मालकाचे नाव हरिकिसन. साधारणपणे २०० मजूर भट्टीत कामाला आहेत. आपल्या बांधवांची स्थिती सुधारण्यासाठी काही करावे असे एका मजुराला वाटते. त्याचे नाव रूपसिंग. भट्टीत संप घडतो. २७ फेब्रुवारी. संपाचा १० वा दिवस. मालक नुकसान होतंय म्हणून आदळआपट करतो. रूपसिंगला जबरदस्तीने कामावर नेण्याचा प्रयत्न होतो. कोणीच जुमानत नाही. पोटात अन्नाचा कण नसताना उद्याची चिंता करीत रूपसिंग भट्टीजवळच झोपतो. विटा वाहून नेण्याचा ट्रक येतो. ड्रायव्हरचे नाव विश्वंभर. तो ड्यूटी संपली म्हणून गाडी थांबवितो. तेवढ्यात मालकाचा मुलगा येतो. त्याचे नाव नरेश. मला चावी दे म्हणून विश्वंभरकडून गाडीची चावी घेतली जाते. भट्टीचा मालक होण्याची स्वप्ने पाहणारा नरेश ट्रक चालू करतो. ट्रक मागे वळतो. भरधाव निघालेला ट्रक भविष्य नसताना स्वप्ने पाहणाऱ्या रूपसिंगच्या अंगावर चढतो. खेळ खलास ! आजूबाजूचे कामगार नरेशसाहेबाला पकडतात. आता आपली धडगत नाही असे मालक जाणतो. उपस्थित मजुरांना विश्वंभर गाडी चालवत होता असे सांगण्यासाठी मालक दडपण आणतो. उपयोग होत नाही. मयताच्या म्हणजे रूपसिंगच्या बायकोकडे मालक जातो. आम्हाला तुझा नवरा मेल्याबद्दल दुःख वाटते. तुला तुझ्या आयुष्याच्या अखेरपर्यंत २००. रुपये देतो; पण तू पोलिसात जाऊ नकोस ! असे म्हणून तिच्यासमोर पैसे फेकले जातात. आपल्या नवऱ्याच्या जीवनाची किंमत २०० रुपये लावली जातेय. उद्या आपल्या २ पोरांना आपण काय खाऊ घालणार ? गरिबांना कधी भविष्य असते काय ? असे प्रश्न मनात घोळवून रूपसिंगची विधवा बायको प्रेमवती, मालकाला काहीच बोलत नाही. शेवटी पोलिसकेस होतेच; परंतु नरेशवर निष्काळजीपणामुळे गाडी हाकण्याचे ३०४ कलम लावलेले असते. ३०२ च्याऐवजी ३०४ फक्त आकड्यांचा फरक. आयुष्याचे गणित न सोडविता आलेल्या प्रेमवतीला हे आकडे कोण समजवणार ?

—ही सारी हकीगत रूपसिंगची बायको प्रेमवती आपला चेहरा न दाखविता गेल्या ५ दिवसांपासून दिल्लीतील प्रत्येक माणसाला सांगत आहे. बीरसिंग नावाचा ३ वर्षांचा तिचा पोऱ्या आज सर्वांपुढे हात पसरतोय. अशा किती तरी अत्याचारांच्या घटना १५ फेब्रुवारीपासून उजेडात येत आहेत. दिल्ली व आसपासच्या ३०० विटांच्या भट्ट्यांतील मजुरांचा गेल्या २० दिवसांपासून संप सुरू झालाय. राष्ट्रपतीभवनाच्या समोरच हिरव्यागार बोटक्लबच्या हिरवळीवर १० दिवसांपासून ४ हजार मजूर आपला उघडानागडा संसार मांडून बसलेत. हा संघर्ष दिल्ली दलित पँथरने सुरू केलाय.

दलित पँथर ह्या संघटनेविषयी नव्याने सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्रापुरते पँथरचे अस्तित्व आता पंजाब, ओरिसा व उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी पसरले आहे, आणि खास सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे भारताच्या राजधानीत पँथरनी एक चांगल्यापैकी संघटना बांधली आहे. माझे स्वतःचे पँथरविषयी मतभेद असले तरी एक गोष्ट मान्यच करावी लागेल की महाराष्ट्रातील दलित पँथरपेक्षा येथील पँथरची संघटना अधिक कार्यक्षम, जातीच्या पलीकडे जाऊन आंबेडकरवादाला मानणारी आहे. जनकपुरी नावाच्या भागात एक कार्यालय असून दिल्लीच्या इतर भागात नुकत्याच दोन शाखा स्थापण्यात आल्या आहेत. महिन्याच्या अंतराने 'युग उत्पीडन' नावाची एक पत्रिका हिंदीतून चांगल्या प्रकारे काढली जाते. अॅड बाबुराव पारखिडे नावाचा ३० वर्षांचा युवक मोठ्या जिद्दीने पँथरला राष्ट्रीय पातळीवर आणण्यात यशस्वी झालाय असे म्हणायला हरकत नाही.

तर सांगायचा मुद्दा असा की, ह्या पँथर्सनी खऱ्या अर्थाने शोषितांना बांधण्याचे जेव्हा ठरविले तेव्हा विटांच्या भट्ट्यात काम करणाऱ्या मजुरांचे हाल त्यांच्या लक्षात आले. भट्टा मजदूर यूनियन ह्या नावाखाली पँथरनी संघटना बांधण्याचे ठरविले. ह्या भट्ट्यांच्या कारभाराविषयी काही माहिती जाणून घेणे आवश्यक आहे. उत्तर व दक्षिण दिल्लीच्या आजूबाजूच्या भागात साधारणपणे ३०० भट्ट्या आहेत. शहाबाद, पूथकलान, बावाना, सतबडी, धीटोरनी, किसनगढ, डेरागाव, खानपूर ह्या ठिकाणी प्रामुख्याने ह्या भट्ट्यांचा उद्योग चालतो. ह्या सर्व भट्ट्यांमध्ये ४५ हजार मजदूर कामाला आहेत. ह्यामध्ये ५ वर्षांच्या लहान मुलापासून ते ७० वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत सर्वांचा समावेश आहे. एखाद्या कुटुंबातील कर्ता

पृष्ठ २४ वर

# चक्रम्चक्री ( ३१ )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# नेतृत्वाची झळाळी

चला. म्हणता म्हणता जनता पक्षाचे सरकार स्थापन होऊन एक वर्ष झाले. कोण उत्साह पसरला होता नाही, तेव्हा? रामलीला मैदानावर संध्याकाळी सभा झाली त्या वेळी जनसंमर्दाचे नव्या सरकारविषयीचे प्रेम आणि जुन्या राजवटीविषयीचा द्वेष ओसंडून वाहात होता. दिल्लीच्या रस्त्या–रस्त्यांतून 'मैं इटाली चली जाउंगी, तुम देखते रहियो!' अशी गाणी गात टारगट पोरांचे जथे हिंडत होते! जॉर्ज फर्नांडिस नि राजनारायण यांनी मंत्रिमंडळात सामील होण्याचे नाकारले तेव्हा चिडलेल्या जमावाने त्यांना घेराव घातला आणि मंत्री होऊ अशी कबुली मिळविली. साऱ्या एका वर्षापूर्वीच्या गोष्टी; पण किती तरी तपे उलटून गेल्यासारख्या वाटतात!

तर! जनताजनार्दनाच्या त्या विराट् स्वरूपाची स्मृति सुद्धा अंगावर रोमांच उभे करते. लोकांना आपले सगळ्याचेच कौतुक! मोरारजींची पक्षनेता म्हणून जयप्रकाश आणि कृपलानी यांनी निवड केली; फार पोक्त निवड केली म्हणून त्यांचे कौतुक! तर मधु लिमये वगैरेंनी ही निवड करताना लोकशाहीचे संकेत पाळले गेले नाहीत अशी टीका केली त्याचेही कौतुक! जॉर्ज फर्नांडिस आणि राजनारायण यांना जमवाने मंत्रिमंडळात सामील व्हावयाला भाग पाडले याचे कौतुक आणि मृणाल गोऱ्यांनी मंत्री व्हायचे नाकारले याचेही कौतुक! त्या एका सुभाषितात 'मुरारेः अखिलं मधुरं' असं म्हटलंय् ना, तशीच लोकांची स्थिती झाली होती. एका नव्या युगाची प्रभात होत आहे आणि त्या वेळी भूपाळी गाण्यात भाग घेण्याचे भाग्य आपल्याला लाभत आहे, अशी भावना सर्वत्र होती. अहो, आयुष्यभर आपल्या नास्तिकपणाचा अभिमान मिरविणाऱ्या आमच्या काही मित्रांनी सत्यनारायण देखील केले!

हुंऽ; नव्या युगांच्या अशा अनेक प्रभाता आल्या नि गेल्या! तांबडे फुटले म्हणून पाहायला जावे आणि तो सूर्य न ठरता मिणमिणती पणती ठेवलेला आकाशकंदील निघावा, अशी फसगतच नेहमी झाली! मला आठवते, ६७ साली बंगाल्यात कॉंग्रेसचा पराभव झाला आणि अजय मुखर्जींच्या नेतृत्वाखाली संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ आले. त्या वेळी कलकत्त्यात एक विराट् सभा भरली होती. तिचे वर्णन देऊन टाइम्सच्या वार्ताहराने म्हणले होते, 'एका नव्या युगाचा उदय झाला आहे, असे त्या अजस्र सभेवरून वाटत होते!' त्यानंतर बिचाऱ्या अजय मुखर्जींच्या नेतेपणाचे धिंडवडे निघाले. आज तर अजय मुखर्जी म्हणून कोणी होते, याची आठवणही फारशी कोणाला नसेल!

चालायचेच! युगारंभाचा आनंद हा क्षणजीवी असल्याने आपला युगान्ताचा खेदही क्षणभंगुरच असतो. त्यातून वर्तमानपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन अशी प्रचाराची साधने आणि ती वापरण्याचे कसब वाढीला लागल्यापासून दर अर्ध्या तासाने एक नवे युग जन्माला घालता येऊ लागले आहे आणि दर पाव तासाला इतिहासाला नवे वळण दिले जात आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षातला इतिहास इतका वाटोळा झाला आहे की, आपण पुनःपुनः त्याच त्याच ठिकाणी येतो आहोत, असे वाटते.

### ती ती पदे नित्य फिरोनि येती

हां, ते कसे काय? अशी नुसती चमकदार वाक्ये सोडून भागणार नाही. तुमचे म्हणणे पटवून द्या.

मी काही फार पूर्वीपर्यंत जात नाही. आपण ६६ सालापासूनच्या हकीकती पाहू. ६६–६७–६८ ही तीन्ही वर्षे अगदी भांबावल्यासारखी गेली. दुष्काळ, वाढती महागाई, संप, घेराव, डगमगती राज्यसरकारे, बंद पडलेली विद्यापीठे आणि तोल गेलेली तरुणाई असे त्याचे थोडक्यात वर्णन करता येईल. तुम्ही अजून तेव्हाची वर्तमानपत्रे पहा. बेकरी, टंचाई आणि बेशिस्त यांच्या वर्णनांनी त्यांचे रकाने भरलेले आढळतील. त्यानंतर ६९–७०–७१ ही तीन वर्षे तणातणी कमी झाल्यासारखी वाटते. बँकांचे राष्ट्रीयीकरण, श्रीमती गांधींचे वर्चस्व, बांगला देशाची लढाई यामुळे आपण कशासाठी तरी धडपडलो आणि ते साधून गेले अशी भावना निर्माण झाली. नंतर पुनः तीन वर्षे अंदाधुंदीची गेली. दुष्काळ पडले, कारखानदारी मंदावली, संप–बंद–घेराव यांचे महापूर पीक आले. राज्यसरकारे उलथण्यात आली, तरुणांची बंडखोरी हाताबाहेर गेली. त्यानंतर ७५–७६–७७ या वर्षांत आणीबाणीतल्या नियंत्रणामुळे म्हणा किंवा पाऊसपाणी व्यवस्थित होऊन परिस्थितीच सुधारली म्हणून म्हणा, 'सब कुछ ठीक है' अशी हवा पसरली. त्यानंतर गेल्या आठ–पंधरा दिवसांत फिरून सर्वत्र वैफल्य, निराशा आणि चीड यांचे उद्रेक ऐकू येत आहेत. नेहरूंच्या काळात देशात भावनात्मक ऐक्य निर्माण झाले पाहिजे अशी मोहीम होती, तिचा परिणाम म्हणूनच की काय गेल्या बारा वर्षांत आशा–निराशेच्या त्रैवार्षिक हेलकाव्यात देश अडकलेला दिसतो.

ते ठीक आहे, पण याच्याशी वर्तमानपत्रं, रेडिओ आणि टेलिव्हिजन यांचा कुठे संबंध येतो? तुमच्या म्हणण्याचा रोख असा दिसत होता की, इतिहासाला वळणे वगैरे काही लागत नसून या प्रचारमाध्यमांनी निर्माण केलेले ते भास आहेत आणि आता तुम्ही म्हणता की, दर तीन वर्षांनी आपल्या देशात आशा-निराशेची भरती ओहोटी चालू असते, म्हणून.

नीट समजावून सांगतो. ही भरती-ओहोटी तीन-तीन वर्षांच्या अंतराने येते हा निव्वळ योगायोग! मुद्दा असा आहे की, खरोखर असे काही आहे का, की काही काळ अनुभवलेली शांतता, वाढते उत्पादन, लोकांतला उत्साह अचानक लयाला जातो आणि बजबजपुरी माजते? असे असायचे काही कारण दिसत नाही. अर्थशास्त्रात ट्रेड सायकल्स म्हणजे तेजी-मंदीची चक्रें म्हणून एक भाग असतो. त्यात असे सांगतात की, अर्थव्यवस्थेत तेजी चालू असतानाच मंदीची बीजे पेरली जात असतात. तेजी एका विशिष्ट बिंदूपर्यंत पोचली की अर्थव्यवस्थेतील विकृती अनुभवाला येऊ लागतात आणि गाडे घरंगळायला

लागते. अर्थव्यवस्थेतील घटक एकमेकांशी इतके निगडित असतात की, ती व्यवस्था कोलमडायला लागल्यावर कोलमडणे चक्रवाढीने वाढत जाते, विकृती अधिकाधिक ताणल्या जातात. मंदीचा अंत्यबिंदू आला की, या विकृती पुन: आकसल्या जातात आणि अर्थव्यवस्थेचे रहाटगाडगे तेजीकडे वाटचाल करते. मला वाटते राजकारणात तसेच होत असावे. एखाद्या विशिष्ट नेतृत्वाची राजकारणावरील पकड घट्ट होत जाते. त्यामुळे राजकारणाचा समतोल ढळतो आणि त्या नेतृत्वातील तणाव वाढत जातात. राजकीय नेतृत्वाचा वचक कमी होऊ लागला की, परिस्थितीत कायमच असलेली बेबंदशाहीची बीजे प्रचारमाध्यमाद्वारे अधिक बटबटीत करून मांडली जातात. त्यामुळे नेतृत्वाची पकड आणखीच सैल होत जाते आणि राजकीय मंदी सुरू होते. मंदी नीचतम बिंदूला पोचली की, पुन: राजकारणावर मूळच्याच किंवा नव्या नेतृत्वाचे वर्चस्व सुरू होते. ताबडतोब प्रचारमाध्यमावर लगाम बसतो आणि राजकीय व्यवस्थेचे घरंगळणे थांबते. मला असे म्हणायचेय् की, परिस्थितीवर काबू बसविण्याची सवड प्रचारमाध्यमामुळे राजकीय नेत्यांना मिळेनाशी झाली आहे.

तुम्ही म्हणताय् तसे आहे खरे. प्रचारमाध्यमामुळे राजकीय नेतृत्वात जरा कुठे बोटचेपेपणा आढळला तरी ते नेतृत्व नि:सत्त्व झाल्याचा देखावा निर्माण करता येतो. समजा, पानपतच्या युद्धाच्या काळात वर्तमानपत्र असती तर मराठी सैन्य पानपतावर अडकले आहे असे कळताच इकडे पेशव्याच्या जागी दुसरा पेशवा आला असता! ते असो; पण यातून निष्कर्ष काय ?

## नेतृत्वाची झळाळी

निष्कर्ष असा की, प्रस्थापित नेतृत्वाने आपली राजकीय परिस्थितीवर पकड आहे याचा प्रत्यय जनतेला दर क्षणाला दिला पाहिजे. नाही तर ते नेतृत्व संपलेच म्हणून समजावे.

आज जशी हबकून गेल्यासारखी अवस्था जनता पक्षाची झाली आहे, तशी तर मुळीच होता कामा नये. गेल्या आठ-पंधरा दिवसांतली वर्तमानपत्रे पहा. जिकडे-तिकडे एकच काहूर माजून राहिले आहे. कोणी म्हणतात, साऱ्या दक्षिण भारताने जनता पक्षाकडे पाठ फिरविली आहे; कोणी म्हणतात, अल्पसंख्य जमाती जनता पक्षापासून दुरावत चालल्या आहेत; विद्यार्थी बेबंद बनत आहेत, संप पसरत आहेत, विद्यापीठे बंद पडत आहेत असा एकच गदारोळ उठविला आहे!

पण गमतीची गोष्ट अशी की, यातल्या बऱ्याच गोष्टी भ्रामक आहेत. दक्षिण भारताने जनता पक्षाकडे पाठ फिरविल्याचा वास 'केसरी'ला कितीही येवो, पण दक्षिण भारतात जनता पक्षाला जास्तच जागा मिळाल्या आहेत. किंमती वाढत चालल्याची हाकाटी वर्तमानपत्रांनी कितीही केली, तरी सरासरीने पाहता किंमती आटोक्यातच आहेत. अन्नधान्याची परिस्थिती समाधानकारक आहे. विद्यार्थ्यांचे दंगेधोपे हे कायमच चालू असतात. जनता पक्षाच्या राजवटीचे काही ते वैशिष्ट्य नव्हे!

याशिवाय जनता पक्षाच्या खात्यावर जमेच्या लक्षणीय बाबी आहेत, त्या वेगळ्याच! नव्या राजवटीत अधिक प्रामाणिकपणाने व मोकळेपणाने व्यवहार होत आहेत; परवाच्या निवडणुकांत देखील लोकांकडून वर्गणी जमा करून पक्षाने निवडणुका लढविल्या; लोकशाहीचे संकेत नको इतक्या काटेकोरपणाने पाळले जात असून ज्यांच्या अधिकारशाहीच्या प्रेमाविषयी यत्किंचितही संशय नाही अशा गटांनाही लोकशाही स्वातंत्र्य बिनतक्रार भोगू दिले जात आहे मग असे असून अल्पसंख्य गट जनता पक्षापासून पारखे होत आहेत, त्यांच्या एक–गठ्ठा मतांनी इंदिराबाई पुन: अधिकारावर येतील अशी भीती का ?

अल्पसंख्य गटांची एक–गठ्ठा मते कुणाला मिळतात? ती काही त्यांच्या कैवाऱ्यांनाच मिळतात असे नाही. तसे असते तर मुस्लिम लीग आणि रिपब्लिकन पक्ष यांना आजची अवकळा आलीच नसती! या गटांनी बहुतेक वेळा काँग्रेसला मते दिली ही खरी गोष्ट आहे; पण ती काही काँग्रेसविषयी आत्मीयता वाटल्याने नव्हे. कारण, तसे असते तर ६७ सालच्या निवडणुकांतही या जमाती काँग्रेसच्या बाजूने राहिल्या असत्या. शहरी मध्यमवर्ग व संघटित कामगार आणि खेड्यांतले सधन शेतकरी हा भारतीय राजकारणाचा गाभा आहे. या गाभ्यावर ज्या पक्षाचे प्रभुत्व असते त्या पक्षाला धरून अल्पसंख्य गट रहातात असा साधारण अनुभव आहे. तेव्हा आज जे वर्ग जनता-पक्षाच्या पाठीशी उभे आहेत, ते तसेच खंबीरपणाने राहिले तर बाईंची भीती बाळगायचे काही कारण नाही. आज जी भांबावल्यासारखी, गोंधळल्यासारखी अवस्था झाली आहे नि जनता पक्षाला पाठिंबा देणारी वृत्तपत्रेही धीर सोडल्यासारखे लेख छापीत आहेत त्याचे खरे कारण असे दिसते की, शहरी संघटित वर्गही जनता पक्षाची पाठराखणी सोडून देतील या आशंकेने ती व्यग्र झाली आहेत.

पण अशी शंका येण्याचे तरी काय कारण? विधानसभांच्या निवडणुकांत तरी शहरी भागातून जनता पक्षाला भरघोस मतदान झाले आहे.

शंकेला बळकट कारण हे आहे की, जनता पक्षाच्या नेतृत्वाने आपली परिस्थितीवर पकड आहे याचा प्रत्यय दिलेला नाही. असा प्रत्यय द्यायचा म्हणजे सत्ता आपण विशिष्ट हेतूंसाठी हिंमतीने वापरू शकतो हे दाखवून द्यायचे. गेल्या वर्षी सात राज्यांच्या विधानसभा बरखास्त करताना नव्या सरकारने ही हिंमत दाखविली; पण त्यानंतर मात्र सरकारची पकड सतत ढिलीच होत जाताना दिसते. इंदिरा गांधींची अटक व सुटका या प्रकरणात सरकारची फजितीच झाली! शहा आयोगावर बाईंनी बहिष्कार घातला तोही मुकाट सहन करावा लागला! महाराष्ट्र सरकारच्या नोकरांच्या संपात पंतप्रधान व खुद्द राष्ट्रपती यांनी केलेले संप संपविण्याचे आवाहनही वाया गेले. या ढिसाळपणाचा परिणाम म्हणून संघटित वर्गही पक्षापासून पराङ्मुख होईल अशी भीती वाटत चालली आहे. नेतृत्व कसे झळकणारे हवे; तेजाचा स्फुल्लिंग तेथे आहे असा विश्वास वाटायला हवा. नाही तर शेवटी सामान्य माणूस ज्या पक्षाजवळ तेजस्वी नेतृत्व आहे त्या पक्षाकडे धाव घेईल; मग ते नेतृत्व, ते तेज कोणत्या का हेतूसाठी वापरणारे असे ना! ही भीती आज सगळीकडे दाटून राहिली आहे.

पण जनता पक्षाकडे असे नेतृत्व देऊ शकेल अशी व्यक्ती कधी नव्हतीच म्हणून तुम्ही–आम्ही म्हणत होतो की, जनता पक्ष हा सामान्य माणसाचे व्यासपीठ होईल. तेथे मोकळी चर्चा होऊन निर्णय होतील. एकटा अलौकिक नेता नसला तरी संघटना तसे नेतृत्व देईल. त्या सगळ्या अपेक्षांचे काय झाले ?

खरी चिंतेची बाब तर हीच आहे. अशी संघटना निर्माण करण्यासाठी जे न्यूनतम नेतृत्वगुण लागतात त्यांचीही वाण भासत आहे. बाईंनी उभा केलेला भस्मासुर आणि जनताच्या घटक पक्षातील भांडणांपासून अलिप्त असणाऱ्या मंडळींचे दडपण या रेट्याखाली संघटना उभी राहते का, ते बघायचे. □

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## जनाब भुत्तो. . . सत्तेवरून सुळाकडे !

सत्तांतराची जी पद्धत पाकिस्तानमध्ये प्रचलित होती किंवा आहे तिचा आधार घेऊनच जनाब झुल्फिकार अलि भुत्तो सत्तेवर आले. बांगला देशामधील पराभवाचे सारे पाप पाकिस्तानचे त्या वेळचे सर्वेसर्वा याह्याखान यांच्या माथी मारून भुत्तो सत्तेवर आले. त्यांनी परिस्थितीच अशी निर्माण केली की, सत्ता त्यांच्या हाती देण्यावाचून याह्याखान यांना पर्याय राहू नये. सत्तेवर आल्यावर सत्ता आपल्या हातून जाऊ नये यासाठी सर्वच सत्ताधीश कमी–अधिक प्रमाणात धडपडतच असतात. भुत्तोही त्याला अपवाद नव्हते. आपले स्थान बळकट करण्यासाठी त्यांनी सर्व उपाय योजले. व्यक्तिगत मालमत्ता वाढविली आणि सत्तेचा उपभोगही घेतला. तरीही आज पाकिस्तानमध्ये ते सर्वांत जास्त लोकप्रिय असलेले नेता आहेत असे तिकडून येणाऱ्या बातम्यांवरून दिसते. कदाचित् त्यामुळेच असेल; परंतु त्यांना केवळ सत्तेवरून दूर करून भागणार नाही हे लक्षात घेऊनच विद्यमान सत्ताधाऱ्यांनी पावले उचलली आणि त्यांना न्याया-सनासमोर खेचले ! मरहूम बॅरिस्टर महंमदअली जिना यांच्यानंतर भुत्तो यांच्याइतका लोकप्रिय नेता झाला नाही असे म्हणणे अवाजवी ठरू नये. भुत्तो भ्रष्टाचारी होते, सत्तेचे लोभी होते– आणि तरीही लोकप्रिय होते ! जनसामान्यांना शब्दजंजाळामध्ये अडकवून टाकून त्यांना संमोहित करणाऱ्या नेत्याला फाशीची सजा फर्मावणे हे सामान्य काम नव्हते ! अर्थात प्रत्यक्ष सजा फर्मावली जाण्यापूर्वी शासनाने हवा तो बंदोबस्त केलाच होता आणि तरीही दंगली उसळायच्या त्या उसळल्याच ! फक्त त्यांचे वृत्त पुरेसे बाहेर येऊ शकले नाही इतकेच. भुत्तो यांना फर्माविलेल्या सजेचे पडसाद केवळ पाकिस्तानमध्येच नाही तर सर्वत्र घुमणार ही दिसती गोष्ट आहे. पाकिस्तानमधील घटनांबाबत विशेष संवेदनाक्षम असलेल्या काश्मीरमध्ये या शिक्षेविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. सत्तेवरून सुळाकडे होत असलेल्या या प्रवासाचा प्रत्येक टप्पा तापदायक ठरणार आहे. जनाब भुत्तो यांना अपिलाची संधी दिलेली आहे. दरम्यानच्या काळात वातावरण तप्त रहाणार यात शंकाच नाही !

'इंडिया टू डे' या पाक्षिकाच्या प्रतिनिधीला पाकिस्तानमधील फेरफटक्यामध्ये जे वातावरण आढळले त्याचा तपशील रंजक आहे आणि पाकिस्तानमधील घटनांचे पडसाद आपल्याकडे उमटत असल्याने हा तपशील नजरेखालून जाणे आवश्यकही ठरत आहे. देशाची फाळणी होऊन तीस वर्षे झाली तरी जुन्या मंडळींच्या इकडल्या खुणा बुजलेल्या नाहीत. किती तरी गोष्टींची ते आपुलकीने चौकशी करतात. तसेच विस्ताराने आणि सैनिकी सामर्थ्याने प्रचंड असलेल्या भारताबद्दल त्यांच्या मनावर कसे प्रचंड दडपण असते याचे प्रतिबिंबही त्यांच्या बोलण्यात पहावयास मिळते. या संदर्भात लाहोरच्या पाकिस्तान टाइम्सच्या वार्ताहराने काढलेले उद्गार देण्यासारखे आहेत. त्याने स्पष्टच सांगितले की, प्रत्येक पाकिस्तानी नागरिक भारतीयांकडे संशयाच्या नजरेने पाहतो. त्याच्या लेखी भारतीय हा सामर्थ्यवान आणि आक्रमक वृत्तीचा आहे. भारताची तांत्रिक प्रगती आणि प्रचंड सामर्थ्य याची एवढी भीती आहे की, चुटकीसरशी आम्ही खाल्ले जाऊ अशी त्यांना भीती वाटते ! विशेषतः बांगला देश वेगळा पडल्यानंतर आम्हाला भारताच्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष करून चालणारच नाही ! पाकिस्तानची सत्ता राजकारण्यांकडे असो वा आयुब, याह्याखान अथवा आता– जनरल झिया– उल् हक यांच्यासारख्या लष्करी सत्ताधीशाकडे असो, भारतद्वेषाचे लाकूड पाकिस्तानी सत्ताधिशांनी कायम जळते ठेवल्याने सर्वसामान्य जनतेच्या रोमारोमात ही वृत्ती भिनली आहे. तरीही व्यक्तिगत पातळीवर गप्पा मारताना हा कडवटपणा जाणवत नाही जनरल झिया उल् हकही सेन्ट स्टीफन कॉलेजची चौकशी करतात किंवा गप्पांच्या ओघात एअर मार्शल अशगरखानसारखा लष्करी माणूसही एअरमार्शल ओ पी. मेहरा यांची वास्तापुस्त करतो; तर एखादी वृद्धा जामा मशिदीच्या पायऱ्यांची अवस्था कशी आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता दाखविते.

### भुत्तो चर्चेचा विषय

भुत्तो तुरुंगामध्ये असले आणि आता न्यायालयाने त्यांना फाशी फर्माविली असल्याने पुढे काय होणार याबद्दल साराच अंधकार असला तरी दबक्या आवाजात राजकीय चर्चा चाललेली दिसते. त्यात जनाब भुत्तो यांच्या पत्नी बेगम नसरत भुत्तो आणि मुलगी– बेनझिर यांनी आक्रमक धोरण स्वीकारल्याने सत्ताभ्रष्ट होऊनही भुत्तो चर्चेचा विषय आहेत. भुत्तो यांना उच्च न्यायालयाने फाशीची सजा फर्मावली असली आणि सर्वोच्च न्यायालयामध्ये काय निर्णय लागेल याचा अंदाज येण्यासारखा असला तरी प्रत्यक्ष फाशी दिली जाईल की नाही हा एक तरंगता प्रश्न आहे जनाब भुत्तो यांची देशांतर्गत लोकप्रियता, बाहेरील राष्ट्रांकडून येणारे दडपण, अन्य मुस्लिम राष्ट्रांत उमटणारी प्रतिक्रिया अशा किती तरी गोष्टी शिक्षेचे फर्मान आणि प्रत्यक्ष शिक्षा यांमध्ये उभ्या आहेत. सात वर्षे पंतप्रधानकी उपभोगलेल्या भुत्तो यांना प्रथम संरक्षक कैद देण्यात आली. त्यांचे प्रकरण कसे हाताळावे याबाबत प्रारंभी लष्करी सत्ताधारीही गोंधळात असावेत. नकली निवडणुका घेऊन जनाब भुत्तो यांनी देशाची फसवणूक केली अशी ओरड करीत सारे विरोधी पक्ष एका बाजूने एकत्र आले. जनाब भुत्तो यांनी दडपशाही आणि चर्चेचे गुऱ्हाळ अशा दोन्ही गोष्टी एकाच वेळी चालू ठेवल्या आणि लोकशाहीला रस्ता मोकळा करून देण्याच्या गप्पा मारीत आजचे सत्ताधीश सत्तेवर आले. आजही जनरल झिया

पृष्ठ २१ वर

# जनता पक्ष

## आढावा, इशारे, आव्हाने

वा. दा. रानडे

केंद्रात जनता पक्ष अधिकारावर येऊन एक वर्ष झाले. सरकार आणि पक्ष या दोन्ही पातळींवर वर्षात काय साधले, काय साधवयाचे राहिले? भूमिका, धोरण, कार्यक्रम, कारभार कार्यपद्धती यात कोणत्या उणीवा दिसून आल्या? त्या दूर करण्यासाठी काय प्रयत्न चालू आहेत? देशापुढे कोणती मुख्य आव्हाने होती? त्यांना जनता पक्षाने व सरकारने कितपत यशस्वीपणाने तोंड दिले? यासंबंधात वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून काही विचार मांडीत आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकात जनता पक्षाला अपेक्षित यश न मिळाल्याने या प्रश्नावर विचारमंथन सुरू झालेलेच आहे.

पहिला प्रश्न म्हणजे जनता पक्षाची ज्या उद्देशाने स्थापना झाली त्यानुसार त्याचे कार्य होत आहे का? संघटना कॉंग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल, समाजवादी आणि कॉंग्रेसमधून बाहेर पडलेले बंडखोर यांनी एकत्र येऊन कॉंग्रेसला प्रभावी पर्यायी पक्ष म्हणून जनता पक्षाची स्थापना केली.

इंदिरा गांधींनी १८ जानेवारी १९७७ ला निवडणुकीची घोषणा केली आणि दोन दिवसांतच विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्ष स्थापण्याचा निर्णय घेतला. लोकशाही मूल्यांवर निष्ठा असलेल्या प्रभावी विरोधी पक्षाची उभारणी हा जनता पक्षाच्या स्थापनेमागील मूळ उद्देश होता. निवडणुकीत आपण बहुमताने निवडून येऊन सत्ता मिळवू अशी नेत्यांना त्या वेळी खात्री वाटत नव्हती; पण जनतेने मोठ्या बहुमताने जनता पक्षाला निवडून देऊन त्याच्या हाती देशाच्या कारभाराची सूत्रे सोपविली आणि स्वातंत्र्यातील तीस वर्षे सतत विरोधी पक्षाची भूमिका बजावणाऱ्या जनता पक्षाच्या नेत्यांकडे सत्ताधारी पक्षाची भूमिका आली.

जनतेला बदल हवा होता आणि लोकशाही पद्धतीचा कारभार हवा होता. या अपेक्षा गेल्या एक वर्षात जनता सरकारने कितपत पुऱ्या केल्या? लोकशाहीची गळचेपी करणारे आणीबाणीतील सर्व निर्बंध या सरकारने रद्द केले. त्यामुळे देशात खुले, मोकळे वातावरण निर्माण झाले ही जनता सरकारची गेल्या वर्षातील सर्वांत मोठी कामगिरी. देशाच्या कारभाराला आणखी कोणते निराळे वळण जनता सरकारने दिले? दारिद्र्य-निवारण आणि बेकारी-निवारण हे देशापुढील सर्वांत महत्त्वाचे प्रश्न. दहा वर्षांत हे दोन्ही प्रश्न सोडविण्याचे जनता सरकारचे उद्दिष्ट आहे व त्या दृष्टीने कार्यक्रम आखण्यात येत आहे. पूर्वीच्या कॉंग्रेस राजवटीचे धोरण आणि जनता सरकारचे धोरण यांच्यात या बाबतीतील महत्त्वाचा फरक म्हणजे शेती आणि अधिक रोजगार निर्माण करणाऱ्या उद्योगांवर जनता सरकारचा भर आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मोठा शहरांकडे जाणारा लोंढा थांबवून त्यांना तेथेच काम देण्याच्या उद्देशाने उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी सरकार निर्णय व पावले टाकणार आहे; पण या साऱ्या कार्यक्रमाचे यश त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून आहे. अंमलबजावणीत अधिक वेग हवा, कार्यक्षमता हवी. पूर्वीचे कॉंग्रेस सरकार आणि जनता सरकार यांच्या बाबतीत काही जाणवणारा फरक गेल्या एक वर्षात आढळून आला नाही. जमीनसुधारणांच्या कार्यक्रमाला वेग आलेला नाही. केवळ नोकरशाहीवर विसंबून अशा कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी होत नाही, हा अनुभव कॉंग्रेस राजवटीत आला असताना जनता सरकार नोकरशाहीवरच विसंबून आहे. मंत्र्यांनी, कार्यकर्त्यांनी कारभारात हस्तक्षेप करू नये; पण सरकारने आखलेला कार्यक्रम ठरलेल्या मुदतीत पुरा व्हावा यासाठी नोकरशाहीमागे नेट लावायला हवा. तसे काही घडताना दिसत नाही. निष्ठावंत पक्षकार्यकर्त्यांची संघटना त्यासाठी हवी. गेल्या वर्षभरात जनता पक्षाने अशी संघटना उभारली नाही. याबाबतीत कॉंग्रेसपेक्षा जनता पक्ष निराळा नाही असेच दिसून आले. कार्यकर्त्यांची संघटना केवळ निवडणुकीपुरती नव्हे तर सतत कार्य करीत राहिली पाहिजे. जनता पक्षाची कॉंग्रेससारखी गत व्हायला नको असेल तर यापुढे तरी संघटना–बांधणीकडे अधिक लक्ष द्यावयास हवे.

या बाबतीत मुख्य अडचण म्हणजे घटक पक्षांचे खऱ्या अर्थाने विसर्जन होऊन त्यातून एकजीव पक्ष अजून निर्माण होऊ शकलेला नाही. पक्षांतर्गत तणाव आणि संघर्ष यातून मार्ग काढण्यातच नेत्यांची ताकद खर्च होत आहे. घटक पक्षांमध्ये निरनिराळ्या प्रश्नांवरील धोरणाबाबत मतभेद आहेत; पण त्याबाबतीत विचारविनिमय होऊन लोकशाही पद्धतीने निर्णय घेतल्यावर आपले वैयक्तिक मत निराळे असले तरी ते बाजूला ठेवून पक्षनिर्णयाचाच पुरस्कार करावयाचा ही कार्यपद्धती सर्वांनी कटाक्षाने पाळायला हवी.

कार्यपद्धतीच्याच संदर्भात आणखी एक आवश्यक संकेत म्हणजे मतभेद जाहीरपणे प्रकट करावयाचे नाहीत. पक्षाच्या व पक्षनेत्यांच्या धोरणावर पक्ष-बैठकीत कार्यकर्त्यांनी मोकळेपणाने टीका जरूर करावी; पण जाहीरपणे पक्षाच्या अधिकृत धोरणाचाच पुरस्कार करायला हवा. मतभेदाचे जाहीर प्रदर्शन होऊ लागले, परस्पर विरोधी दृष्टिकोन मांडले जाऊ लागले, दोन नेते दोन तोंडांनी बोलू लागले तर पक्षाचे खरे धोरण काय याबद्दल जनतेच्या मनात गोंधळ निर्माण होईल. पंतप्रधान मोरारजी देसाई आणि उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांची सरकारी नोकरांच्या संपाबाबत जी परस्पर विरोधी मते प्रदर्शित केली त्यामुळे असा गोंधळ निर्माण झाला होताच.

जनतापक्षाची रीतसर स्थापना १ मेस झाली; पण अजून अस्थायी समित्याच काम करीत आहेत. सभासदनोंदणी होऊन खालपासून वरपर्यंत रीतसर सभासदांमार्फत पदाधिकाऱ्यांची निवड झालेली नाही. यासाठी पूर्वी जाहीर केलेली मुदत वाढविण्यात आली. आता एप्रिलअखेर या पक्षांतर्गत निवडणुका पार पडणार आहेत. पक्षाचे धोरण व कार्यक्रम ठरविण्यात सर्वसामान्य सभासदांनी सुद्धा क्रियाशील भाग घ्यावयास हवा. वरिष्ठ नेत्यांनी धोरण ठरवावयाचे आणि खालच्या शाखांनी ते निमूटपणे अंमलात आणावयाचे अशी कॉंग्रेसची कार्यपद्धती होती. जनतापक्षाने खऱ्या पक्षांतर्गत लोकशाहीपद्धतीने काम करायला हवे.

जनतेने कॉंग्रेसला तीस वर्षे संधी दिली; पण जनता पक्षालाही ती तीस वर्षे राज्य करण्याची संधी देईल असे मानण्याचे कारण नाही. जनता आता उतावीळ झाली आहे, अधिक जागरूक झाली आहे. जनतेला दिलेली आश्वासने पुरी करण्याच्या बाबतीत झटपट कृती होत नाही असे दिसून आले तर जनता पक्षालाही ती फार काळ सत्तेवर ठेवणार नाही! □

उपयोजना, विकासकार्यक्रम राबविण्यासाठी

# आदिवासी विभागाचा एक स्वतंत्र जिल्हा तयार करावा

रघुवीर मुळे

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या अटीतटीच्या सामन्यात विविध चमत्कार घडले आहेत. एकूण २८८ सदस्य असलेल्या या विधिमंडळात निर्विवाद बहुमत एकाही पक्षाला मिळालेले नाही आणि म्हणूनच जनता काय किंवा दोन्ही कांग्रेस काय, या राष्ट्रीय पक्षांचे भवितव्य इथे मात्र अपक्षांच्या हाती आले, हाही एक त्यातलाच भाग. तथापी महाराष्ट्राच्या ठाणे–नासिक आणि धुळे या जिल्ह्यांचा आदिवासी भाग म्हणून जो सलग पट्टा आहे, त्यात घडलेल्या (खरं म्हणजे आदिवासी मतदारांनी घडविलेल्या) चमत्कारांकडे मात्र एकाही वृत्तपत्राचे लक्ष जाऊ नये, ही गोष्ट निदान मला तरी आश्चर्याची वाटत नाही. आदिवासींविषयी आपणा सर्वांनाच वाटत असलेले दिखाऊ प्रेम व साफ खोटया कळवळयाचीच ही साक्ष होय.

सन १९७१ च्या खानेसुमारीप्रमाणे भारताच्या एकूण ५४·७९ कोटी लोकसंख्येपैकी आदिवासी व तत्सम अनुसूचित जमातींची लोकसंख्या ७ टक्के म्हणजेच ३·९० कोटी आहे. महाराष्ट्र राज्यात या आदिवासी व अनुसूचित जमातींची लोकसंख्या जवळजवळ ३० लाख म्हणजेच राज्यातील लोकसंख्येच्या सहा टक्क्यांएवढी आहे. या अनुसूचित जमाती म्हणून मानल्या गेलेल्या छोटया छोटया टोळया जंगलात व जंगलाच्या आसपास राहत असून त्या ठाणे, नासिक आणि धुळे जिल्ह्यांत विशेषत्वाने वास्तव्य करून राहिलेल्या दिसतात.

ठाणे जिल्ह्याच्या एकूण २२ लाख ८१ हजार लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ५ लाख ८० हजार एवढी आहे. नासिक जिल्ह्याच्या एकूण २३ लाख ६९ हजार लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ५ लाख ६१ हजाराएवढी आहे, तर धुळे जिल्ह्याच्या एकूण १६ लाख ६२ हजार लोकसंख्येपैकी आदिवासींची संख्या ६ लाख १६ हजार अशी आहे. या तीनही जिल्ह्यांतील आदिवासी, उपयोजनेत समाविष्ट झालेली आदिवासींची लोकसंख्या अनुक्रमे ४ लाख ८७ हजार, ३ लाख ६७ हजार व ५ लाख २१ हजार अशी आहे. म्हणजेच ठाणे, नासिक व धुळे या तीनही जिल्ह्यांच्या सलग भागातली एकूण आदिवासींची संख्या एका स्वतंत्र जिल्ह्याएवढी १७ लक्ष ५७ हजार इतकी आहे. विशेष म्हणजे तीन जिल्ह्यांत भौगोलिकदृष्टया 'विभागलेली' ही लोकसंख्या 'एकाच विभागात' (भौगोलिक दृष्टीनेच) गुजराथ राज्याच्या सीमेवर सलग अशी आहे. या जमातीत वारली, ठाकूर, महादेवकोळी, कोकणी, भिल्ल, पावरा या जमातींची वस्ती प्रामुख्याने आहे.

महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४० जमाती असून त्यांपैकी भिल्ल – ६ लाख, महादेवकोळी २॥ लाख, वारली २·५५ लाख, कोकणी २·३० लाख, ठाकूर १·१५ लाख या सात प्रमुख जमाती ठाणे, नाशिक आणि धुळे या जिल्ह्यांत राहात आहेत. म्हणजेच वरील प्रमुख अशा सात जमातींची या पट्ट्यातली संख्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ६० टक्क्यांइतकी आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या तीस वर्षांत या आदिवासी पट्ट्यात जेव्हा जेव्हा म्हणून लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या त्या त्या निवडणुकांच्या निकालाकडे सहजी एक दृष्टिक्षेप टाकला तरी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे सातत्याने या विभागातून कांग्रेस पक्षाचे उमेदवार विधिमंडळात निवडून जात होते. ठाणे जिल्ह्यातील एक–दोन प्रतिनिधी मात्र हा नियम सिद्ध करायला अपवाद ठरावेत. अगदी गेल्या लोकसभेच्या (१९७२) निवडणुकीपर्यंत हे चित्र सातत्याने टिकून राहिलेले होते. जणू या लोकांमध्ये असा कुठलाच फरक होत नव्हता, तसाच त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षातही. (किंबहुना व्यक्तीतही!) कांग्रेसपक्षावरच्या *त्यांच्या अचल निष्ठेचे तर हे प्रतीक नव्हते ना? मला वाटते ते तसे* नसावे. १९३८ साली सिमिंग्टन यांनी जे 'भविष्य' लिहून ठेवले होते तेच हा आदिवासी महामानव जणू खरे करून दाखवीत होता.

आदिवासींचे व इतर वन्य जमातींचे प्रश्न समजावून घेण्यासाठी या विषयांशी संबंधित असलेल्या अभ्यासकांनी १९३८ साली सिमिंग्टन नावाच्या एका गोऱ्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली होती. या समितीने त्या वेळच्या मुंबई सरकारला अहवाल सादर केला होता. त्या अहवालातील निष्कर्ष ठोकळमानाने असे होते.

१. यांचे राहणीमान इतके कष्टप्रद आहे की हे लोक जगतात कसे याचे आश्चर्य वाटते.

२. हे लोक शांतताप्रिय असून दंगे, दरोडे, चोरीमारीचे प्रकार या विभागात फारसे घडत नाहीत.

३. अज्ञान व भीतीपोटी सावकार यांची फारच पिळवणूक करतात. ही पद्धत माणुसकीला लाज वाटेल अशी आहे.

४. दारू व व्यसनांपायी यांची फार मोठी हानी होत असते.

५. हा माणूस कमीतकमी गरजा व कशाही परिस्थितीत उपाशी पोटी राहूनही जगेल; पण कशाबद्दलही तक्रार करणार नाही.

६. या जमातींचे प्रतिनिधी जमातींसाठी अपेक्षित काम करू शकणार नाहीत.

जवळजवळ ४० वर्षांनंतरही आदिवासींच्या जीवनात आजही फारसा फरक पडलेला दिसत नाही हे विदारक सत्य आहे. मग निवडणुकीच्या निमित्ताने म्हणा किंवा आदिवासी कल्याणाचे एक राजकीय काम म्हणून म्हणा, किमान गरजा भागविणारा पक्ष म्हणून

काँग्रेस पक्षाने काही ना काही आदिवासींसाठी केलेले होतेच. त्याचे उतराई होण्यासाठी पाच वर्षांनी येणारी मतदानाची संधी तर आदिवासी घेत नव्हते ना? १९७२ साली या विभागातले चित्र असे होते–

**लोकसभा १९७२**

| जिल्हा | एकूण राखीव जागा | काँग्रेसला मिळालेल्या जागा | विरोधी पक्षांना मिळालेल्या जागा |
|---|---|---|---|
| ठाणे | १ | १ | ० |
| नासिक | १ | १ | ० |
| धुळे | १ | १ | ० |
| एकूण | ३ | ३ | ० |

गेल्या ७२ च्या निवडणुकीपर्यंत आदिवासींनी काँग्रेस पक्षाच्या बाजूने मतदान केलेले आहे, त्याचे वरील एक कारण असू शकेल; पण सिमिंग्टनसाहेबांच्या अहवालाच्या निष्कर्षाचाही विचार करणे आलेच. (निष्कर्ष क्र. ६) काँग्रेस पक्षाने या विभागात निवडणुका लढविण्यासाठी आजवर जे जे म्हणून उमेदवार उभे केले ते आदिवासी जमातींचे असले तरी (काही किरकोळ अपवाद वगळता) खऱ्या अर्थाने त्या त्या विभागातल्या प्रस्थापितांचे म्हणजे सावकारांचेच प्रतिनिधी की–बगलबच्चे ?–होते. सावकारांची आदिवासी जीवनावर असलेली राक्षसी पकड त्यांना काँग्रेस पक्षाच्या बाजूने कौल देण्यासाठी तर भाग पाडीत नव्हती ना? या शंकेला पूरक अशी गोष्ट तर अगदीच ताजी आहे. आदिवासींच्या उत्पादित वस्तू आणि जंगलातून गोळा केलेली संपत्ती सावकारांनी (आपल्या परंपरेनुसार) पडत्या भावाने खरेदी करू नये, त्यांना त्याचा योग्य तो भाव मिळावा म्हणून आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत सहकारी संस्थांच्यामार्फतच खरेदी-विक्री केली जावी असे फर्मान (तेही निवडणुकीच्या तोंडावरच!) निघाले होते या योजनेने थोडयाफार प्रमाणात का होईना; पण सावकारशाहीची पिळवणूक कमी होते आहे म्हणून आदिवासी लोकप्रतिनिधींनी तिचे स्वागत करण्याऐवजी ही मंडळे सावकारांची शिष्टमंडळे घेऊन मुंबईला सचिवालयातच ठाण मांडून बसली होती! या वस्तूंची खरेदी-विक्री सहकारी संस्थांबरोबरच व्यापाऱ्यांनाही करू द्यावी असा आग्रह या 'आदिवासी लोकप्रतिनिधींनी' धरला आणि सरकारने देखील एका दुरुस्तीच्या फटकाऱ्याने तो पुरविला. हे का घडले? याचे आदिवासी जरी *आपला मतदार असला तरी निवडून येण्यासाठी म्हणून* जे आर्थिक पाठबळ लागते ते हीच मंडळी पुरविणार (हीही परंपराच!) मग त्यांना का दुखवा? हेही कारण असू शकेल. काहीही असले तरी सिमिंग्टन यांचे 'या जमातीचे प्रतिनिधी जमातीसाठी अपेक्षित काम करू शकणार नाहीत!' हे भविष्य बव्हंशी खरे ठरले हे नाकारून कसे चालेल? मग परिणामी विधानसभेचे चित्रही वेगळे कसे असू शकेल?

आणि आता निवडणूक–निकालाचे चित्र बघू म्हणजे मतदारांनी काय केले हे आपल्याला दिसेल.

**विधानसभा १९७२**

| जिल्हा | एकूण राखीव जागा | काँग्रेस पक्षाला मिळालेल्या जागा | विरोधी पक्षाला मिळालेल्या जागा |
|---|---|---|---|
| ठाणे | ४ | ४ | ० |
| नासिक | ३ | २ | १ |
| धुळे | ४ | ३ | १ |
| एकूण | ११ | ९ | २ |

*निवडून आल्यानंतर यथाकाल विरोधी पक्षातल्या* दोघाही आमदारांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यामुळे पुन्हा विरोधी पक्षाच्या पदरात 'शून्य'च पडले ही वस्तुस्थिती.

आता आपण १९७७ च्या लोकसभेच्या व १९७८ च्या विधानसभेच्या निवडणुकीत काय घडले ते पाहू. गेली तीस वर्षे सातत्याने काँग्रेस पक्षाच्या मागे उभ्या असलेल्या आदिवासी मतदाराने या वेळेस काँग्रेस पक्ष एकरकमी नाकारून नवा इतिहास घडविलेला दिसतो. मी म्हणतो तो 'चमत्कार' हाच!

**लोकसभा १९७७**

| जिल्हा | एकूण राखीव जागा | काँग्रेस पक्षाला मिळालेल्या जागा | विरोधी पक्षाला मिळालेल्या जागा |
|---|---|---|---|
| ठाणे | १ | ० | १ |
| नाशिक | १ | ० | १ |
| धुळे | १ | १ | ० |
| एकूण | ३ | १ | २ |

**विधानसभा १९७८**

| जिल्हा | एकूण राखीव जागा | काँग्रेस पक्षाला मिळालेल्या जागा | विरोधी पक्षाला मिळालेल्या जागा |
|---|---|---|---|
| ठाणे | ५ | ० | ५ |
| नाशिक | ५ | १ | ४ |
| धुळे | ५ | १ | ४ |
| एकूण | १५ | २ | १३ |

म्हणजे १९७२ च्या लोकसभेतील तीनपैकी दोन जागा काँग्रेसने गमावल्या तर १९७२ च्या विधानसभेतील जागांत या वेळी ४ ने वाढ होऊनही पूर्वीच्या ९ जागाही काँग्रेसपक्षाला राखता आल्या नाहीत. ५–६ वर्षांत आदिवासींनी ३० वर्षांची परंपरा तोडून टाकण्याइतके काय घडले असावे? हा एक संशोधनाचा विषय होवो किंवा न होवो आदिवासी विभागातल्या जागा त्यांच्या 'किमान गरजा' (त्याही तात्पुरत्या) जिंकण्याच्या काँग्रेस पक्षाच्या एकाधिकारशाहीला मात्र आदिवासींनी सुरुंग लावलेला दिसतो. त्यातही अचंब्याची गोष्ट

# आदिवासी उपयोजनेची परवड

आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी 'आदिवासी उपयोजना' तयार झाली आणि त्यावर खर्च होणाऱ्या १३३ कोटी रुपयांची जाहिरातही देशभर झाली. महाराष्ट्र सरकारच्या अंदाजपत्रकात आदिवासींच्या विकासासाठी खर्च करावयाची म्हणून एवढी मोठी रक्कम कशी व कुठून उपलब्ध झाली हे कोडेच नव्हे काय? पण त्याचे उत्तर अवघड नाही. उदाहरणार्थ—नाशिक जिल्ह्यात तेरा तालुके आहेत. त्यांपैकी इगतपुरी, कळवण, पेठ, सुरगाणा, दिंडोरी व सटाणा हे सहा तालुके आदिवासी तालुके आहेत. नाशिक जिल्हा परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था तेराही तालुक्यांतील रस्ते, पाझर तलाव, मध्यम वा लघु पाटबंधाऱ्यांच्या योजना, शाळा, दवाखाने यांवर आपल्या अंदाजपत्रकात रक्कम धरते. अर्थातच त्यात वरील आदिवासी अशा तालुक्यांवर होणारा खर्चही गृहीत असतो. सरकारने मग केले काय? तर ह्या आदिवासी तालुक्यांवर होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या खर्चाची रक्कम 'नव्या उपयोजने'कडे सुपूर्द केली. हाच प्रकार राज्यभर होऊन १३३ कोटी रुपये उभे झाले. म्हणजे जी कामे नित्याची किंवा सर्वसाधारण म्हणून आदिवासी विभागात जिल्हा परिषदा वा अन्य सरकारी खात्यांकडून होणारच होती ती आता या 'उपयोजने'द्वारे होतील. ही जर वस्तुस्थिती आहे तर उपयोजनेचे गाजर दाखवून आदिवासी नेत्यांना सरकार आपल्यामागे का नेत आहे? हे राजकारण म्हणून सोडून दिले तरी जी कामे होणारच होती त्यांची वेगळी चौकट करून प्रशासनाच्या खर्चाचा बोजा जो वाढविण्यात आला त्याचे काय?

प्रशासनदेखील इतके ठिसूळ आणि बेपर्वा की त्याच्याकडे पाहिल्यावरही सरकारला आदिवासी उपयोजना राबविण्यात स्वारस्य नाही हेच स्पष्ट होते. आदिवासी उपयोजनेच्या कार्याचे धुमधडाक्यात उद्घाटन झाल्यावर आदिवासी आयुक्तांची नेमणूक घोषित झाली. आयुक्तांची कचेरी नाशिकला राहील असेही ठरले. नाशिक आणि जवळचाच जिल्हा धुळे येथील आदिवासी परिसर लक्षात घेता आयुक्तांची कचेरी नाशिकला ठेवावी हा निर्णय खरोखरच चांगला होता.

आदिवासी उपयोजनेचे असले म्हणून काय झाले? आयुक्तच (कमिशनर) ते! त्यांना, त्यांच्या प्रतिष्ठेला साजेसे ऑफिस नको का? अनायासे नाशिक जिल्हा परिषदेचे पदाधिकारी परिषद बरखास्त झाल्याने 'घरी' गेले होतेच. त्यांच्या 'चेंबर्स' या आयुक्तांच्या अधिकाऱ्यांसाठी टेलिफोनसह उपलब्ध झाल्या. अन्यथा किमान दीड–दोन हजार रुपये मासिक भाड्याची जागा व वीस–बावीस हजारांचे फर्निचर झाले असते. आदिवासींच्याच नशिबाने उपयोजनेतली ही रक्कम वाचली; पण पदाधिकाऱ्यांची टेबल्स अधिकाऱ्यांना कशी चालणार? मग जिल्हा परिषदेने जवळजवळ तीन हजार रुपये खर्च करून आयुक्तमहोदयांसाठी टेबल खरेदी केले. खुर्चीही शोभेशी वेगळी! आयुक्त महिनाभरातून या टेबल–खुर्चीशी चांगले दोन-तीन दिवस संपर्क साधू लागले. थोडे दिवस जातात न जातात तोच मुंबईस कुठे चाव्या फिरल्या कुणास ठाऊक? या आयुक्तमहोदयांचे हेडक्वार्टर मुंबई झाले आणि जिल्हा परिषदेला स्वखर्चाने, स्वतःच्या ट्रकमधून ही आरामदायी खुर्ची-टेबल्स मुंबईस रवाना करावी लागली. आदिवासींचा कळवळा व जिव्हाळा वातानुकूलित खोलीत अशा रीतीने अधिक चांगल्या रीतीने व्यक्त होऊ लागला.

आदिवासी विभागातूनही उपयोजनेच्या कार्यवाहीसाठी अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या; पण त्यांच्या हाताखाली अनेक ठिकाणी सेवकवर्गच नाही. त्यांनी नेमकी कोणती कामे करावयाची याचे, ठोस मार्गदर्शनही नाही. त्यामुळे अधिकारीही 'काम' नाही म्हणून नाराज आहेत. या सगळ्या बाबी लक्षात घेतल्या म्हणजे राज्यसरकारला आदिवासी विकास आणि कल्याणाचा जो पत्रकी जिव्हाळा वाटतो तो कसा खोटा आहे हेच जाणवते. ☐

अशी की, विधानसभा-निवडणुकीत आदिवासी मतदारांनी तसं पाहिलं तर 'एकाधिकारशाही'च्या उद्गात्या श्रीमती इंदिरा गांधींच्या पक्षालाच प्रथम क्रमांकाची मते दिलेली आहेत. नाशिक जिल्ह्यातील बागलाण, सुरगाणा, दिंडोरी, कळवण व इगतपुरी या पाच आदिवासी राखीव जागांपैकी बागलाण, दिंडोरी व इगतपुरी या तीन जागी इंदिरा काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत सुरगाण्याची जागा प्रथमच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जिंकली व कळवणची जागा रेड्डी काँग्रेसने राखली. (यांनी आणीबाणीच्या काळात काँग्रेसप्रवेश केला होता.) या जिल्ह्यातील ५ जागांवरचे सुरगाण्याचे अपक्ष उमेदवार (पराभूत) वगळता सर्वत्र जनता पक्ष दुसऱ्या क्रमांकावर आहे. धुळे जिल्ह्यातील साक्री, नवापूर या दोन मतदारसंघांतून इंदिरावादी तळोदा व अक्राणीतून जनता व नंदुरबारमधून (चड्डी) काँग्रेस विजयी झालेले आहेत. येथे तळोदा मतदारसंघात इंदिरावादी दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

ठाणे जिल्ह्यात मात्र खऱ्या अर्थाने 'इंदिराशाही' आदिवासी मतदारांनी फेटाळलेली दिसते. या जिल्ह्यातील ५ आदिवासी राखीव जागांचे वाटप मतदारांनी जनता पक्षाला २, शेकापला १ व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला २ असे केले. येथे दुसऱ्या क्रमांकावर रेड्डी काँग्रेस दिसते.

निवडणुकीनंतरच्या सत्ताखेचीच्या राजकारणात जरी दोन्ही काँग्रेस आघाडी म्हणून एकत्र आलेल्या असल्या तरी मतदारांनी मात्र निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या विरोधी मतदान केले आहे. पुढारलेल्या समाजात आणि लोकशाहीसाठी टाहो फोडणाऱ्या नागरी विभागात इंदिरा गांधी कितीही बदनाम झालेल्या असोत आदिवासींच्या मनातली त्यांच्याबद्दल 'उद्धारकर्ती'ची प्रतिमा पुसून काढणे शक्य दिसत नाही. असो.

गेल्या तीस वर्षांची काँग्रेस पक्षाची साथसंगत आदिवासी मतदारांनी का सोडावी? एक तर काँग्रेस पक्षाच्या राजवटीत आदीवासींचे काहीही भले झालेले नाही ही पक्षोपक्षांनी त्यांच्या कानीकपाळी ओरडून करून दिलेली जाणीव, हे एक कारण असावे. तसेच वेगवेगळ्या योजना आदिवासींच्या भल्यासाठी म्हणून जाहिरातून त्या राबविल्या जाताना मात्र त्याचा फायदा आपल्यापर्यंत पोचत नाही याची या मतदारांना झालेली जाणीवही काँग्रेस पक्षावर राग काढण्यास कारणीभूत झालेली असेल. आदिवासी विभागात मतदानाचे वाढलेले प्रमाण आणि काँग्रेसविरोधी झालेले मतदान यातून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते, की आता आदिवासी महामानव दीर्घकालीन निद्रेतून जागा झालेला आहे. त्याच्या या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आदिवासी विभागाचा आता स्वतंत्र जिल्हा स्थापन करणेच हिताचे व त्यांच्या विरोधीमतदानाचे चीज करण्याचा तोच एक मार्ग आहे.

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने आदिवासी विभागाचा एक स्वतंत्र जिल्हा स्थापन करण्याचा विषय काढणे म्हणजे पुढारलेल्या विभागातून आदिवासींना फुटून निघण्याच्या प्रक्रियेला गती देणे नव्हे असे प्रथमच नमूद करतो. आदिवासी विभागेतर भाग आणि त्यांचे प्रतिनिधीचे (Non-tribal) प्रमाण या तीनही जिल्ह्यांत मोठे असल्याने आदिवासींचा आवाज तोकडा पडतो. नाही म्हटले तरी जी सरकारी यंत्रणा जिल्ह्यात विविध विकासयोजना राबवीत असते तिच्यावर या 'नॉन-ट्रायबल्स'चा प्रभाव अधिक असतो. अगदी पाझर तलावाचेच उदाहरण घ्या! कित्येक वर्षांपर्यंत आदिवासी-डोंगराळ-प्रदेशात पाझर तलाव होऊच शकत नाही असा समज दृढ होता. आता ते होत आहेत. जे तंत्र तेथे यशस्वी होणार नाही असे तंत्रज्ञही सांगत होते ते आता कसे 'फिजिबल' होत आहे?

ठाणे जिल्ह्यातील शहापूर, वाडा, डहाणू, पालघर, जव्हार; नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, सुरगाणा, दिंडोरी, बागलाण, कळवण व धुळे जिल्ह्यातील नंदुरबार, साक्री, तळोदा, नवापूर, अक्राणी हे आदिवासी राखीव मतदारसंघ एका सलग पट्ट्यानं गुजरात राज्याच्या सीमेवर आहेत. ह्या संपूर्ण पट्ट्यात लोकसभेच्या तीन आणि विधानसभेच्या १५ जागाही आदिवासींसाठी राखीव आहेत. त्यावर योग्यते उमेदवार (काँग्रेसविरोधी) आदिवासींनी आता निवडून दिलेले आहेत. भौगोलिक रचनेच्या दृष्टीने ही सलगता जवळजवळ २०० मैलांची म्हणजे रत्नागिरी जिल्ह्याएवढी होते. म्हणजेच या आदिवासींच्या नव्या जिल्ह्याच्या नियोजित रचनेतील लोकप्रतिनिधींचे विभाग पाडण्यातला किंवा मतदारसंघ ठरविण्यातला महत्त्वाचा अडसर आपापतःच नाहीसा झालेला आहे.

नव्या जिल्ह्याची रचना म्हटली की त्यात महसूलखात्याची रचना महत्त्वाची ठरते. प्रत्येक जिल्ह्याला जिल्हाधिकारी हा महत्त्वाचा अधिकारी-प्रशासक-असतो. या पट्ट्याचे सुदैव असे की, त्यात सध्या एक अतिरिक्त आयुक्त आदिवासी कल्याण योजनांच्या कामावर लक्ष ठेवून आहेत. अतिरिक्त आयुक्तांचे पद वरिष्ठ जिल्हाधिकाऱ्यांच्याच पात्रतेचे आहे. ढोबळ मानाने पाहिले तरी सहकारी संस्थांचे नियमन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा उपनिबंधकाचे एक पद असते. या सलग पट्ट्यात आज असे तीन उपनिबंधक कार्यरत आहेत, तर सहा प्रकल्पाधिकारी आणि जवळजवळ १० मोटारींचा ताफाही उपलब्ध आहे. पंचायत राज्यचौकटीतल्या तालुका पंचायत समित्याही अस्तित्वात असून त्यांची फक्त स्वतंत्र जिल्हा परिषद अस्तित्वात आणणे ही एक केवळ तांत्रिक बाब ठरावी.

वर नमूद केलेले अधिकारी आदिवासी सलग पट्ट्यात कार्यरत आहेत हे ठीक; पण त्यांच्याकडे खऱ्या अर्थाने कामाचे 'स्वातंत्र्य' नाही. जिल्ह्यातील अधिकारी आपापल्या सेवकांद्वारे योग्य ती कामे करवून घेत असतातच. त्यांचेवर देखरेख व नियमनही या 'जिल्हा' अधिकाऱ्यांचे असतेच; पण मग हे Super-Supervision कशासाठी? अशा रीतीने या सक्षम अधिकाऱ्यांची सेवा व पदे आदिवासी कल्याणाचे नावाखाली निष्कारण वापरण्याऐवजी त्यांच्याकडेच नव्या जिल्ह्याचे नियमन सोपविले तर आदिवासी पट्ट्यातील विकासाचे फळ दहा वर्षे आधीच त्यांना चाखावयास मिळेल असे वाटते.

□

नगरचे वार्तापत्र

# अन्याय झाल्याची ओरड खरी नाही

चंद्रकांत दीक्षित

श्री. वसंतदादा पाटलांचे मंत्रिमंडळ तयार होते न होते तोच मंत्रिमंडळात आमच्या जिल्ह्यास स्थान नाही, आमच्या जिल्ह्याने काँग्रेसची बाजू भक्कम केली, आम्ही काँग्रेसला हात दिला, अशा आशयाची निवेदने ठिकठिकाणी सुरू झाली आहेत. नुसत्या निवेदनांनी भागेना म्हणून की काय अहमदनगर जिल्ह्याचे काँग्रेसचे अध्यक्ष आमदार श्री. शंकरराव काळे यांनी या घटनेचा निषेध म्हणून जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामाही दिला! (पाठोपाठ श्री. अण्णासाहेब शिंदे यांनीही आपल्या पदाचा राजीनामा पाठवून दिला.)

आ. काळे व अण्णासाहेब शिंदे यांच्या राजीनाम्यांनी काही प्रश्न उपस्थित होतात. एक तर काँग्रेसपक्षाला खरोखरच नगर जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळाला आहे काय? आणि जो प्रतिसाद मिळाला तो खरोखरी सार्वजनिक कार्याची पावती म्हणून मिळाला की साखरी साम्राज्ये हातात होती व आहेत म्हणून मिळाला? या प्रश्नांची उकल केल्याशिवाय मंत्रिमंडळातून नगर जिल्ह्याला डावलले गेले असे म्हणता येणार नाही.

अहमदनगर जिल्ह्यात एक आदिवासी-गटासाठी व एक राखीव अशा दोन जागांसहित एकूण तेरा विधानसभा मतदारसंघ होते व या तेरा जागांपैकी संगमनेर, शिर्डी, राहुरी, पारनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, अकोला, (आदिवासी राखीव) श्रीगोंदा या आठ जागा काँग्रेसने जिंकल्या तर अहमदनगर शहर व पाथर्डी या दोन ठिकाणी जनता पक्ष, शेवगाव-नेवासा येथे कम्युनिस्ट, नगर उत्तर येथे अपक्ष व जामखेड–कर्जत (राखीव) येथे रिपब्लिकन (गायकवाड गट) पक्ष विजयी झाला. म्हणजे काँग्रेसला या जिल्ह्यात सुमारे साडेएकसष्ट टक्के जागा मिळाल्या. काँग्रेसचे म्हणणे नगर उत्तरचे अपक्ष उमेदवार दादा पा. शेळके हे आमचेच आहेत. (तेही बरोबरच आहे. कारण ते जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस होते व उमेदवारी दिली गेली नाही म्हणून ते अपक्ष उभे राहिले. अधिकृत काँग्रेस उमेदवाराला त्यांनी पाडले आणि नंतर 'दादां'साठी राज्यपालांपुढे ते परेडला गेले) म्हणजे अगदी काळे यांचे हिशेबाने नऊ आमदार नगर जिल्ह्यात काँग्रेसचे आहेत व एवढे यश काँग्रेसला मिळवून देऊनही मंत्रिमंडळात *त्यांना जागा दिली गेली नाही!*

आता अगदी तालुकावार हिशेबच करावयाचा म्हटले तर संगमनेर येथील आमदार श्री. भाऊसाहेब थोरात संगमनेर सहकारी साखर कारखान्याचे प्रवर्तक अध्यक्ष आहेत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे गेली काही वर्षे अध्यक्ष आहेत. तर शिर्डीचे आमदार श्री. चंद्रभान पाटील घोगरे हे प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. आ. शंकरराव कोल्हे (कोपरगाव) हे तर गेली सुमारे सोळा वर्षे संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत, तर आ. शंकरराव काळे हे गणेशनगरचे असेच अनेक वर्षे अध्यक्ष आहेत. श्रीरामपूरचे आमदार श्री. गोविंदराव आदिक अशोक सहकारी साखर कारखान्याचे कर्तुमकर्तुं म्हणून नेतृत्व करीत आहेत. श्रीगोंद्याहून निवडले गेलेले आमदार श्री. शिवाजीराव नागवडे हे श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत आणि राहुरी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष असलेले श्री. का. ल. पवार हे आमदार झाले आहेत. अपवाद फक्त अकोला आदिवासी गटाचा. तेथे श्री. यशवंतराव भांगरे साखर कारखाना नसताही निवडून आले आहेत.

या निवडणुकीतील विजयाकडे पाहिले म्हणजे असे दिसते की, *आठ जागांपैकी सात* जागांवर काँग्रेसचे जे आमदार निवडून आले त्या सर्वांचा सहकारी साखर कारखान्याशी बव्हंशी अध्यक्ष या नात्यानेच संबंध आहे तर जे अध्यक्ष नाहीत त्यांचे हातात साखर कारखान्याची सूत्रे तरी आहेत. म्हणजेच नगर जिल्ह्यातले काँग्रेसचे नेतृत्व साखरी साम्राज्यातच पुष्ट झालेले दिसते. अन्यथा शेवगाव-नेवासा विभागात राज्यमंत्री असलेले श्री. ए. बु. तथा आबासाहेब निंबाळकरांचा पराभव साथे मास्तर असलेल्या कम्युनिस्ट पक्षाचे श्री. वकील मास्तर लंघे यांचेकडून झाला नसता तर नगर उत्तरमध्ये गेली दहा वर्षे आमदार असलेले श्री. कि. बा. म्हस्के यांचा पराभव दादा पाटील शेळके यांनी केला नसता. पाथर्डीत तर काँग्रेस उमेदवार डॉ. यादव खेडकर यांना जनताचे आमदार श्री. बबनराव ढाकणे यांनी वॉक-ओव्हर दिला आहे. अगदी निसटता विजय रिपब्लिकन पक्षाचा जामखेड–कर्जत येथे जनता विरुद्ध झाला आहे. तेथे ॲड. बाजीराव कांबळे केवळ २४ मतांनी जनताचे श्री. बाबूराव भारस्कर यांचे विरोधात आले आहेत. असाच निसटता विजय नगर शहरात जनताचे डॉ. कुमार सप्तर्षि यांना काँग्रेस विरोधात मिळाला आहे.

स्थूल मानाने नगर जिल्ह्यातले हे असे निकाल असल्याने अन्याय झाल्याची जी ओरड होत आहे त्याबद्दल लिहिले पाहिजे. १९३६ सालापासून पूर्वीच्या मुंबई प्रांतापासून ते आजच्या महाराष्ट्र राज्यापर्यंत नगर जिल्ह्याला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व मिळत गेले आहे. स्वर्गीय रावसाहेब पटवर्धन व त्यांचेच बंधु अच्युतराव यांचे नेतृत्वाखाली नगर जिल्ह्याची राजकीय जडणघडण झाल्याने उत्कृष्ट, चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांच्या फळधा या जिल्ह्यात उभ्या राहिल्या व त्याचा साहजिकच परिणाम राजकीय घडामोडींवर झाला. सकस, निःस्वार्थी नेतृत्व तयार असल्याने १९३६ ते १९५७ पर्यंत तरी या जिल्ह्याला नैतिकतेच्या प्रभावामुळे, कोणतेही मंत्रिमंडळ असले तरी योग्य स्थान मिळत गेले. मुंबई प्रांताचे पहिले मंत्रिमंडळ अस्तित्वात आले त्या वेळी कै. कुं सो. तथा भाऊसाहेब फिरोदिया स्पीकर झाले होते तर स्वराज्यातल्या पहिल्याच मंत्रिमंडळात

कै. ल. मा. पाटील कोळसे यांना मंत्रिपद मिळाले होते. (याच कोळसे पाटलांचे कारकीर्दीत मुंबई राज्यात दारूबंदी झाली होती. सहज आठवले म्हणून!) पुढे श्री. बाळासाहेब भारदे सहकारमंत्री झाले व तेच १९७२ पर्यंत तब्बल १० वर्षे सभापती राहिले आणि याच काळात म्हणजे १९६२ ते १९७२ या काळात अॅड. भि. जि. खताळ पाटील, आबासाहेब निंबाळकर व बाबुराव भारस्कर मंत्री झाले. (हा काळ जिल्ह्याचा सुवर्णकाळ म्हणावा लागेल!) १९७२ मध्येही प्रारंभी बा. ता. रुपवते व खताळ मंत्री होते. शंकरराव चव्हाण यांचे कारकीर्दीतही ते होते. 'दादा' आले तेव्हा खताळ बाहेर तर निंबाळकर आत असे झाले आणि तब्बल ४० वर्षे या ना त्या स्वरूपात नगर जिल्ह्याचा प्रतिनिधी मंत्रिमंडळात होता आणि आता त्यात खंड पडला आहे! म्हणून एकदम ओरड सुरू झाली. (कदाचित विस्तारित मंत्रिमंडळात जागा मिळेलही.)

अर्थात ओरड जर सर्व विभागातून, सर्व (निदान काँग्रेसच्या सर्व) कार्यकर्त्यांकडून झाली असती तर एक वेळ ती खरी आहे असे समजावे लागले असते; परंतु ही ओरड केवळ काँग्रेसच्या हितसंबंधी गटाकडूनच होत आहे ही खेदाची बाब आहे. मंत्रिमंडळात नगर जिल्ह्याला प्रतिनिधित्व नाही म्हणून अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेले आमदार शंकरराव काळे असे म्हणू शकतील का, की आम्ही जी ८+१ अशी नऊ आमदारमंडळी काँग्रेसची म्हणून निवडून आलो, त्यांपैकी कोणाही एकाला वा दोघांना मंत्रिमंडळात घ्या? नेमके काळे असे म्हणणार नाहीत. कारण मग काळे–कोल्हे वाद मिटेल ना! आणि वाद मिटला तर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास सरळ रेषेत होईल व तो तसा झाला तर आपली किंमत ती काय राहिली? हे न ओळखण्याइतपत काळे सुज्ञ आहेत. त्यांना नेमके स्वतःचे मोठेपण ठेवून जिल्ह्याचा नेता म्हणून नाव वाढविणे आहे.

एक तर नगर जिल्ह्यात काँग्रेसच्या आमदारांनी आपल्या छातीवर हात ठेवून म्हणावे, की आम्ही काँग्रेसचे प्रथमपासून पाईक आहोत, काँग्रेस संघटनेत आमचा अधिकार आहे. सच्चे काँग्रेसचे चेले म्हणून आम्हाला मंत्रिमंडळात स्थान हवेच. परंतु काळेप्रभृती आमदारांनी कितीही आव आणला तरी सारा जिल्हा ओळखून आहे की, काळे काय नी कोल्हे काय, हे तर काँग्रेसमध्ये चालू पिढीतच आलेले लोक आहेत. भाऊसाहेब थोरात अण्णासाहेब शिंद्यांचा हात धरून कम्युनिस्ट-पक्षातून काँग्रेसमध्ये आले तर काळे, कोल्हे, निंबाळकर, दादा पाटील, शेळके यांचा पूर्वाश्रमही अगदी लाल नव्हता तरी कडवा शेकापचा रंग त्यांना होता. शिवाजीराव नागवडे तर अगदी आत्ताआत्ता लाल निशाण का कम्युनिस्ट पक्षातून काँग्रेसमध्ये दाखल झाले आहेत. म्हणजे नगर जिल्ह्यातील आजचे काँग्रेसचे नेतृत्व निखळ लालभाईंचे होते असे म्हटले व अशा लालभाईंना मंत्रिमंडळातून वगळले तर तो अन्याय म्हणता येईल काय? खरं याचे उत्तर श्री. काळे यांनी द्यावयाचे आहे.

आजच्या घडीला नगर जिल्ह्यात सालस व सर्वांना बरोबर घेऊन जाणारे नेतृत्वच नाही ही खरी खंत आहे. केवळ साखर कारखान्याचे पैशावर व सत्तेवर सामान्य शेतकरी-वर्गाला अडविणे व त्यांच्या अडचणींचा फायदा घेऊन स्वतःचे नेतृत्व टिकविणे हा पायंडा गेली १०–१५ वर्षे नगर जिल्ह्यात पडला आहे. प्रारंभीचा उमेदवारीचा काळ घालवायला कुठे एखादे सत्तेचे पद मिळाले की काढ. साखर कारखाना आणि एखादे कॉलेज आणि या झुंजी लावून आपसात, आणि दोन्ही गटावर हात ठेवून स्वतःचे नेतृत्व अबाधित ठेव, ही प्रवृत्ती वाढली आहे. सामान्य शेतकरी मतदारांना या बाबतीत दोष देता येणार नाही. हरघडी अनेक अडचणींनी तो बेजार झालेला आहे. त्याला काय काळे निवडून आले तरी रामरामच करावयाचा आहे, कोल्हे आले तरी तेच करावयाचे आहे; कारण 'माझा अर्धा एकर ऊस आहे त्याला खत–पाणी वेळेवर कारखाना देईल का? पाटकरी पाणी वेळेवर सोडील का? सगळी ढोरमेहनत केल्यावर कारखाना ऊस वेळेवर तोडून नेईल का?' या विवंचनेत तो आज पिचत आहे. कुठे नकळत फट्ट झाले आणि चेअरमनची मर्जी फिरली की साराच उन्हाळा ना! त्यापेक्षा काळेदादा रामराम, कोल्हेबाबा रामराम अशी त्याची प्रवृत्ती बनली आहे. या प्रवृत्तीत हळूहळू बदल होत आहे; परंतु त्यासाठी काही वेळ जाऊ देणे योग्य ठरेल. □


प्रकाशित झाले

# टच

कालच्या
बायसिकल थीव्हजपासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी–विदेशी
चित्रपटांची ओळख

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : १० रुपये

परराष्ट्रीय घडामोडी

# इस्राएल : खून का बदला खूनसे लेंगे इत्यादि

चंद्रशेखर पुरंदरे

दोन बोटींमधून अकरा गनीम उतरले. हातात अद्ययावत् शस्त्रास्त्रे-हँडग्रेनेडस् मशीनगन्स वगैरे. किनाऱ्यावर उतरल्या उतरल्या समोर असलेल्या एका युवतीला त्यांनी काही प्रश्न विचारले. मग ठार मारायची धमकी दिली आणि लगेच ठार मारूनही टाकले! तुकडी पुढे सरकली. जाता जाता एका बसला आग लावण्याचे सत्कृत्य त्यांनी पार पाडले. दिवसाढवळया, दुपारी साडेचारला हा प्रकार घडला. ही तर भावी हत्याकांडाची केवळ सुरुवातच होती!

अल् फताह या पॅलेस्टाइन लिबरेशन ऑर्गनायझेशन (PZO) च्या एका गटाच्या दहशतवाद्यांचे हे इस्राएलमध्ये घुसल्यानंतरचे पहिले कृत्य होते.

बसला आग लावल्यानंतर ही अकरा दहशतवाद्यांची टोळी मेन रोडवर आली. तिथे त्यांनी एका पांढऱ्या मर्सिडीज टॅक्सीचा कबजा घेतला. यानंतरच्या घटना फारच वेगाने घडत गेल्या. घटनास्थळ होते इस्राएलचे एक प्रमुख शहर हैफा. गनीमांनी पेटविलेली बस पाहून हैफाकडे येणारी एक बस थांबली. तिच्यावर यांनी टॅक्सीमधून तुफानी गोळीबार केला. मग टॅक्सी सोडून सगळे बसमध्ये घुसले. बसड्रायव्हर मृतप्रायच झाला होता. त्याला बस तेलअवीवकडे नेण्यास मानेवर बंदूक रोखून सांगण्यात आले. अनेक जखमी व काही मृत झालेल्या प्रवाशांना आणि मायेफिरू दहशतवाद्यांना घेऊन बस तेलअवीवच्या दिशेने निघाली. याच बसच्या पुढून चाललेल्या बसला पाहून दहशतवाद्यांनी ड्रायव्हरला ओव्हरटेक करायला सांगितले आणि ओव्हरटेक करताना परत एकदा गोळीबाराच्या फैरी झाडीत शेजारच्या बसमधले बरेच जण खतम केले. या वेळेपर्यंत पोलिसांना खबर पोचली होती. त्यामुळे अडथळे टाकून बसचा रस्ता अडविण्यात आला. हे पाहून खवळलेले गनीम आपल्याच बसमधल्या प्रवाशांकडे परत एकदा वळले आणि पोलिस आणि गनीम यांच्यात हातघाईची चकमक उडाली. एकूण ३७ इस्राएली नागरिक या प्रकारात बळी पडले, ८२ जण जखमी झाले. एक पोलिसही ठार झाला! नऊ गनीम यमसदनाला धाडण्यात आले आणि दोघांना पकडण्यात आले. २५ प्रेते ओळखू न येण्याइतपत जळली होती. त्यात एक पाच वर्षांची मुलगीही होती.

गेल्या तीस वर्षांत दहशतवाद्यांनी जी अनेक माणुसकीला काळिमा लावणारी कृत्ये केली त्यातले हे सगळ्यात भीषण! १९४८ साली इर्गुन स्वाई ल्यूमिन या दहशतवादी संघटनेने अरबांविरुद्ध दायर यासिन नावाच्या खेड्यावर हल्ला करून जवळजवळ दोनशे निष्पाप नागरिक ठार मारले होते. त्यानंतर या विभागात झालेले हे मोठे हत्याकांड! विशेष लक्षणीय गोष्ट म्हणजे या इर्गुन स्वाई ल्यूमिनचा नेता होता मेनाहेन बेगिन. हाच मेनाहेन बेगिन आज इस्राएलचा पंतप्रधान आहे. तेव्हा तो PLO सारखीच पण अर्थातच अरबांच्या विरुद्ध संघटना चालवीत होता. आज त्यालाच अशा कृत्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्याच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठीच जणु या पथकाचे नाव दायर यासिनच ठेवण्यात आले होते. याचे नेतृत्व दलाल मुग्रबी नावाच्या पंचवीस वर्षांच्या तरुणीकडे होते. या पथकाला मुळात आदेश निराळे होते. त्यांनी एक बस पकडून नंतर एखादे मोठे हॉटेल ताब्यात घ्यावे आणि बसच्या प्रवाशांना ओलीस ठेवून ब्रिटिश, रुमानियन मध्यस्थांकरवी बोलणी सुरू करावीत अशी मूळ योजना होती; पण पिसाट दहशतवाद्यांनी अनेक निरपराध नागरिकांचे प्राण घेतले! या घटनेचे राजकीय महत्त्व आता पाहू.

### इस्राएलमधील सद्यःस्थिती

इजिप्तचा अध्यक्ष अन्वर सादात याने इस्राएलला भेट दिल्यावरही इस्राएलने पूर्ण निरुत्साह दाखविलेला होता. त्यामुळे इजिप्तच काय पण मध्यपूर्वेत शांतता असावी असे वाटणारा प्रत्येक देशच हताश झालेला होता. वेस्ट बँक या विवाद्य भूप्रदेशावर इस्राएलचा हक्क आहे या आपल्या भूमिकेपासून तसूभरही ढळायला बेगिन तयार नसल्याने हा पेचप्रसंग ओढवला होता. इस्राएली जनता ही त्या वेळी बेगिनच्या बाजूने उभी होती. पण गेल्या दोनतीन महिन्यात परिस्थिती झपाट्याने बदलत गेली. विशेषतः याच महिन्यात इस्राएली नागरिकही बेगिनला आता शांततेच्याच दृष्टीने पावले टाकावी असे सांगू लागला होता. Peace Now! हे दोन शब्द इस्राएलमध्ये एकदम पॉप्युलर झालेले आहेत. विशेषतः १० मार्चच्या प्रमुख वृत्तपत्रांच्या अंकांमध्ये प्रचंड जाहिराती देऊन 'Peace Now! या घोषणेचा उदोउदो करण्यात आला. पंतप्रधानाला सादातबद्दल समंजस व उदार दृष्टिकोण स्वीकारण्याची विनंती त्यात करण्यात आली. वेस्ट बँक विभागात इस्राएलने वसाहती सुरू केल्याने प्रश्न लोंबकळत पडलेला आहे. १४ जून १९६७ ला इस्राएल जेथे होते तेवढाच प्रदेश इस्राएलचा अशी सर्व अरब राष्ट्रांची भूमिका आहे. जॉर्डनमध्ये वेस्ट बँक हा प्रदेश येतो. त्याबाबतीत थोडीफार तडजोड मंजूर करून बेगिनने हा प्रश्न कायमचा सोडवावा व चिरस्थायी शांततेकडे वाटचाल करावी असे मत व्यक्त होत होते. या सामान्य नागरिकाच्या झुकत्या कलाला खरे वजन प्राप्त झाले ते लष्कराच्याच साडेतीनशे अधिकाऱ्यांनी त्यांना पाठिंबा दिल्यावर. हे साडेतीनशे अधिकारी 'रिझर्व्हिस्ट' म्हणून ओळखले जातात. म्हणजे उद्या अरबांशी युद्ध पेटले की, पहिली तुकडी जी हल्ला करायला जाणार, तिचे हे नेते. लष्कराचे क्रीम असे ज्यांचे वर्णन करता येईल, अशा लोकांनी बेगिनला एक 'ओपन लेटर' लिहिले होते. त्यात हीच मागणी केलेली होती. त्याला

उत्तर म्हणून बेगिनने एक पत्र लिहिले. त्यात त्याचा दुराग्रहच स्पष्ट होतो. पॅलेस्टिनीअनांना एक राष्ट्र इस्राएलशी सीमा भिडवून उभारू देणे म्हणजे रक्तपाताला निमंत्रण देणेच आहे, जुडिआ, गाझा आणि समेरिया यांनी बनलेले पॅलेस्टाइन म्हणजे इस्राएलच्या सुरक्षिततेला सततचा धोका होय वगैरे मुद्दे त्याने त्यात सांगितले, परंतु नवीन काहीच नाही. या साडेतीनशेमध्ये यनवेल नेरिजा म्हणून इस्राएलचे सर्वोच्च युद्धपारितोषिके मिळविणारा कॅप्टनही आहे. १९७३ च्या योम किप्पूरच्या युद्धात फक्त आठ जणांना आपल्याकडच्या परमवीरचक्राप्रमाणे हे पदक देण्यात आले होते. इस्राएलची अन्तर्गत परिस्थिती या हल्ल्याआधी अशी होती. तिच्यात आता गुणात्मक फरक पडला आहे. कारण बेगिनने घेतलेल्या भूमिकेचे समर्थनच होईल असा प्रसंग घडलेला आहे. गुंतागुंतीत भर म्हणून १३ मार्चला बगिन कार्टर बोलणी होणार होती आणि मध्यपूर्वेच्या भवितव्याच्या दृष्टीने ही बोलणी अत्यंत महत्त्वाची ठरणार होती. कारण अमेरिकेने बेगिनकडून शांततेचे वचन घेण्याचा विडाच उचलल्यासारखे केले होते. दुर्दैवाने आता ही भेट किमान आठवडाभर तरी लांबलेली आहे.

## अमेरिकेची भूमिका

कार्टरने मागच्याच आठवड्यात ही बोलणी असफल झाल्यास दोष बेगिनवर राहील असे अप्रत्यक्षरीत्या सूचित केले होते. मूळ प्रश्न असा आहे की वेस्ट बँक हा प्रदेश बेगिनच्या मते 'बळकावलेला' नसून मुक्त केलेला आहे. 'मुक्त केलेला' म्हणजे जो पूर्वापार इस्राएलचाच आहे तो प्रदेश. पर्यायाने हा प्रदेश सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. नेमकी इथेच मेख बसलेली आहे. कार्टरला याची पूर्ण जाणीव आहे की तो एकटा बेगिनवर वेस्ट बँक सोडण्याविषयी दडपण आणू शकणार नाही किंवा दडपण आणल्यास, बेगिन त्या दडपणाला बधणार नाही. म्हणून त्याचा प्रयत्न असा चाललेला आहे की, बेगिनच्याच मंत्रिमंडळातून त्याच्यावर असे दडपण आणायचे. युनायटेड नेशन्सच्या २४२ च्या ठरावानुसार इस्राएलचा या प्रदेशावर हक्क नाही. पण इस्राएलने आजवर अशा अनेक ठरावांना केराची टोपली दाखविलेली आहे. कार्टरने हा प्रश्न एवढा मनावर घेण्याचे कारण असे की, सौदीअरेबियाने तेलाच्या पुरवण्यावरून अमेरिकेचे नाक दाबलेले आहे. फब्रुवारीमध्ये अमेरिकेने सौदीअरेबियाला आणि इजिप्तला प्रचंड प्रमाणात फायटर विमाने पाठवली आणि इस्राएलची संरक्षक शस्त्रांची मागणी निम्म्याने कमी करून घेतली. त्यामुळे इस्राएल नाराज झाला. तसेच व्हाइट हाउसमधली इस्राएलची लॉबीही नाराज झाली. ही नाराजी घालवण्यासाठी व इस्राएलबद्दल सहानुभूती दाखवणाऱ्या सर्व राष्ट्रांचे मत अनुकूल करून घेण्यासाठी त्याच वेळी अरबांनाही फारसे न दुखवता मार्ग काढण्यासाठी कार्टरने बेगिनला पेचात पकडले आहे. त्यामुळे जर ह्या वाटाघाटी फिसकटल्या तर दोष बेगिनवर जाईल आणि ते बहुतांशी खरेही असेल.

अमेरिकेचा या गुंत्यातून बाहेर पडायचा फॉर्म्युला ब्रुकिंग्ज फ्रेमवर्क या नावाने ओळखला जातो. डिसेंबर १९७५ मध्ये अमेरिकेतल्या ब्रुकिंग्ज इन्स्टिटयूशनमधील काही तज्ज्ञांनी येऊन एक तेवीस पानी पुस्तिका काढली. Towards Peace in the Moddle East — हे त्या पुस्तिकेचे नाव. ही पुस्तिका म्हणजे कार्टरच्या धोरणाचा ब्लू प्रिंटच ठरला. किसिंजर परराष्ट्रमंत्री असतानाच त्याची तयारी झालेली होती. सध्याचा कार्टरचा संरक्षणखात्याचा सल्लागार Dr. Zloigniew Brzezinski हाही या तज्ज्ञांमध्ये समाविष्ट होता. या पुस्तिकेचा प्रमुख निष्कर्ष असा होता की, पॅलेस्टाइनचे स्वतंत्र राष्ट्र तरी असायला हवे अगर जॉर्डनशी स्वखुषीने संलग्न झालेले पॅलेस्टिनी लोकांचे राज्य तरी असायला हवे. इस्राएलने या भागातून आपले सैन्य हळूहळू मागे घ्यायचे सुमारे पाच ते आठ वर्षांत इस्राएलने हा प्रदेश सोडायचा आणि पॅलेस्टिन्यांच्या हवाली हा प्रदेश करायचा अशी ही एकूण कल्पना.

बेगिन स्वतः हे सगळे भूभाग इस्राएललाच जोडण्याच्या मताचा आहे; पण यातला प्रमुख धोका असा आहे की, इस्राएलच्या लोकसंख्येच्या ३५·२ टक्के अरब होतील. अरबांच्या लोकसंख्येची वाढ प्रचंड असल्याने १९९३ सालापर्यंत इस्राएलमध्ये ४१ लाख ज्यू आणि ३५ लाख अरब असतील. त्यामुळे जॉर्डन नदीचा संरक्षणव्यवस्थेसाठी वापर करून घ्यायचा आणि बाकी भाग जॉर्डनच्या हवाली करायचा असा बहुतेक मंत्र्यांचा बेगिनला सल्ला आहे.

## बेगिनला अंतर्गत विरोध

बगिनचे मंत्रिमंडळ मुळात अनेक पक्षांचे मिळून बनलेले आहे. 'लिकुड' या नावाने हे सरकार ओळखले जाते. यात इस्राएलचा प्रमुख स्पर्धक एझेर वाइझमान हा संरक्षणमंत्री आहे. हेरुथ पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेला चौपन्न वर्षांचा वाइझमान इस्राएलच्या पहिल्या अध्यक्षाचा पुतण्या आहे. दुसऱ्या महायुद्धात रॉयल एअरफोर्सचा पायलट असलेला वाइझमान त्याच्या उमेदीच्या काळात धाडसी पायलट म्हणून गाजला. शांतता प्रयत्नाने इस्राइलमध्ये जी वावटळ उडली त्यात बहुतेक सगळे मंत्री या ना त्या प्रकाराने त्रस्त झाले आणि लोकांच्या मनातून उतरले. या गदारोळात स्वच्छ प्रतिमा राहिलेला हा एकमेव मंत्री. हा देशात तर लोकप्रिय आहेच पण कार्टरचे आणि सादातचेही त्याच्यावर प्रेम आहे. सादात त्याला 'डिअर एझ्रा म्हणतो.' तो वेस्ट बँकबद्दल एवढा आग्रही नाही. कार्टरशी १३ मार्चला परराष्ट्रमंत्री मोशे दायान आणि पंतप्रधान बेगिनची बोलणी सुरू होणार होती. त्याची पूर्वतयारी म्हणून १० मार्चला वाइझमान वॉशिंग्टनमध्ये हजर झाला. इस्राएलची शांतताप्रयत्नातील गंभीरता दर्शवण्यासाठी वेस्ट बँकमध्ये सध्या ज्या वसाहती वसत आहेत, त्यांच्या पुनर्रचनेचे काम तात्पुरते थांबवण्याची वाइझमानने तयारी दर्शविली. वेस्ट बँकमध्ये या ज्या वसाहती होत आहेत, त्या सरळ सरळ शांतताप्रयत्नातले अडथळे आहेत हे इस्राएललाही चांगलेच माहीत आहे.

या वसाहतींचे काम इस्राएलचा कृषिमंत्री एरिएल रोरॉन याच्या देखरेखीखाली होते. वाइझमानचे आणि या रोरॉनचा प्रचंड वाकडे. त्याचे कारण असे की, हा रोरॉन बेगिनच्या गटातला. वेस्ट बँकबद्दल दुराग्रही आणि वस्तुतः तोच संरक्षणमंत्री व्हायचा; पण त्याच्या जागी वाइझमान झाला. वाइझमानचा कॅबिनेटमधला दुसरा विरोधक म्हणजे उपपंतप्रधान यिगेल यादिन. तिसरा विरोधक बेगिन.

तर वाइझमानने रोरॉनला आपण अमेरिका-भेट संपवून परत येईपर्यंत वसाहतींचे काम पूर्णपणे थांबवून धरण्याची विनंती केली आणि तो वॉशिंग्टनला निघाला. त्याचे विमान सुटले असेल नसेल तोच पंतप्रधान बेगिन, उपपंतप्रधान यादिन आणि कृषिमंत्री शेरॉन यांच्या संमतीने परत वसाहतींच्या पुनर्रचनेचे काम सुरू झाले. तिकडे सायरस व्हान्स आणि कार्टरच्या भुवया

उंचावल्यावर वाइझमानने बेगिनला राजीनाम्याचीच धमकी दिली आणि त्याच्या इच्छेप्रमाणे काम तात्काळ थांबवण्यात आले. हा रोरॉनचा सरळ सरळ पराभव होता. पण तो काहीही करू शकला नाही. उलट त्याला स्वत:च्याच तोंडून रेडिओवरच्या मुलाखतीत हे जाहीर करावे लागले. यामुळे वाइझमानचे वजन बरेच वाढले. बेगिन त्याच्याकडे संशयानेच पहातो. कारण त्याचेच नाव बेगिननंतर कोण? या प्रश्नाचे उत्तर देताना सध्या प्रामुख्याने पुढे येते. एकूण १९ मंत्र्यांपैकी ८ त्याच्या बाजूचे असल्याने निसटत्या बहुमताने बेगिन खुर्ची टिकवून आहे; पण कोणत्याही क्षणी तो पदच्युत होईल इतकी अस्थिरता निर्माण झाली आहे. अमेरिकासुद्धा बेगिनपेक्षा त्याच्यानंतर कोण येतो यावरच शांतताप्रयत्नांच्या आशा ठेवून आहे.

या सगळ्या परिस्थितीची जाणीव असल्याने बेगिन अमेरिकेला वेस्ट बँकमध्ये स्वयंनिर्णयाचा मार्ग पत्करावा असा उपाय आपल्यातर्फे औदार्याचा आव आणून सांगण्याची शक्यता आहे. कारण स्वयंनिर्णयाचा मार्ग जॉर्डनचा राजा हुसेन याला मंजूर नाही. त्यामुळे वाटाघाटींना हुसेन येण्याची शक्यता फेटाळली जाईल आणि हुसेन वाटाघाटींना येणे आवश्यक आहे. तशी सादातने प्रमुख अटच घातलेली आहे. म्हणूनच बेगिनचे स्थानही डळमळीत आहे. लेखाच्या सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे सामान्य माणूसही आता या आक्रमकतेला कंटाळलेला आहे.

## सादातची भूमिका

PLO तर्फे शनिवारचे हत्याकांड होण्याआधीच अमेरिकेच्या रेडिओला मुलाखत देताना सादातने बेगिनविषयी नाराजी प्रकट केली. बेगिनपेक्षा जर पंतप्रधानपदी गोल्डा मायर असती किंवा मोशे दायान जरी असता, तरी हा प्रश्न सुलभतेने सुटला असता असे आपल्याला प्रामाणिकपणे वाटते, असे त्याने सांगितले. सादात त्याच्या ऐतिहासिक भेटीला शून्य प्रतिसाद मिळाल्याने अंमळ खचल्यासारखा झाला आहे. वाइझमानच्या मते तो परत रशियाच्या तंबूत जाण्याची शक्यता आहे आणि मग मात्र शान्ततेची शक्यता कायमची नष्ट होईल. तेव्हा इस्राएलची विश्वासार्हता सादातच्या मनातून पूर्णपणे उतरायच्या आत हालचाल करणे आवश्यक असल्याचे त्याचे प्रतिपादन आहे. सादात अरब जगात आज एकटा पडलेला आहेच. आता अमेरिकेने काही हालचाल केली नाही तर तो सदिच्छा असूनही कुठल्या कुठे फेकला जाईल. PLO चे आणि सादातचे वितुष्ट आता जगजाहीर झाले आहे. नोव्हेंबरमध्ये इस्राएलला भेट दिल्यापासून सादातने PLO बद्दल अक्षरही उच्चारलेले नाही. दोनच आठवड्यांपूर्वी सायप्रसमध्ये युसुफ सिबाए या सादातच्या जिवलग दोस्ताचा खून झाला. त्याची जबाबदारी आपलीच असल्याचे PLO ने मान्य केले आहे. त्यानंतर PLO ने हा गोंधळ घातलाच. या साऱ्या गोष्टींचा परिणाम एका विशिष्ट दिशेने होत आहे. ती म्हणजे इस्राएल व इजिप्त यांच्यात बाकी देशांना लक्षात न घेताच द्विपक्षीय करार होणे.

## या हल्ल्याची प्रतिक्रिया

PLO च्या निर्घृण हल्ल्यानंतर संतप्त बेगिनने पत्रकारपरिषद घेतली. त्यात ज्यूंना ठार मारणारा एकही माणूस शिक्षा मिळाल्याखेरीज रहाणार नाही! असा इशारा दिला आणि पॅलेस्टिनी लोकांच्या प्रमुख वसाहती असलेल्या दक्षिण लेबेनॉनमध्ये आपले सैन्य घुसविले. २५,००० तुकड्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रे घेऊन लेबॅननमध्ये कार्यरत आहेत. त्यांना वायुदलाची प्रचंड सामुग्रीने सज्ज जंबोजेट्स् आणि नौदलाची अवाढव्य जहाजे शस्त्रास्त्रे पुरवीत आहेत. लेबॅननच्याच भूमीवर युद्ध खेळले जाणार हे नक्की! वाइझमानने या हल्ल्यांमागे लेबॅनन असल्याचा आरोप केला आहे. 100 × 10 एवढ्या चौरस कि. मी. प्रदेशात पॅलेस्टिनियन्सना जन्माचा धडा शिकविण्याच्या उद्देशाने प्रचंड ताकदीने सैन्य घुसले आहे आणि ते सुरक्षेची खात्री होईपर्यंत तिथेच राहील असे बेगिनने जाहीर केले आहे. आधीच स्मशानकळा आलेल्या लेबॅननला हा चटका बसणार आहे.

PLO तर्फे स्वत: यासीर अराफतने युद्धआघाडीवर जाण्याची तयारी दर्शविली आहे.

सौदीअरेबियाने दहशतवाद्यांना अमानुष कत्तलीला शौर्याचे कृत्य म्हणून गौरविले आहे आणि मेलेले अकराजण हे हुतात्मे असल्याचे म्हटले आहे.

सादातने PLO वर टीका केली पण इस्राएलने एवढा संयम सोडायला नको होता असे मत व्यक्त केले.

पॅलेस्टिनी छावण्या मात्र इस्राएलच्या भक्षस्थानी पडल्या. इस्राएलने २८० चौरस मैल प्रदेश त्रस्त प्रदेश म्हणून जाहीर केला.

रशियाने दहशतवाद्यांचा उल्लेखही न करता इस्राएलचा हल्ला हा अनैतिक व अमेरिकेच्या सहाय्याने केला असल्याचे म्हटले आहे. इजिप्तशी द्विपक्षीय करार करण्याच्या दृष्टीने चाललेल्या प्रयत्नांचाच हा भाग असल्याचे म्हटले आहे.

रशियन सरकारने ही प्रतिक्रिया व्यक्त केली मात्र. रशियाचा नोबेल प्राइझ विजेता शास्त्रज्ञ आंद्रे साखारोव याने मात्र रशियाचा निषेध करणारा अत्यंत धीरवान मोर्चा मास्कोतून काढला. अवघे पंचवीसच जण या मोर्चात सामील झाले होते. रशियनांनी दहशतवाद्यांच्या हल्ल्याचा आधी दोनच दिवस यासीर असफहाला आसरा दिल्याच्या निषेधार्थ हा मोर्चा होता. पॅलेस्टिनी दहशतवाद्यांना पाठिंबा दिल्याबद्दल रशियन सरकारला दोष देणारे एक निषेधपत्रकही त्याने प्रसृत केले. 'खुन्यांचे पाठिराखे असलेले हे सरकार आहे' अशा घोषणा साखारोव व त्याची बायको असलेला हा मोर्चा देत होता. साखारोव स्वत: ज्यू नाही; पण त्याच्या बायकोची आई ज्यू होती.

लेबॅननमध्ये आजवर इस्राएली फौजा घुसल्या नाहीत असे नाही; पण आतापर्यंत लेबॅननमधल्या ख्रिश्चनांना मदत करणे एवढेच त्यांचे मर्यादित उद्दिष्ट असे. आता मात्र फौजा तेथेच मुक्काम ठोकणार असे दिसते. ही गोष्ट शांतता-प्रयत्नांच्या दृष्टीने फार वाईट झाली. सादातने म्हटल्याप्रमाणे इस्राएलने इतका मोठा हल्ला करायला नको होता.

PLO च्या लोकांच्या सापळ्यात त्यामुळे बेगिन स्वत:हून सापडला आहे. शान्ततेचे प्रयत्न उधळणे हा PLO चा प्रमुख उद्देश होता. त्यांच्याविषयीची सहानुभूती कमी झाली तरी त्यांना त्याची पर्वा नाही हे स्पष्ट होते. म्हणून बेगिन अमेरिकेला जायच्या आदल्या दिवशी त्यांनी हा बनाव घडवून आणला. बेगिनने डोके थंड ठेवून त्यांना पुरेसे उत्तर देऊन तावडतोब बोलणी करणे हे श्रेयस्कर असताना त्याच जुन्या तिकिटावर तो सूडाचा तोच जुना खेळ करीत राहिला तर मध्यपूर्व रक्तपाताच्या कर्दमातून वर उठायची आशा कायमची नष्ट होईल. □

· कथा

# निळा पक्षी

विष्णु गुंजाळ

नाकाच्या शेंड्यावर राग तर भारी येतो. परत नकट्या नाकावर एक सणसणीत ठोसा. असह्य होतं मग. चीड येते. मन आवरतच नाही.

पहिलं दिसत नव्हतं का ? की डोळे फुटले होते ?...

प्रेम होतं ना तुझ्यावर !

दर्जेदार अभिनय. काळजाचे माझ्या लचके तोडणारा. ठीक आहे. चिडला आहेसच तू. तापल्या तव्यावर पाणी नाही ओतू तर करू तरी काय मी ? आईला जाऊन अजून तासभरही झाला नाही. कसं आयुष्य कंठणार आहोत आपण या माणसाबरोबर ? अखेर तुला हवं आहे तरी काय ? कधी कळणार आहे तुझं मन मला ? लग्नाला मीच सम्मती दिली असं नाही. तडजोड तुलाही मान्य असेल. मग आता का चिडतोस ? मी चिडत नाही म्हणून ? ह्यात माझं काही न्यून्य शोधू नकोस ! चिडेन की. वेळ आली तर मीही चिडेन. तू असं समजू नकोस. माणूसच आहे मी. किती सहन करीन ? अरे, आता कुठं सुरुवात आहे. साध्या साध्या गोष्टीत तू नमतं घेत नाहीस. मीच नमतं घ्यावं अशी का तुझी धारणा आहे ? घेते बापडी. काय करणार ? टँकमध्ये पोहणारी मी. खळखळत्या प्रवाहात नसेल हात मारता येत मला; पण तू असं समजू नकोस, खळखळाट म्हणजे भीतीच असते. तो खळखळाट पाहिला आहे मी. उडी मीही घेतली होती; पण मन आवरलं. हात मारायच्या आधीच काठाला लागले. मला माहीत आहे. तेवढी शक्ति नाहीय माझ्यात.

तुझा मित्र. त्याची बायको, मुलगा, आल्यापासून पाहते आहे. कौतुक जरूर करावं माणसानं; पण एवढं ? असेल सुंदर तुझ्या मित्राची बायको. नाही कुठं म्हणतेय मी. म्हणून तर म्हणायला गेले. वाटणारच माणसाला. 'अशी बायको तुला हवी होती.'

काही नव्हतं माझ्या मनात, खरंच काही नव्हतं; पण ठेचून ठेचून रक्तबंबाळ केलंस माझं मन ! हे आजच आहे असं नाही. लग्न झाल्यापासून हेच अनुभवते आहे मी. कधी हौसेनं फिरायला आलायस, का कधी मौजेनं बोललायस, का कधी कौतुकानं रंगलायस, कधी कधी नाही ! मी असं म्हणत नाही की, तू अरसिक आहेस; पण किती चिडावं माणसानं क्षुल्लक कारणांसाठी ? मी बायको आहे तुझी. वाद करून करून पार दुबळी करून टाकली आहेस मला. का रे बाबा ? तू कसंही वागावं नि तरी मी निमूटपणे तुझ्या कुशीत शिरावं ? तुझ्या लहरी सांभाळाव्या ? वीट येणार नाही माणसाला ? तरी मी काही बोलत नाही. तू म्हणशील; तू बोलत नाहीस पण आईला मात्र वकिली करायला लावतेस. किती दिवस करणार आहे वकिली ? हात जोडते. तिला बिचारीला नाहक मधे ओढू नकोस ! तू सरळ तोडून बोलतोस.

तुझा माझा काय संबंध ?

माझा कुणी धनी आहे का ?

तुला हवं ते कर. मला विचारू नको, हे का बोलणं ? थरकाप होतो बघ माझा; पण एका शब्दानं मी तुला कधी सांगितलं नाही. माझं नशीब माझ्या पदरी. तू असंच 'हे' चालू ठेवलंस तर ? काय करणार मी ? आणि माझं बळही तू जाणतोसच. रागावलास तर दोन दोन दिवस तू बोलत नाहीस माझ्याशी ! घर गिळून टाकतं मला. पण काय करू शकते मी ? घरात कुणी मोठं असतं तर सांगितलं तरी असतं. करतं एखादे वेळी मन माझं बंड. मारतं उसळी; पण लचके तोडतोस तू काळजाचे म्हणून मी गप्प बसते. ऐकून घेते. तुझ्या ह्या अशा वागण्यानं निर्लज्ज झाले आहे बघ. होती नव्हती तेवढी सारी शक्ति गळून गेली आहे माझी. तू रागवावं, चिडावं, आदळआपट करावी. थरथरत्या मनानं मी निमूटपणे सहन करावं. लहर तुझी गेली की, जिवाचा कोंडमारा करून तुझ्या कुशीत शिरावं ! काय नशिबी माझ्या वाढून ठेवलं आहे देव जाणे !

अरे, तडजोड तू केलीस. मला काय, मला कुणीही चाललं असतं. विशेष असं लायकिंग माझं नव्हतंच कधी. माझी माणसं माझं वाईट करणार नाहीत याची खात्री होती मला. मी असंही म्हणत नाही की, माझ्या माणसांनी फसवलं मला. कसं म्हणेन ? त्यांच्या अपेक्षेपेक्षा तू सरसच होतास. चांगला गोरागोमटा, देखणा नवरा, खानदान, माझ्यासारख्या सामान्य मुलीला मिळाला तर लोक हेवाच करतील माझा. आणि खरं सांगते, मीही तशी दुःखी नाहीय. खरं सांगते. दुःखी नाहीय मी. अद्याप तुला कसला वाईट नाद नाही. लेखन-वाचनाव्यतिरिक्त कसला छंद नाही; पण रात्रंदिवस कसल्या तरी तंद्रीत असतोस तू. कसल्या तरी विचारात गुरफटलेला. लहर फिरली की, लागला आरडाओरडा करायला. मी काय समजणार ? आईला वाटतं, मी तुझं मन जिंकावं, म्हणून ती बोलते. तुला वाटतं. ती वकिली करते. तू सरळ सरळ वार करतोस झुडपं छाटावी तसा.

एक दिवस उट्टं काढून टाकीन !

मला गरीब गाईवर वार करायला आवडत नाही, हे का बोलणं झालं ?

समजते ना मी. समजते मी. तुझ्याशी झुंजायला, तुझ्याशी टकरा घ्यायला, हरघडी फणा काढून तुला दंश करायला नागीणच हवी होती. सुस्कारे टाकण्याव्यतिरिक्त मी काहीच करत नाही, म्हणून तर मी तुझी जोड एखाद्या मातब्बर मुलीशी घालते. मनातल्या मनात तुमची झुंज पहात राहते. तुला कळत नाही. तू अर्थाचा अनर्थ करतोस.

मी आपला घुम्यानं स्वयंपाक आटोपला नि तुला हाक मारली. वाढलं आहे. जेवायला चल.

जागेवरून रेसभरही तू हलला नाहीस. मी जागा सोडली असती तर ताडकन् माझ्या मुस्कटात दिली असतीस तू. म्हणून मी मग वाढलेलं ताट झाकून ठेवलं नि कॉटवर पडले.

हिशोब करीत. माझा माझ्या नशिबाशी मेळ जमतो का ह्याचा ! झोप कशी येणार? तुला बोलवावं तर. तू आधीच चिडलेला. नाही बोलवावं तर...

म्हणून मग मनाचा धडा केला नि तुझा हात धरला. झोपायला ओढलं.

पाया पडते तुझ्या. अशा विषयावर परत मला छेडू नकोस. डोकं फुटायची वेळ आली आहे माझी.

टचकन् डोळ्यांना पाणी आलं. डोकं थापटता थापटता म्हणालास,

जेवायला ओढून नेलं असतंस तर मेली असतीस. मनाच्या तारेवर बसलेला निळा पक्षी भुर्रकन् उडून गेला. तार झणझणत राहिली.

□

पुस्तके

# समुद्रकविता

**प्रातिनिधिक आशयाच्या कविता !**

श्री. गुरुनाथ धुरींच्या कविता यापूर्वीही 'सत्यकथे'तून वाचलेल्या होत्या. (खरं तर त्या त्या वेळेस त्या नजरेखालून गेल्या असंच म्हणायला हवं, कारण त्या समजून घेण्यातच खूप वेळ जात असे.) अभिव्यक्तीतील वेगळेपणा प्रथमदर्शनीच नजरेत भरण्यासारखा– त्यामुळे या कविता नेहेमीच्या, बहुसंख्य लयबद्ध कवितांसारख्या नाहीत हे कळायला फारसा वेळ लागला नाही. त्यामानाने 'आशय' मात्र क्षीण वाटायचा. प्रतिमा 'वापरल्या' आहेत असं वाटे. त्यांची 'अपरिहार्यता' जाणवतच नसे. कित्येकदा तर मुद्दाम जाणूनबुजून वेगळ्या वाटेनं जाण्यासाठी ही दुर्बोधता येते किंवा काय असाही विचार चमकून जात असे. (आणि दलित कवींच्या संदर्भात या विचाराचे अनेकदा चर्वितचर्वण झालेलेही आहे.) या पार्श्वभूमीवर 'समुद्रकविता' हाती आल्या तेव्हा अती उत्सुकतेनंच मी त्या वाचल्या आणि ही सगळी पार्श्वभूमी स्पष्टपणानं मनात होती तरीही 'कविता' म्हणून त्यांचं वाचन पूर्ण कोरं होतं.

'समुद्रकविते'तील सर्व कवितांना एक प्रातिनिधिक आशय आहे– आणि तो एक प्रकारच्या विषण्ण करून टाकणाऱ्या वेदनेचा आहे– स्थिर नैराश्याचा आहे. कधी ही वेदना सौम्य शब्दातल्या थंड (शांत नव्हे. 'शांत' आणि 'थंड' या दोन्हीत फरक आहे.) स्वरातून व्यक्त होते, तर कधी आक्रोशाने जाब विचारू बघते. 'एकटीच नांगरून पडलेली विलक्षण शांततेची बोट'

जिच्या डेकवर एकटाच मी उभा अनुभवत विराटसुंदर रंगीत भास हे भास आहेत– पण ते दिसणं आणि बघणं दोन्ही अटळ आहे– कारण 'कुणास ठाऊक किती युगं चाललीय ही बोट किती युगं चालणाराय' आपण तिच्यात आहोत इतकच खरं! (कारण तेवढच जाणवतंय. त्याला आपलाही इलाज नाही.) मग काळोखातून काळोखात जगण्यापलीकडे हातात काहीच उरत नाही: फक्त पुढल्या क्षणाची वाट पहात त्याला तोंड देणं, पराभव घेण्याची तयारी ठेवून जगणं हा शहाणपणा ! इतरांनी घरासमोर रांगोळी घालावी असं वाटत असेल तर स्वतःच्या आयुष्याची राख-रांगोळी करावी लागते. हे तर परंपरेनं सिद्ध केलेलं सत्य ! पण अशा आयुष्यातही कधी तरी कोणाच्या तरी डोळा सय दाटून येते आणि मग 'क्षणार्धात उजळून जातो एका आयुष्याचा अर्थ– कोंडलेल्या हुंदक्यासारखा !'

'इथून तिथून वरून खालून आजूबाजूनी कसलं तरी भयद अदृष्ट चालून येतं.

आयुष्याची एक एक ढलपी गळून पडते
आणि एक विकृतच तेवढं
अमावास्येच्या भुतासारखं भिववीत रहातं

एक सावकाश मरण काळ्या ढगासारखं छातीवरून आभाळात वाहातं हे काय किंवा 'ऑपरेटर,' 'फुलांचा गुच्छ,' 'सर्वांच्या सर्व चेहेऱ्यांच्या आठवणी' ह्या सर्व कविता एकाकीपणाचे, विफलतेचे आर्त सूर भरून राहिलेले 'विलाप' आहेत. अशा विदारक वस्तुस्थितीतूनच मग 'साला माणूस म्हणजे माणूस नाहीच' असे तीव्र कडवट उद्गार निघतात. चहू अंगांनी विस्तारलेल्या झाडांनी चंद्रताऱ्यांना देखील झाकून टाकलंय.('झाडांनो' ही कविता मला अत्यंत आवडलेल्या धुरींच्या दोन-तीन कवितांपैकी एक आहे.) मग त्यांची हिरवीकोवळी सावली काळे सावटच होणार आणि त्या सावटाखालीच, सुखदुःख-भयव्यामोहनिराशेची ओझी घेऊन नांदणारे आपण गतानुगतिक जंतू ! ('ऑपरेटर') काळोखाचे काळेकुट्ट सावट धुरींच्या बहुतेक कवितांवर आहे. आपल्यालाही ही अंधारयात्रा खिन्न करून टाकते. मृत्यूबद्दल वाटणारं विलक्षण कुतूहल, ओढ, त्याच्या जाणिवेनं येणारी अस्वस्थता तर कधी निःसंज्ञता ह्यांचे अनेकानेक आविष्कार धुरींच्या प्रतिभांतून व्यक्त झालेले दिसतात.

ही वेदना स्वप्नभंगाचीही आहे. ज्या काही हळव्या स्वरातल्या कविता ह्या संग्रहात आहेत, त्या रूढार्थानं 'प्रेमकविता' (परीकथेतल्या किशोरानं फुलाफुलाची चादर इ.) म्हणता येतील अशा आहेत. तुडुंब हिरव्या रानात कधी तरी एक कावळा झेपावला आहे– बुडूनही गेला आहे– मनाचे काठही ढासळलेले आहेत – ('तुडुंब हिरवेपण रानाचे') पण आता मात्र शुभ्र संगमरवरी निर्जनपणाच्या दाराशी, टवटवीत पॉलिश केलेल्या पितळी कुंडीखाली पंख पसरून तो गतप्राण झालेला आहे आणि आता उरल्या आहेत त्या फक्त आठवणी– डबडबलेले डोळे! असफल प्रेमकहाणीच्या ह्या आलापांपैकी 'तीन कविता– तिच्या'

ही मला सर्वात आवडलेली कविता ! ('बाक सार्वजनिक बागेतलं') ही देखील चांगल्या प्रतिभात्मक कवितांपैकी एक 'लकेर.' पाशी ही व्यक्ती सापेक्ष अनुभूति संपते आणि पुढच्या सर्व कविता म्हणजे सामाजिक क्रान्तीचे जाहिरनामे आहेत. इशाऱ्याच्या रात्रीचे हे कोमलभीषण क्षणकार खोलवर ढवळून टाकीत नाहीत. धुरींच्या ह्या सर्व कविता वाचताना त्याच जातीचे नामदेव ढसाळ किंवा नारायण सुर्वे आठवत रहातात.

'भुसा भरलेले भोत दिसूनही थांबणे कठीण होत आहे. कोठारात काडी न पडेल याची हमी देणे कठीण होत आहे' ह्या सुर्व्यांच्या ओळी किंवा 'आज मेणबत्तीसारखी जळतात माणसे चौकाचौकातुन, रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो, किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी; मरेपर्यंत रहायचे का असेच युद्धकैदी ?' ह्या ढसाळांच्या ओळींना जी धार आहे तशी धार, तेवढी ताकद धुरींच्या प्रतिमात नाही. (असं मला वाटतं.) कित्येक ठिकाणी प्रतिमा जुनाट वाटतात. ('कविता') प्रथम म्हटल्याप्रमाणे त्या क्वचित दुर्बोधही वाटतात. धुरींनी म्हटल्याप्रमाणे 'अर्थाचे नवेच दालन उघडल्यासारखे' ही वाटत नाही किंवा त्यांच्या प्रतिमांतील घटक नवनवीन संकल्पना धारण करून आलेले आहेत असेही जाणवत नाहीत. आणखी एक गोष्ट, या कवितांबद्दल विचार करतानाच जाणवते ती अशी की, धुरींची स्वप्नं ही सर्वसामान्य पातळीवरच रहातात. 'सर्वसाधारण मध्यमवर्गीय रोमँटिक' स्वप्नांपेक्षा ती फारशी वेगळी नाहीत. ('कॅफे आयडियल') या आशयाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पुढे लावलेला क्रांतीचा खडा सूर म्हणूनच विसंगत (कधी कधी तर केविलवाणाही !) वाटत रहातो. त्यामुळे खोलवर आपला ठसा उमटविणाऱ्या

किंवा दीर्घ काळ रेंगाळणाऱ्या, तळागासून अस्वस्थ करणाऱ्या, अनुभवसंघटनेलाच धक्के देणाऱ्या अशा ह्या कविता नाहीतच.

तरीदेखील 'समुद्रकविता' संग्रही हव्यातच! ह्याचे प्रमुख कारण म्हणजे श्री. घुरींनी ह्या संग्रहाला लिहिलेली प्रस्तावना. (मुद्दाम हा उल्लेख अखेरीस केलेला आहे. आधी प्रस्तावना मग कविता अशा क्रमाने मी संग्रह वाचलेला नाही.) 'दशपदी'च्या अनिलांच्या प्रस्तावनेप्रमाणेच ही प्रस्तावनाही अतिशय सुरेख आहे. सुखाची गोष्ट म्हणजे त्यात स्वतःच्या कवितांबद्दल स्पष्टीकरणे (तीही थोडीच आहेत.) असली तरी समर्थने अजिबात नाहीत. सृजनशील कलावंताची निर्मितिप्रक्रिया, व्यावहारिक अनुभवाचा कलानुभव होताना त्यात येणारे अनेकानेक अडथळे, अनुभव भोगतानाच टिकवाव्या लागणाऱ्या अलिप्ततेत येणारे विक्षेप, ती टिकविण्यासाठी करावी लागणारी 'साधना,' व्यावहारिक जीवनात होणारी तगमग, ऐच्छिक पातळीवरच्या 'लुटण्या'त सतत व्यत्यय आणू पहाणारे 'जगणे' ह्या सर्व गोष्टी घुरींच्या स्वतःच्या कलात्मक आनंदाशी व स्वातंत्र्याशी असलेल्या बांधिलकीची तीव्रता जाणवून देतात. दिसामासानं ओटीपोटात वाढणारी आग आनंदानं, मनःपूर्वकतेनं जोपासणारा हा कवी आहे हे तर खरंच! पण मनःपूर्वकता ही गोष्ट काही चांगल्या कवितेची हमी होऊ शकेल असं नाही! तेव्हा—

—रेखा इनामदार

## चला अन्य ग्रहांवर

मराठी भाषेत शास्त्रीय विषयांवरील पुस्तकाची फारच उणीव असताना, सतत मराठी भाषेत शास्त्रीय लेखन करणारे डॉ. चिं. श्री. कर्वे अभिनंदनास पात्र आहेत.

शास्त्रीय पुस्तकाचं यश मुख्यतः त्यांच्या सामान्यीकरणावर (generalization) अवलंबून असतं. सामान्यीकरणाची ही हातोटी लेखकाच्या लेखणीत असल्यामुळेच की काय हे पुस्तक सामान्यातील सामान्य वाचकांपर्यंत जाण्यास हरकत नाही. मात्र 'अंतराळात वाहणारा सौरवारा' हे प्रकरण अवघड भाषेत आहे.

पुस्तकातील माहिती अद्यावत् आहे. धूमकेतू, लघुग्रह, सौरवारा, जीवसृष्टी आणि ग्रह यांचं सखोल विवेचन करणारं मराठी भाषेतलं हे एकमेव पुस्तक असावं. शिवाय छायाचित्रं आणि रेखाटनांच्या योगाने वाचकांना अधिक माहिती देण्याचा उद्देशही प्रशंसनीय आहे.

ज्योतिर्विज्ञानाची चर्चा करताना लेखकानं ज्योतिषविज्ञानाची महत्ताही विशद केली आहे. प्रत्येक प्रकरणाची खेळकर सुरुवात ही याबाबतीत स्तुत्य ठरावी.

मात्र लेखकाने अंतरे (distances), व्यास वगैरे सांगताना जुनी एकके, उदा. मैल, फूट, इंच इ. वापरली आहेत. अतिप्रगत विज्ञानाची साधक-बाधक चर्चा करताना जुनी एकेक वापरली जावीत हे आश्चर्य आहे. वास्तविक याऐवजी मीटर्स, किलोमीटर्स ही एकके अपेक्षित आहेत.

शिवाय पुस्तकाची किंमत आणि आकार यातला विरोध जाणवल्याशिवाय राहात नाही. सामान्य माणसापर्यंत ज्योतिर्विज्ञान जायला या किमतीचा अडथळा मात्र आला. पुस्तकाचे मुद्रण आणि एकंदरीत रेखीवता, सुंदर मुखपृष्ठ इत्यादी गोष्टी लक्षात घेताही 'सहा रुपये' ही किंमत अवाजवीच नव्हे काय?

तरीही मी म्हणेन की, लेखकाच्या या पुस्तकाचे मोल इतर भाषांतरित पुस्तकांहून जास्त आहे. गेल्या वीस वर्षांतील शास्त्रीय प्रगतीचा आढावा घेताना लेखकाने भूत, वर्तमान आणि भविष्याचा केलेला विचार कौतुकास्पद असून या सुंदर शैलीतच लेखकाचं यश आहे असे मी म्हणेन. हे शास्त्रीय पुस्तक सर्वच बाबींचा विचार करता यशस्वी झालंय यात शंका नाही!

—उमेश घोडके

चला अन्य ग्रहांवर
लेखक: डॉ. चिं. श्री. कर्वे
प्रकाशक: के. वि. कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.

# आमचे ग्रंथालय

## The Water

THE WATER OF LIFE

(A Treatise on urine Therapy)
By J. W. Armstrong
Jupiter Books, Sarananpur,
Pages 141, Rs. 9-60.

गेल्या काही वर्षांत ॲक्युपंक्चर, शिवाम्बु सायकिक सर्जरी (फिलिपाइन्सचे डॉक्टर्स जसे बोटाने ऑपरेशन करतात तसे) भावातीत ध्यान (ट्रान्सेंडेटल मेडिटेशन) योग, बायोफीड बेक, अल्फा लहरी वगैरे अनेक अर्थशास्त्रोक्त व शास्त्रोक्त विषयांवर बरीच पुस्तके निघाली आहेत. या विषयावर सारखी नवीन नवीन माहिती बाहेर येत आहे. अगदी अलीकडे पाश्चात्य देशात एक वेगळीच क्रांती होत आहे. काही मॉरफाइनयुक्त औषधांमुळे आपल्या भावनांवर संपूर्ण नियंत्रण ठेवता येईल असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. कदाचित् या 'सायकॉट्रॉपिक' ड्रग्जमुळे एक वेगळेच दालन उघडेल व त्या दालनातून इतर अनेक दालने उघडतील. या गजबजलेल्या विसाव्या शतकाअखेर माणूस हा एका वेगळ्याच उंबरठ्यावर खरंच उभा राहील.

खरे तर 'शिवाम्बु'वर पंतप्रधानांनी शिक्कामोर्तब केला. पंतप्रधानांनी त्याचा अनुनय घेतला म्हणून त्याला एक प्रकारची मान्यता प्राप्त झाली. त्या शास्त्राभोवती एक वेगळेच वलय निर्माण झाले. आता-आतापर्यंत शिवाम्बु ही काय चीज आहे हे बऱ्याच लोकांना माहितीही नव्हते!

शिवाम्बु हे शास्त्र तसे आपल्या भारतात हजारो वर्षांचे जुने आहे. फक्त पाश्चात्य औषधीय पद्धतीत त्याची दखल घेतली गेली नसल्यामुळे ते मागे राहिले आहे. नेहमीप्रमाणे पाश्चात्य देशांत पौर्वात्य देशांतील एखाद्या जुन्या सिद्धांताबद्दल पहिली प्रतिक्रिया अत्यंत तिटकाऱ्याची व 'सुपीरिॲरिटी कॉम्प्लेक्स'ची असते. ॲक्युपंक्चर बघा, योग बघा,

मेडिटेशन बघा. हे सर्व पहिल्याने 'ते अशक्य आहे' या प्रतिक्रियेनंतर आता तिकडे एकदम लोकप्रिय झाले आहेत. शिवाम्बुचेही कदाचित तसेच होईल. कदाचित इतके की, ते कोकाकोलासारख्या बाटल्यांत मिळायला लागेल! 'पिस्की' (Piss म्हणजे लघुशंका करणे) वगैरे आकर्षक नावाखाली!

मला स्वतःला सुरुवातीला या शास्त्राबद्दल तिटकाराच वाटला. माझ्या आयुष्यात 'पिस्कीच्या' सेवनाने १० वर्षे जरी अधिक वाढली तरी मी हा प्रकार काही करणार नाही' असा मी निश्चय केला आहे. निसर्गाने जे बाहेर फेकून देण्यासाठी निर्माण केले आहे ते हिणकस, टॉक्सिक असलेच पाहिजे याची मला खात्री वाटत होती; पण मध्येच केव्हा तरी कुठे तरी बातमी वाचतो (एखाद्या विश्वसनीय नियतकालिकात) की, मानवी मूत्रातून काढलेल्या एक्स्ट्रॅक्टस्‌च्या इंजेक्शन्समुळे 'थ्रॉम्बॉसिस' होत नाही. पुरुषांच्या मूत्रातून डॉ. मॅक्झेल यांनी एक 'युरोकिनेज' नावाचे द्रव्य काढले आहे. याची इंजेक्शन्स शिरेत दिल्यामुळे 'ब्लड क्लॉट' होत नाही. ऑपरेशन करताना एका सर्जनलाच हार्ट अ‍ॅटॅक आला असता त्याला 'युरोकिनेज' दिले गेले. त्याला इतके बरे वाटले की, तो लागलीच खाटेवरून उठून, आपले ऑपरेशन पुरे करण्यास तयार झाला! आमच्या डहाणू गावात मी लहान असताना एका चांभाराच्या पंजाला काम करताना खोल जखम झाली होती. लगेच तो उठला व त्याच्यावर त्याने लघुशंका केली. ते बघून मी हृतबलच झालो. शिवाम्बुसाठी केलेला आणखी एक युक्तिवाद बघा. कोणत्याही वकिलाला तो आवडेल! ऑर्गॅनिक खतासाठी आपण काय वापरतो? शेण, हेही निसर्गाने टाकून देण्यासाठी निर्माण केलेले नाही का? त्या खतातून वनस्पतिजीवनाला कसा बहर येतो! तसेच मूत्रामधील क्षार, हारमोन्स वगैरे महत्त्वाच्या घटकांमुळे मानवी जीवनाला का बहर येणार नाही?

लायनस पॉलिंग (नोबेल प्राईझ विनर) म्हणतात की, व्हिटॅमिन 'सी'मुळे बरेच रोग आटोक्यात येतात. लहान मुलामध्ये कमी I. Q.? द्या व्हिटॅमिन सी. स्मरणशक्ती वाढवायची आहे? त्यासाठी C सारखे दुसरे काही नाही! सरदी–पडसं झालं आहे? C म्हणजे रामबाण! कॅन्सरशी झगडायचे आहे? टाका पोटात अ‍ॅस्कॉर्बिक अ‍ॅसिड! (हे C चे दुसरे नाव आहे.) अ‍ॅस्कॉर्बिक अ‍ॅसिड हे अ‍ॅसिड नसतेच मुळी! त्याने कोणताही अपाय होत नाही. जास्त घेतले तरी ते लघवीच्या वाटे निघून जाते असे लायनस पॉलिंग म्हणतात. इथे एक लिंक लागली बघा. 'पिस्की' स्ट्रॉंग हवी असेल तर घ्या व्हिटॅमिन सी!

या पुस्तकात आर्मस्ट्रॉंगनेही या रोगांवर 'पिस्की' रामबाण उपाय आहे असे सांगितले आहे. खरे म्हणजे लायनस पॉलिंगच्या पुस्तकातील '*Vitamin C*' ऐवजी आर्मस्ट्रॉंगच्या पुस्तकात 'मूत्र' हा शब्द आहे एवढेच.

आता 'पिस्की'ची थट्टा पुरे झाली. 'पिस्कीत मानवी शरीरासाठी काही उपयुक्त द्रव्ये असतीलही. असायलाच पाहिजेत! निसर्गात सर्व पदार्थांना उपयुक्तता असते. व्हिटॅमिन सी हे सुद्धा एका ठराविक मर्यादेपर्यंत पुष्कळच उपयुक्त असते; पण 'सर्व रोगांवर रामबाण उपाय' ही भूमिका अतिशयोक्तीची वाटते. चुकीची वाटते. शिवाम्बु या विषयावर आणखीन संशोधन करायला हवे. 'पिस्की'ला 'रिफाइन' करून पॅलॅटेबल स्वरूपात आणायला हवे!

आता आर्मस्ट्रॉंग यांनी शिवाम्बूने बरे केलेले काही रोग बघू या.

एका माणसाच्या हाताला बंदुकीच्या गोळीमुळे जखम झाली होती. ही जखम १० इंच लांब व जवळजवळ पाऊण इंच रुंद होती. डॉक्टरांनी बरेच प्रयोग करून पाहिले; पण त्यांना यश येईना. शेवटी या जखमेचे रूपांतर गॅंग्रेन (मांसपाक, कोथ) मध्ये होते की काय अशी त्यांना धास्ती वाटली. शेवटी पेशंट कंटाळून आर्मस्ट्रॉंगकडे आला. आर्मस्ट्रॉंगने दिवसातून ३ वेळा जुन्या मूत्राने जखम धुतली. त्या पेशंटच्या सबंध शरीराला याच जुन्या मूत्राने मालिश केले. तीन दिवस पेशंटला फक्त शिवाम्बुवर व थंड पाण्यावर ठेवले. मधेमधे त्याला सूर्यप्रकाश दिला व सात दिवसांत जखम जवळजवळ बरी झाली! याआधी पेशंटने एक वर्षभर iatrogenesis (डॉक्टरनी पेशंटची केलेली हानी) सहन केला होता!

एक हार्टचा पेशंट होता. तो भोवळ येऊन सारखा रस्त्यात पडायचा. रस्त्यात बशुद्ध झाल्यावर काय करावे याची चिठ्ठी त्याच्या कपड्यांना चिकटवून ठेवली होती! त्याला डॉक्टरांनी ऑपरेशनचा सल्ला दिला; परंतु शेवटी वैतागून तो आर्मस्ट्रॉंगकडे आला. आर्मस्ट्रॉंगने अर्थात् त्याला लागलीच शिवाम्बुवर ठेवले. प्रथम गढूळ व दुर्गंधीयुक्त असलेले त्याचे मूत्र पुढे थोडेसे नितळ झाले. आर्मस्ट्रॉंगने पेशंटला त्याच्याच मूत्राने मालिश करायला सांगितले. (मालिश करताना तोंड, घसा व पाय हे अवयव महत्त्वाचे असतात असे आर्मस्ट्रॉंग लिहितात.) आर्मस्ट्रॉंगने मालिश करताना स्वतःच्या मूत्राचाही वापर केला! मालिश झाल्यानंतर पेशंटला साध्या कोमट पाण्याने धुण्यात आले. आर्मस्ट्रॉंगनी त्याला दिवसातून फक्त एकदा खाण्यास सांगितले. पथ्य पाळायला पण सांगितले. अर्थात् काही काळाने पेशंट एकदम बरा झाला!

या पुस्तकात आर्मस्ट्रॉंगनी अशा बऱ्याच केस हिस्टरीज दिल्या आहेत.

पुस्तकात 'ऑब्जेक्टिव्ह' दृष्टिकोन कमी आहे. आर्मस्ट्रॉंगना असे वाटते की, कोणताही आजार शिवाम्बुने बरा करता येतो. 'स्ट्रक्चरल डिफेक्टस्' फक्त बरे करता येत नाहीत.

मुंबईचे 'हार्ट स्पेशालिस्ट' डॉ. दाते हेही शिवाम्बुपासून ज्यांना फायदा झाला त्या पेशंटकडून माहिती गोळा करीत आहेत.

या पुस्तकात मुद्रणदोष बरेच आहेत.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

चित्रपट परीक्षण

सदानंद बोरसे

# दरवाजा

## शक्यतो लवकर बंद व्हावा

*'India's First Horror Film'* अशी जाहिरात करीत-करीतच एफ्. यू. रामसे यांचा 'दरवाजा' उघडला. रामसेसाहेबांनी त्यांच्या यापूर्वीच्या 'एक नन्ही-मुन्नी लडकी थी' आणि 'दो गज़ ज़मीन के नीचे' या चित्रपटांची जाहिरातही बहुधा अशीच केली होती. आणखी किती 'India's First Horror Films' ते दाखविणार आहेत, कोण जाणे? मुंबईला सध्या 'द ओमेन' आणि 'द एक्झॉर्सिस्ट' या नावाचे दोन विलायती सिनेमे अतिशय गाजवून राहिले आहेत. त्यांच्या थिएटरबाहेर लागणाऱ्या मैलोगणती लांब रांगांच्या, पाचचे पंचवीसला चालणाऱ्या ब्लॅकच्या, अमेरिकेत त्या चित्रपटांना थिएटरबाहेर थांबणाऱ्या ॲम्ब्युलन्सच्या आणि लोकांना भीतीने आलेल्या हार्ट-ॲटॅकच्या दंतकथा बहुतेक सगळयांच्याच दाती झालेल्या आहेत. आता एवढी उंची विलायती न चाखता आपले हिंदी निर्माते कोरडे राहू शकतील का? भराभर आपल्याकडेही तसल्याच दंतकथा प्रसवण्याच्या ईर्षेने horror सिनेमे व्हायला लागले असावेत. 'दरवाजा' त्यातीलच एक. शिवाय जादुटोना आणि हैवान हे प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. आणखीही बरेच निघतील.

तर हे दरवाजाप्रकरण आहे तरी काय?

ठाकूर प्रतापसिंग या शिमागो गावच्या ठाकुराने धर्मा नामक कालीमातेच्या भक्ताला जिवंत जाळल्याने धर्माची आई ठाकुराला त्याचा 'निर्वंश होईल' असा शाप देते. त्या शापाला भिऊन ठाकूर आपल्या लहानग्या मुलाला–सूरजला–मुंबईला पाठवतो. छोटा सूरज जवान होतो; पण सतत त्याचा एक स्वप्न पाठपुरावा करते. जणू जागेपणी बंद असलेला दरवाजा उघडून झोपेत ते स्वप्न त्याच्या मनात घुसते. (म्हणून नाव 'दरवाजा.') या प्रकाराचा शोध घेण्यासाठी सूरज व त्याची पत्नी रचना शिमागोला आपल्या हवेलीत राहण्यासाठी जातात. त्या हवेलीचा ठरल्याप्रमाणे खुनाखुनीबद्दल दुर्लौकिक असतोच. शेवटी रहस्य उघडकीला येते ते असे की, ठाकूर प्रतापसिंगाचे त्याच्या मनातील वाईट विचारांच्या परिणामाने राक्षसात रूपांतर होते आणि मग तो खून करतो. अखेर कालीमातेच्या त्रिशूळाने मृत्यू होऊन त्याला मुक्ती मिळते.

यात योग्य ते कल्पनारम्य संदर्भ टाकले, तर 'शिमागोचा राक्षस' किंवा 'कालीमातेचा शाप' किंवा 'जादूचा त्रिशूळ' किंवा तत्सम कोणती तरी बालकथा सहज आकाराला येईल इतर रहस्यपटांप्रमाणे या भीतीपटाची जाहिरातही आहे, 'प्रारंभ चुकवू नका व शेवट कुणालाही सांगू नका!' या जाहिरातीतील फोलपणा माहीत असूनही आपण बऱ्याचदा तिला बळी पडतो. 'दरवाजा'च्या बाबतीत कोणाचीही तशी अवस्था होऊ नये म्हणूनच मी हा शेवट आणि ही कथा एवढया विस्ताराने व प्रामाणिकपणे खरीखुरी सांगून टाकली आहे.

एक विद्रूप (भयानक नव्हे) चेहरा, त्या चेहऱ्याखाली आडदांड शरीर आणि या संयोगातून तयार होणाऱ्या प्राण्याच्या हातून (त्या हातांना आणि पायांना लांब नखे ओघाने आलीच.) आठ-बारा मुडदे पाडणे या गोष्टी एकत्र कालवून दाखवल्या की, एक भीतिपट तयार अशी कथालेखक कुमार रामसे आणि दिग्दर्शक तुलसी व श्याम (हे दोघेही रामसे) यांची कल्पना असावी. माणसाला मन नावाची एक चीज असते आणि त्यात भय, भीती नावाची भावना वाटते, हे त्यांच्या डोक्यात शिरलेले दिसत नाही. हिचकॉकचा सायको किंवा इंग्रजी चित्रपटांमध्ये गाजणारे ड्रॅक्यूलाचे भीतिपट हे काही केवळ ओबडधोबड चेहरे, कानठळ्या बसविणाऱ्या किंकाळ्या अन् रहस्यमय संगीत यांच्या मिसळीतून जन्माला आलेले नाहीत. कॅमेऱ्याने टिपलेले प्रत्येक दृश्य, एकापुढे एक मांडलेले प्रसंग आणि साउंड-ट्रॅकवरील प्रत्येक आवाज (इतकेच काय निःशब्द शांतताही) प्रेक्षकाच्या मनाचा हळूहळू ताबा घेत जातात आणि हा ताबा इतका विलक्षण प्रभावी असतो की, मग एखादा हलकासा धक्काही हृदयाचे ठोके चुकवायला पुरेसा असतो. ही जाण न ठेवता भीतिपट काढायचा म्हणून सगळ्या गोष्टी जमवायच्या आणि त्याला पूर्णतः विसंगत अशी ठिगळे शिवून टाकायची असल्या उद्योगांमुळे हिंदीत निखळ भीतिपट निघालेच नाहीत.

दरवाजा भीतिपट आहे, असा त्याच्या निर्माता-दिग्दर्शकांचा (वा जाहिरातकारांचा) दावा; पण नायक सूरज मुंबईचा म्हटला की, सगळं शहरी, sophisticated वातावरण आहे, दारू पिऊन बाललीला करणे आहे, नायकाला एक गोड नायिका आहे, दोघांना म्हणायला गाणी आहेत, करायला लग्न आहे, प्रेम आहे, इतकेच काय नायिकेवर बलात्काराचा प्रयत्न आहे, शूर नायकाने तिची केलेली सुटका आहे, दोन घराण्यांमधील दुष्मनीसुद्धा आहे! आता हे सगळे प्रकार भीतिपटात असू नयेत, असे मी म्हणत नाही. असावेत–जरूर असावेत; पण केव्हा? जर चित्रपटाच्या कथेला चित्रपटातून अपेक्षित असणाऱ्या भयरसाला त्यांची जरूर असेल, ते पोषक ठरत असतील तर आणि तरच! 'दरवाजा'मध्ये भयनिर्मितीपेक्षा विनोदनिर्मिती करण्यासाठीच हे प्रसंग असावेत. त्यातून तीही साध्य होत नाही, ही गोष्ट वेगळी. शिवाय हे प्रसंग घेतल्यानंतर ते तरी थोडेसे वास्तव घ्यावेत, निदान अगदी खोटे वाटतील, इतके अवास्तव घेऊ नयेत; पण 'इतकी सतर्कता भीती वाटत असताना प्रेक्षकाला सुचणारच नाही' असा सुज्ञ विचार करून 'दरवाजा'त वाटेल ते प्रसंग टाकले आहेत. उदाहरणार्थ– सूरज शिमागोला पोहोचल्यानंतर धर्माचा धाकटा भाऊ शाकाल त्याला तलवारीच्या द्वंद्वाचे आव्हान देतो. एका बाजूला रानरेड्याचे बळ असलेला, लहानपणापासूनच तलवारीचे हात फिरवीत वाढलेला शाकाल; तर दुसऱ्या बाजूला मुंबईत सुखात, चैनीत वाढलेला, आयुष्यात कधी तलवार पाहिली असेल की नाही शंका, मग हातात धरणे सोडाच! असा विसविशीत दंडांचा सूरज. निकाल उघडच आहे; पण सूरज फिल्मी नायक ना, मग त्याने मुंबईतही तलवार फिरविण्याचे शिक्षण घेतलेले असणारच, इतकेच काय तो ज्युडोतही पारंगत

असलाच पाहिजे ! मग काय ? चवके सूरज धाकालचा पराभव करतो अन् काय ! तेव्हा अशा विनोदी घटनाही चित्रपटात कधीच न वाटणारी भीती प्रेक्षकांपासून आणखी लांब नेतात. शिवाय वाटेल त्या फुटकळ प्रसंगांमधून प्रेक्षकाला बागुलबोवा दाखविण्याचा प्रयत्न करणे ही युक्ती तर पार 'बीस साल बाद' अन् 'वह कौन थी' मध्येही वापरली आहे. 'दरवाजा'तसुद्धा एक वेडा, एक म्हातारी, एक नोकर, एक घुबड, एक मुंगुस, वटवाघळे अशा निरनिराळ्या पात्रांकरवी असे बुजगावणी बागुलबुवे दाखविले आहेत. शेवटी ही ठिगळप्रसंगांची मालिका कॅब्रेशीच तुलनीय अशा एका सेक्सी नृत्यापाशी येऊन पोहोचली. (शीतल आणि अंजू महेंद्रू या दोघींना बहुधा या नाचासाठीच फक्त घेतले असावे.) आणखी एका प्रकाराचा फक्त उल्लेख करतो. 'दरवाजा'ची तथाकथित भीतिकथा ज्या पायावर उभी आहे—माणसाचा राक्षस, राक्षसाचा माणूस—ते जंतरमंतर दाखविताना दाखविलेला प्रकार म्हणजे ते रूपांतर भीतिदायक नाहीच; पण विलक्षण किळसवाणे आहे, हीच गोष्ट त्या राक्षसाच्या स्वरूपाबद्दल. या गोष्टींमध्ये दिग्दर्शकाने बीभत्स-रस अगदी ठेचून व चेचून भरला आहे व रंगभूषाकाराने त्याला अतिशय मनोभावे मदत केली आहे.

चित्रपटाच्या युनिटमध्ये बहुसंख्य रामसेंचाच भरणा आहे. चौघांचा उल्लेख येऊन गेला. उरलेले म्हणजे निर्माता किरणे रामसे आणि छायाचित्रकार गंगू व केशू रामसे. गंगू व केशूंनी चित्रपटाची टायटल्स आणि गुहांमधील काही शॉट्स बरे म्हणजे काहीसे भीतिदायक वाटतील इतके बरे घेतले आहेत; पण हा परिणाम स्वच्छ घुतला जाऊन प्रेक्षक पुरेपूर निर्भय कसा बनेल याची उत्तम काळजी दिग्दर्शक-द्वयाने घेतली आहे.

अभिनेते व अभिनेत्री यांनी चित्रपटास लावलेला हातभार त्याला खांदा देण्यास पुरेसा आहे. बहुतेक सगळ्यांनीच आपली विनोदी कामे करण्याची हौस मनसोक्त भागवून घेतली असावी.

गीते नक्श ल्यालपुरींची. त्यात अन्य बहुसंख्य हिंदी फिल्मी गीतांप्रमाणेच अर्थाऐवजी शब्द वापरलेले. सपन-जगमोहननी गाणी बरी दिली आहेत, अमितकुमारचाच वापर ही एक उल्लेखनीय बाब. बाकी संपूर्ण चित्रपटभर त्यांनी दिलेले कर्कश पार्श्वसंगीत सतत कानठळयाच बसवीत राहते. पात्रांचा सतत चालणारा आरडाओरडा व किंचाळ्या पुढचे कानाचा पडदा फाडण्याचे काम करून टाकतात.

तर असा हा दरवाजा जितक्या लवकर बंद होईल, तितके बरे. *

---

# एफ. सी. सी. तर्फे

---

*पुण्यातील 'फडरेशन ऑफ फिल्म सोसायटी' या संस्थेतर्फे* नुकतेच तीन चित्रपट दाखविण्यात आले. त्यांपैकी दोन चित्रपटांना उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली. एक अर्जेंटाइन चित्रपट होता— On a beach by the sea आणि दुसरा फ्रेंच— A hard day for the queen.

एफ्. एफ्. एस्. ही संस्था विख्यात व वेचक चित्रपट दाखविण्याबद्दल नाणावलेली आहे. निरनिराळ्या महोत्सवांमधून गाजलेले चित्रपट आपल्या सभासदांसाठी सादर करणे, हे या संस्थेचे एक प्रमुख काम. वर उल्लेखिलेला अर्जेंटाइन चित्रपटही मद्रास चित्रपट-महोत्सवात सादर केलेला होता.

---

## On A Beach By The Sea

---

दिग्दर्शक–Enrique C.hen Salaberry
संगीत– Horacio Malvicino.

डोनाल्ड नावाचा एक संगीतवेडा तरुण, वडिलांचा त्या संगीताला असलेला विरोध आणि त्याने पदवी घेऊन आपल्या धंद्यात पडावे अशी असलेली इच्छा, यातून त्याने घर सोडणे आणि मग संगीतातून मिळालेली कीर्ती आणि पदवी (आणि एक छोकरी) घेऊन परतणे अशी हिंदी चित्रपटाला चांगलीच समांतर जाणारी कथा.

संगीतवेडा तरुण म्हटल्यावर चित्रपटात संगीताला अत्यंत महत्त्व असणे, अपरिहार्यच आहे. साधारणत: आपल्याकडे गाजणाऱ्या बहुचर्चित व बहुऐकित पाश्चात्य रेकॉर्डसवरून त्याच्या गोडीविषयी फारसे बरे मत होत नाही; पण बहुतेक विदेशी चित्रपटांमधील गाणी हे मत बदलविणारी असतात. या चित्रपटातही असलेली सर्व गाणी (विशेषत: डोनाल्डच्या तोंडची) आणि चित्रपटाचे एकूण संगीतही अतिशय श्रवणीय होते. अतिशय भन्नाट हिडम असूनही गाणे कुठेही कर्कश होत नव्हते.

बाकी डोनाल्ड, रॉबर्ट बल्बोआ (डोनाल्डचे वडील) आणि अलेजांद्रा (डोनाल्डची प्रेयसी) या भूमिका वठविणाऱ्या कलाकारांची सुरेख कामे आणि छायाचित्रण या चित्रपटाच्या जमेच्या बाजू. अत्यंत मिस्किल संवाद (जे इंग्रजी सब-टायट्ल्समुळेच समजले) हे एक वैशिष्टय. *

---

## A Hard Day For The Queen

---

एक सामान्य स्त्री.तिने आपल्या मुलाचे प्रेम यशस्वी होण्यासाठी केलेले प्रयत्न, सोसलेला छळ आणि बरोबर अशान्व घडलेल्या घटना—एका राणीच्या आयुष्यात. या दोन धाग्यांचा विणलेला गोफ म्हणजे हा फ्रेंच चित्रपट. जेनी ही बाई, तिचा तापट नवरा अल्बर्ट, त्यांच्या मुलाला विनाकारण भोगावा लागलेला तुरुंगवास, या शिक्षेमुळे दुरावलेल्या पत्नीला जवळ आणण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न, त्यात जेनीने केलेली मदत आणि तिची झालेली कुचंबणा.

आणि

एक राणी, तिचा तसाच तापट राजा. प्रेमासाठी बंड करणारा त्यांचा मुलगा, राज्यक्रांती, त्यात जेनीची झालेली होलपट हे दोन्ही प्रवाह काहीशा विस्कळितपणे आणि निष्काळजीपणाने एकमेकांत घुसविले आहेत. कदाचित भाषेच्या अडचणीमुळे ते विस्कळित वाटले असावेत, त्याच कारणामुळे काही प्रसंगही संदर्भरहित राहिले; पण एकूण कथेची कल्पना भन्नाट होती.

वर उल्लेखिलेले प्रसंग त्याच क्रमाने दिग्दर्शकाने एकमेकांत घुसविले होते, ही मांडणीची पद्धतही थोडी अवघड पण नवी होती.

या चित्रपटातही जेनी व अल्बर्ट या दोन प्रमुख भूमिका करणाऱ्या कलाकारांचा अभिनय ही अतिशय मोठी जमेची बाजू.

दोन्ही चित्रपटांमधून काही थोडेसे नवे पाहायला आणि ऐकायला मिळाले, हेच समाधान. □

# अवती–भवती : पृष्ठ ४ वरून

निवडणुकीच्या गप्पा मारतात. मोकळ्या वातावरणात लोकेच्छा वेळोवेळी व्यक्त झाल्याच पाहिजेत असे आग्रहाने सांगतात आणि घटनात्मक अधिकाराचे जे केंद्रीकरण भुत्तो यांनी केले आहे ते मोडून काढण्याची इच्छा व्यक्त करतात. हे करण्यामागे पंतप्रधान हा सत्तापिपासू, हुकुमशहा होऊ नये हाच आपला उद्देश असल्याचे सांगतात आणि असे सांगत असतानाच स्वतःच्या सत्तेची बळकट चौकटही निर्माण करतात !

बदललेल्या राजकीय परिस्थितीतही भुत्तो हाच पाकिस्तानमध्ये चर्चेचा विषय झालेला आहे. त्यात आता त्यांना फाशी फर्मावण्यात आली असल्याने त्यांच्याबद्दलचे उलटसुलट विचार सतत व्यक्त होत राहणारच. भुत्तो यांच्या बाजूने आज त्यांची पत्नी नसरत उभी असली तरी भुत्तो सत्तेवर असताना सत्तेची सूत्रे मोठ्या प्रमाणात हुस्ना नावाची त्यांची तिसरी पत्नी हाताळत होती. अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये ती सहभागी असे. अमर्याद सत्ता उपभोगणाऱ्या व्यक्तीच्या हातची सत्ता गेली तर त्याचे साथीदारही कसे उलटून पडतात याचा अनुभवही आपल्याला आहेच. पाकिस्तानातही काही फारशी वेगळी परिस्थिती नाही. भुत्तो यांच्या मंत्रिमंडळामध्ये कायदेमंत्री म्हणून काम केलेले मिया महोमद मसुरी आता म्हणतात–भुत्तोंच्या सत्तेइतकी भ्रष्टाचारी सत्ता आमच्या पहाण्यात नाही ! त्यांनी सारी शासकीय यंत्रणा व्यक्तिगत सेवा देणारी खाजगी यंत्रणा करून टाकली. त्यांच्या काळात जेवढे वृत्तपत्रीय स्वातंत्र्य होते, त्यापेक्षा जास्त स्वातंत्र्य आज वृत्तपत्रांना मिळत आहे. भुत्तो यांच्या जमान्याचे कधीही न विसरता येण्यासारखे काळे पर्व असेच वर्णन करावे लागेल ! माझ्यासारख्या एके काळच्या सहकाऱ्यालाही चोरी करणे, सरकारी अधिकाऱ्यांना मारपीट करणे यासारखे बालिश आरोप करून अटक करण्यात आली. बरोबर या विरुद्धची मतेही भरपूर ऐकावयास मिळतात. लाहोरहून प्रसिद्ध होणाऱ्या 'न्यूज पॉइंट' या साप्ताहिकाचे संपादक आणि डाव्या विचारसरणीचे तरुण नेते तादिकअलि यांचे वडील मजहरअली खान म्हणतात–भुत्तो या नावाभोवती एक अजब वलय तयार झाले आहे. त्यांच्या सत्ताकाळामध्ये अनेक फायदे मिळाल्याने आज ते अखेरच्या पर्वामध्ये असले तरीही कामगारवर्गामध्ये त्यांना फार मोठा पाठिंबा आहे. जनतेमधील त्यांच्या लोकप्रियतेची चुणुक गेल्या वर्षी त्यांची जेव्हा सुटका करण्यात आली त्या वेळी दिसून आली. सत्याहत्तरच्या डिसेंबरमध्ये सुटून आल्यावर लाहोरमध्ये त्यांचे जे प्रचंड स्वागत करण्यात आले ते पाहून लष्करी सत्ताधारीही हादरले ! भुत्तो यांना तुरुंगात ठेवून अथवा त्यांचा सर्वनाश करून जरी निवडणुका घेण्यात आल्या तरी केवळ त्यांच्या नावाचा उपयोग करून पाकिस्तान पीपल्स पार्टी हा त्यांचा पक्ष सत्तेवर येईल.

भुत्तो यांच्या कुटुंबियांबद्दलही जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात उत्सुकता आहे. जनाब भुत्तो यांच्या अटकेविरुद्ध त्यांच्या पत्नीने जी निदर्शने केली विशेषतः पाकिस्तान व इंग्लंड यांच्या दरम्यान लाहोर येथील गडाफी स्टेडियमवर झालेल्या क्रिकेटसामन्याचे वेळी जी निदर्शने करण्यात आली त्याला ऐनवेळी मोठा प्रतिसादही मिळाला. नसरत भुत्तो यांना मारहाण झाली; पण त्याचा परिणाम म्हणून त्यांना लोकांची मोठ्या प्रमाणात सहानुभूती मिळून कालपरवापर्यंत घराबाहेर न पडणारी ही बाई एकदम लोकप्रिय झाली ! सहानुभूतीची जी मोठी लाट उसळली त्याचा पुरेपूर फायदा तिने करून घेतला. पाकिस्तानमध्ये सात वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या भुत्तो यांच्या पक्षामध्ये बारीकसारीक मतभेद असले तरी भुत्तो यांचे नेतृत्व वादातीत आहे. पाकिस्तानमधील अन्य राजकीय पक्षांची अवस्था मोठी विचित्र आहे. भुत्तो यांच्या पक्षाला विरोध हे त्यांचे मुख्य सूत्र आहे. केवळ एकाच भूमिकेबाबत त्यांचे एकमत असल्याने आठ पक्षांनी एकत्र येऊन पाकिस्तान राष्ट्रीय आघाडीची स्थापना केली. जमात–इ–इस्लामचे नेते मौलाना मुफ्ति महंमद खान अब्दुलवालीखान आदींकडे आघाडीचे नेतृत्व होते. त्यातही खान अब्दुल वालीखान यांची अलीकडेच सुटका झाली आणि त्यांनी विरोधी पक्षाच्या आघाडीचा पाठपुरावा केला. तथापि वालीखान यांनी लष्करी राजवटीचे स्वागत केल्याने त्यांच्याबद्दल लोकांमध्ये नाराजी निर्माण झाली. विरोधी पक्षांच्या आघाडीची अवस्था काही फारशी चांगली नाही. विविध विचारांची मंडळी एकत्र आल्याने या आघाडीला काही निश्चित कार्यक्रम देता आला नाही. आर्थिक प्रश्नावर बहुविध मतभेद आणि राजकीय आघाडीवर व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेचा पाठपुरावा यामुळे आघाडीला एकजिनसी पक्षाचे स्वरूप कधीच आले नाही. सत्तेवर असूनही भारतामध्ये जनता पक्षाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. पाकिस्तानमध्ये जनता पक्षाप्रमाणे विविध राजकीय पक्ष एका पक्षात विलीन झाले नाहीत तर त्यांनी केवळ आघाडी निर्माण केली, आणि अशी आघाडी म्हणजे तर विविध विषयांवरील मतभेदांची बजबजपुरीच असते. पाकिस्तानमधील विरोधी पक्षांची ही आघाडी काही याला अपवाद नाही. जनरल झिया उल हक् देशात खरोखरच निवडणुका घेणार आहेत का ? लोकशाहीवर त्यांचा विश्वास आहे का ? याबद्दल अनेक मतभेद आहेत. तथापि ज्या पद्धतीने सध्या तेथील राजशकट हाकरला जात आहे ते पाहिले तर सत्तेवर त्यांनी घट्ट मांड ठोकलेली दिसते आणि हाती आलेली सत्ता ते लवकर आणि सहजासहजी सोडतील असे दिसत नाही. फार तर विरोधी आघाडीमधील काही निवडक लोकांना आपल्याबरोबर घेऊन ते आपल्या संपूर्ण लष्करी सत्तेला नागरी कवच घालतील. नागरी अधिकारांच्या बाबतीत झिया किती कठोर वागू शकतात याची झलक त्यांनी दूरदर्शनकेंद्रावरील नाराज मंडळींचा काटा ज्या पद्धतीने काढला त्यामध्ये पहावयास मिळते. दूरदर्शनावरील नाराज अधिकाऱ्यांना पंधरा पंधरा फटके मारून एक वर्षासाठी तुरुंगात पाठविण्यात आले प्रसिद्धि-माध्यमावर त्यांचे स्वतःचे बारीक लक्ष असून आकाशवाणी, दूरदर्शन वा वृत्तपत्रे या तीन्हींवर सरकारचे कडक नियंत्रण आहे. झियांची ही घट्ट पकड किती काळ राहील हे सांगणे कठीण असले तरी सध्या तरी एका ५४ वर्षांच्या कडव्या लष्करी अधिकाऱ्याच्या मगरमिठीत आपण पूर्णपणे सापडलो आहोत याची जनतेला जाणीव असल्याने फक्त सत्तास्थानी

असलेला माणूस बदलला, बाकी सारा प्रकार तोच ! उलट बंधने जास्तच जाचक अशी ही लोकांची भावना आहे. त्यातून सत्ता ही एक तात्पुरती व्यवस्था आहे हे जे प्रारंभी सांगण्यात आले होते त्यात काही अर्थ नाही हे लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे.सत्ता लष्कराच्या हातात आल्यावर सर्वसाधारणपणे किमती कोसळतात. सर्वोच्च स्थानी असलेल्या लष्करी अधिकाऱ्याभोवती एक वलय निर्माण होते. अयुबखान किंवा याह्याखान यांच्याभोवती ते जरूर होते; परंतु झिया यांच्याभोवती असे वलय नाही. निवडणुकांबाबतच्या त्यांच्या बोलण्यावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. भुत्तो यांची कन्या बेनिझिर म्हणते–आमचे राष्ट्रपिता कायदे आझाम महंमदअली जीना राष्ट्रनिर्मितीनंतर केवळ एक वर्षात निधन पावल्याने आमची अपरिमित हानी झाली ! राजकीय पक्षाची वाढ खुरटली आणि लष्करी अधिकाऱ्यांनी अनेक वेळा सत्ता बळकाविली. सध्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करताना ती म्हणते–राजकीय पक्षांनी लष्कराला आमंत्रित करण्याचा प्रकार सहसा कोठे पहावयास मिळत नाही; पण पाकिस्तानमधील विरोधी पक्षांनी लष्कराशी हातमिळवणी केली आणि लष्करशाही आणविली. आज भुत्तो यांना फाशीची सजा फर्माविण्यात आली आहे. ही शिक्षा घोषित होण्यापूर्वीच बेनझिरने न्यायालयाबाबत म्हटले आहे–आमच्या न्यायालयांनी जनतेची सतत निराशाच केली आहे. हत्यारासारखा त्यांचा वापर करून घेण्यात येतो आणि तेही राजाश्रयाखाली काम करणे पसंत करतात. वडिलांना वाचविण्यासाठी तू काय करशील असा प्रश्न भुत्तोंच्या कन्येला विचारला असता ती म्हणाली, वडिलांसाठी मी काहीही करीन ! मला नक्की माहीत आहे की माझे पिताजी निष्पाप आहेत ! आज सत्तेवर असलेल्या मंडळींना आपणच अनिर्बंधकाळपर्यंत सत्तेवर रहावे असे वाटते. भुत्तो यांचे अस्तित्व हा एक मोठा अडथळा आहे. त्यासाठीच त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला असून त्यांना कायदेशीररीत्या शिक्षा दिली जात आहे असे भासविण्यात येत आहे. ◻

## ◻ गानसम्राज्ञी नूरजहाँ....एक प्रस्थ

पाकिस्तानच्या निर्मितीबरोबरच पाकिस्तानमध्ये गेलेल्या नूरजहाँ या गायिकेबाबतचा तपशील दिल्याखेरीज पाकिस्तानचा हा फेरफटका पूर्ण होऊ शकत नाही. पाकिस्तानची सांस्कृतिक राजधानी म्हणून लाहोरचा उल्लेख केला जातो. एका जमान्यात मुंबईच्या चित्रजगताला परिचित असलेल्या नूरजहाँ या गायिकेला पाकिस्तानच्या सांस्कृतिक जगतामध्ये असाधारण महत्त्व आहे. जनतेमध्ये ती विलक्षण लोकप्रिय असून लोक तिच्याबद्दल अतीव आदराने बोलतात. केवळ पाकिस्तानमध्येच नाही. तर हिंदुस्थानातही ती अजून लोकप्रिय असून अनेक भारतीय नागरिकांची तिला अजूनही पत्रे येतात. आज ती अभिनेत्री म्हणून प्रसिद्ध नाही. हे क्षेत्र तिने केव्हाच सोडले असले तरी आघाडीची गायिका म्हणून तिचा पहिल्या क्रमांकाने उल्लेख करावा लागेल. तिने गाइलेल्या दोन ते तीन गाण्यांचे रोज ध्वनिमुद्रण होते. तिच्या आवाजातील पन्नास ध्वनिमुद्रिका महिन्याभरात बाजारात येणे ही काही आश्चर्याची गोष्ट समजली जात नाही. आजवर तिने इतकी गाणी गाइली आहेत की, त्या साऱ्या गाण्यांचा तपशील देणे अथवा काही निवडक गाण्यांची क्रमवारी ठरविणे आपल्याला अशक्य असल्याचेच ती सांगते. हिंदुस्थानाबद्दल विशेषत: मुंबईबद्दल ती खोदून खोदून विचारते. तिच्या प्रश्नात उत्सुकता, आपुलकी डोकवत असते. भारतामध्ये येऊन भारतीय रसिकांसमोर गाण्याची तिची अतीव इच्छा आहे; परंतु ती अद्यापी पूर्ण होऊ शकली नाही. दोन–चार प्रथम श्रेणीचे कव्वाल भारतात आले तर त्यांनी एकच धमाल उडवून दिली. समजा, जर उद्या खरंच नूरजहाँ भारतात आली तर तिचे अभूतपूर्व स्वागत होईल. भारतामध्ये येण्याची तिची इच्छा असली तरी सरकार तिला याबाबतीत जराही उत्तेजन देत नाही. उलट अधिकाऱ्यांकडून तिला असे सांगितले जाते की, बाईजी, आपण जर भारतात गेलात, तर आपले भारतीय चहाते आपल्याला परत जाऊच देणार नाहीत ! भारतामध्ये यायला मिळाले नाही तरी अधिकाऱ्यांच्या या असल्या उद्‌गारांनी ती सुखावते.

बाईंना एकूण सहा मुले आहेत. त्यांपैकी मुंबईमध्ये जन्मलेला मोठा मुलगा अकबर आपल्या वडिलांबरोबर एक फिल्म स्टुडिओ चालवितो. नूरजहाँ या नावाचा पाकिस्तानच्या साऱ्या सांस्कृतिक जगामध्ये जसा दबदबा आहे तसाच तो घरातही आहे. आपल्या आईबद्दल बोलताना तो म्हणतो–आमच्या माताजी म्हणजे एक शक्तिशाली प्रस्थ आहेत. वर्चस्व गाजविणे हा तिचा स्वभावधर्मच आहे. केवळ घरामधील माणसांवरच त्यांचे वर्चस्व आहे असे नाही; तर बाहेर व्यावसाइकांमध्ये तिच्या नावाचा फार मोठा दबदबा आहे. 'तिचे गाण्याचे कार्यक्रम जेव्हा होतात, तेव्हा ते वैशिष्टपूर्ण असतात. आपल्या गाण्याने संतुष्ट झालेल्या प्रेक्षकांचा ती शाही पद्धतीने निरोप घेते. एखाद्या छायाचित्रासाठी ती उभी रहाते आणि सुहास्य वदनाने आपल्या गाडीत जाऊन बसते आणि हात हलवीत सर्वांचा निरोप घेते. ती केवळ स्वरसम्राज्ञी नाही, तर तिचे स्थान त्याहून महत्त्वाचे आहे. प्रत्यक्ष राजकारणापासून आणि राजकरणी व्यक्तीपासून ती जास्तीत जास्त अलिप्त राहते. ◻

होते. फावड्यात अभिप्रेत असणाऱ्या विधायक कार्याकडे लोहियावाद्यांनी दुर्लक्ष केले, विधायक कामाशिवाय संघर्ष अपूर्णच राहतो ही गोष्ट खरीच आहे.

तथापी संघर्षाकडेही पाठ फिरवून चालत नाही हे खुद्द अनेक गोष्टींवर संघर्ष करणाऱ्या माजगावकरांनाही मान्य असावे. जनता पक्षाला अंत्योदयाकडे लक्ष द्यायचे आहे. आर्थिक स्तरावर ग्रामीण शेतमजूर आणि छोटे शेतकरी लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यांना न्याय देण्याची घोषणा जेव्हा जनता पक्ष करतो तेव्हा जनता पक्षाला हे गृहीत धरावे लागत असते की ग्रामीण भागातला मोठा शेतकरी व अन्यायी बागाईतदार सहजासहजी आपली सत्ता सोडणार नाही, शेतमजूर किंवा छोट्या शेतकऱ्यासाठी कायदेशीर तरतुदी करून काम भागणार नाही. मोठ्यांकडून नाना प्रकारे घातले जाणारे अडथळे दूर करण्यासाठी मजबूत संघर्ष उभा करावा लागेल. सशक्त संघटनेशिवाय ते जमणार नाही. गोदावरी परुळेकरांच्या कामाचा अभ्यास केला तर अशा संघर्षाचे महत्त्व व आवश्यकता सहज लक्षात येते. दुसऱ्या बाजूला दलितांचा प्रश्न आहे. विहिरीवर पाणीही भरू न देण्याइतका कठोर समाज सहजासहजी दलितांचे कल्याण करायला परवानगी देईल असे वाटत नाही. कायदे करणे, प्रबोधन हे अत्यावश्यक मार्ग अपयशी ठरण्याचा अनुभव काय सांगतो? संघर्षाशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. अन्य मार्गही चोखाळत राहावे व संघर्षही करत राहावे. या पद्धतीने या प्रश्नाची सोडवणूक करावी लागेल. अेक गाव अेक पाणवठा हा कार्यक्रम जनता पक्षाने स्वीकारलेला आहे. या कार्यक्रमातही आधी गावकऱ्यांना समजावून देणे, त्यांचे लोकशिक्षण घडवून आणणे यावर प्रथम भर दिला जातोच. पण कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात संघर्ष उभा करावा लागतोच असा अनुभव आलेला आहे.

जनता पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात झोपडपट्ट्यांच्या सुधारणाबाबतचे कलम आहे. कायदे करून आणि आर्थिक तरतुदी करून झोपडपट्टीवाल्यांना सुखी जीवन देण्याचा विचार जनता पक्षाने केला आहे. एवढ्याने काम भागेल ? आजची झोपडपट्ट्यांमधली सामाजिक व्यवस्था पाहता, तेथील अस्तित्वात असलेली दादागिरीची विचित्र आणि नाजूक अवस्था पाहता, केवळ वरील तरतुदींनी जनता पक्ष कार्यक्रम पार पाडू शकेल असे वाटत नाही. संघटनेला संघर्षात उतरल्याशिवाय तो कार्यक्रम पार पाडताच येणार नाही. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत झोपडपट्टीतल्या लोकांना पिळून काढणाऱ्या दादालोकांशीच जनतापक्षाला संगनमत करावे लागले होते.(काही ठिकाणी) यावरून प्रश्न किती जटिल आहे आणि संघर्ष कसा आवश्यक आहे हे लक्षात यावे.

मतलब असा की, संघर्षाच्या पातळीवर दुर्लक्ष होऊ नये. या समाजातले हितसंबंध संपविण्यासाठी संघर्षाची आवश्यकता कायमच भासत राहणार. पुढल्या काळात अशा संघर्षावर लक्ष दिले तर ज्यांच्या कल्याण्याच्या घोषणा जनता पक्ष करित आहे त्या सर्वांच्या जवळ पोचता येईल, त्या सर्वांच्या मनात जनता पक्षाबद्दल सहानुभूती निर्माण करता येईल. मग निवडणुकीत त्यांची मते गमवावी लागणे, अपयश येणे, मग सरकार बनविण्यासाठी खटपटी—लटपटी कराव्या लागणे असल्या भानगडींची जरूरीच लागणार नाही.

ही झाली संघर्षाची बाजू. तशी नवीन नाही. ( पण गेल्या वर्षभरात जनता पक्षानं या बाजूकडे लक्ष दिले नाही. ) या संघर्षाला विधायक कार्याची जोड देण्याचा प्रयोग अजून तरी या देशात यशस्वी व्हायचा आहे. सुजाण कार्यकर्त्यांची वाण नसलेल्या महाराष्ट्रातल्या जनता पक्षाला तरी हे कलम करता येणं अशक्य नाही. आजची परिस्थितीही अशा कार्याला अनुकूल आहे. केंद्रातले सरकार आणि महाराष्ट्रात विधानसभेत निर्माण झालेली ताकद हे दोन घटक विधायक कार्य कोळपून देण्यास समर्थ आहेत. लोकांनाही आता हळूहळू विधायक कार्याची आवश्यकता व महत्त्व कळू लागले आहे. ही गोष्टही महत्वाची आहे. विधायक कार्य करण्यातूनच संघटना बांधणी व समांतर सरकार साकारू शकेल हा माजगावकरांचा मुद्दा योग्य असाच आहे.

काही तपशिलांचा निर्देश ह्या कामातल्या संदर्भात करता येईल. जनता पक्षाच्या एक-दोन धोरणांच्या अंमलबजावणीकडे तळच्या कार्यकर्त्यांनी लक्ष देण्यासारखे आहे.

महाराष्ट्राच्या जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात एक कलम सांगते की, प्रत्येक गरजू गरीब कुटुंबाल किमान एक तरी रोजगार पुरवला जाईल. शहर व ग्रामीण भागातल्या कार्यकर्त्यांनी ताबडतोब कारवाई सुरू करावी. पाहणी कार्यक्रम हाती घेऊन नेमक्या किती कुटुंबांना कोणत्या अग्रक्रमानं किती रोजगार पुरवावा याची यादीच वॉर्डावॉर्डात, गावागावात तयार व्हायला हवी. मतदारांच्या यादी सारखीच ही यादी प्रत्येक क्षेत्रात तयार होऊ शकेल सोबतच रोजगारातली कोठली साधने उपलब्ध करता येतील याचा विचार. शहरात साबणउत्पादन, हातमागावरची उत्पादने, चामड्याच्या वस्तू यासारखे उद्योग स्वयंरोजगारासाठी उपलब्ध कसे होतील हे पाहता येईल. वरील उत्पादने घरेलू ! विकेंद्रित उत्पादन व्यवस्थेत आणण्याचे आश्वासन केंद्र सरकारने दिलेले आहे. या व अशा उत्पादनाबाबत ते शहर स्वयंपूर्ण होईल याकडे लक्ष देता येईल. उत्पादन व वितरणातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल. ह्या वितरणाच्या केंद्रावर, दुकानावर अन्य जीवनावश्यक वस्तूही येतील यासाठी धारीयांच्या आश्वासनांचा उपयोग करावा. या पद्धतीने उत्पादनाची किंमत अर्ध्याने कमी होते, रोजगार मोठ्या प्रमाणावर मिळतो आणि ग्राहकांचाही फायदा होतो. जाहिराती, प्रशासन वगैरे भानगडींवर होणारा अनावश्यक खर्च टळून किंमतीही अर्ध्याने खाली येतात. बहुराष्ट्रीय कंपनीचा लक्स साबण जाऊन त्या ठिकाणी तितक्याच गुणवत्तेचा जनता साबण अर्ध्या किंमतीत मिळावा. यासाठी फर्नांडिसांच्या उद्योगखात्याचा फायदा करून घेता येईल. असा माल खपवण्यासाठी ग्राहकांचे प्रबोधन आणि संघटन आवश्यक असते. जनता पक्षाला आपल्याजवळचे कार्यकर्ते या कामी लावता येतील. पुण्याच्या ग्राहक चळ-

वळीचा अनुभव इथे चांगलाच उपयोगी पडेल. ही काही उदाहरणे झाली. अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठीही मध्यम प्रतीचे उत्पादनतंत्र शोधून काढता येणे अशक्य नाही. कांग्रेसने आजवर हे केले नाही त्यामुळेच केंद्रीकरण, बेकारी, अनावश्यक खर्च, भ्रष्टाचार, भ्रष्ट संघटना, भ्रष्ट सरकार असे न तुटणारे दुष्टचक्र देशाच्या माथ्यावर फिरत राहिले.

ग्रामीण स्तरावरसुद्धा रोजगारनिर्मितीला नव्याने चालना देता येणे शक्य आहे. ग्रामायनसारख्या स्वयंसेवी संघटनांचा अनुभव त्यासाठी पायाभूत मानता येईल. सिंचनासाठी विहिरींवर भर देण्याच्या तंत्राचा विचार व्हावा. विहिरींद्वारे सिंचन केल्यास अधिक क्षेत्राला पाणी, कमी गुंतवणूक, गुंतवणुकीचे त्वरित फळ, अधिक रोजगार असे फायदे मिळू शकतात. चलनफुगवट्यासारखे ताण देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडणे विहिरींद्वारे केलेल्या सिंचनातून टळू शकेल. चीनसारख्या देशात यासंबंधी जसे प्रयोग झालेले आहेत तसेच भारतातही काही उत्साहवर्धक प्रयोग झालेले आहेत. त्यांचा उपयोग या कामी करून घेता येईल. ग्रामीण भागातही स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करण्यासाठी घरेलू उद्योग, मध्यम उत्पादनतंत्र यांचा शोध घेता येईल. जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात ते आश्वासन आहेच. निवडणुकी आटोपल्यावर तरी बाकी उचापत्या करीत बसण्यापेक्षा पुढला काळ या विविध कामांवर खर्च करण्याकडे जनता पार्टीने लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांना या कामाला लावावे.

अनेक दृष्टींनी हे महत्त्वाचे आहे. विकेंद्रित उत्पादनपद्धतीचा पुरस्कार जनता पक्ष करीत आहे. भांडवलशाही व साम्यवाद या दोहोंमधून या देशाला आवश्यक असा नवा मार्ग काढण्याची खटपट जनता पक्ष करीत आहे. हे एक धाडसाचे पाऊल आहे. राजकीय आर्थिक स्तरावर या विचारात अनेक गुंतागुंतींचा सामना करावा लागेल. हा विचार अजून तरी केवळ विचार किंवा दिशा अशाच स्वरूपाचा आहे. व्यवहाराच्या कसोटया लावल्याशिवाय त्यातून समूर्त तत्त्वज्ञान उभे राहणार नाही. हे मोठे आव्हानच आहे. असा मधला मार्ग निघू शकतो, यासाठी पक्षाला संघटनेच्या स्तरावर काम करावे लागेल. व्यवहारात येणाऱ्या अडचणींनुसार मग केंद्रसरकारच्या धोरणांना व्यवहारी स्वरूप येऊ शकते. देशाच्या उन्नतीचा मार्ग त्यातून खुला होईल. समजा जाहीरनाम्याच्या आश्वासनांची पूर्ती या संदर्भात जनता सरकारे करायला तयार झाली नाहीत तरी अशी सरकारे उघडी पडतील. त्याचे वाईट वाटायचे काही कारण नाही. पक्षसंघटनाबांधणीचाही हा चांगला मार्ग आहे. केवळ निवडणूक जिंकणारी यंत्रणा म्हणजे पक्ष ही या देशातील राजकीय पक्षांची प्रतिमा बनलेली आहे. अशी प्रतिमा बनविण्यास कांग्रेस प्रामुख्याने कारणीभूत आहे. जनता पक्षाने ही प्रतिमा पुसून काढायला पाहिजे. संघटनेशिवाय कायद्यातल्या तरतुदींना काहीच अर्थ उरत नाही. विधायक कामात कार्यकर्ता गुंतला की त्याला प्रश्न समजायला सोपे जाते. प्रश्नाचे सर्व पैलू समजल्यावर कार्यकर्ते अधिक जबाबदार आणि कार्यरत बनत जातात. विधायक कार्य आणि तुरुंग या या देशातील शाळाच आहेत. या शाळांतून कार्यकर्ता तयार झाल्यावर नेतृत्वही या कार्यकर्त्यांशी प्रतारणा करू शकत नाही. कार्यक्रमाला बांधलेली, सुजाण कार्यकर्त्यांचे मोहोळ असलेली जबाबदार अशी संघटना यातून निर्माण होऊ शकते. अशा संघटनेच्या अस्तित्वानेच लोकहितदक्ष सरकारे साकार होऊ शकतात.

जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीच्या चळवळीत संघर्षही होता आणि विधायक कार्यावर आधारित कार्यक्रमही होते. समांतर सरकारे उभी करण्यासाठी ही दृष्टी होतीच. एक जबाबदार व सुजाण जनसंघटन मुळात तयार झाले तरच लोकशाहीचा इमला त्यावर उभा राहू शकतो या विचारातूनच जे. पीं. नी ती चळवळ चालविली होती.

जनता पक्षाला हे सर्व कळत नाही असे कोणीच म्हणणार नाही. जे. पीं. च्या क्रांतीतूनच स्फूर्ती घेतलेली मंडळी जनता पक्षात मोठ्या प्रमाणावर व पदांवर आहेत; पण जे कळत आहे ते वळत नाही असे मात्र दिसत आहे. वळण्यासाठी आता विचार करायला हवा. कळणे आणि वळणे यामधील दरी संपवायला हवी. □

---

## येथे दलित पँथर्सने एक चांगली संघटना बांधली आहे : पृष्ठ १ वरून

माणूस भट्टीत कामाला असेल तर त्याची बायकोपोरं सर्व जण तेच काम करणार. बहुतेक मजूर हे मागास व बंजारी समाजातील आहेत. एक भट्टी १० कुटुंबांना पोसते. पिढिजात धंदा वगैरे कसा बनत जातो तर असा.

ह्याउलट भट्ट्यांच्या मालकवर्गाचे Composition आहे. एका माणसाच्या ३–४ भट्ट्या. मालकाची मुलं भट्ट्यांचे व्यवस्थापन बघणार, तर मजुरांवर देखरेख करणारे जमादार त्याच खानदानातील. सर्व मालकवर्ग हे वरच्या जातीतले. भट्ट्यांत काम करणे हा मजुरांचा परंपरागत उद्योग, तर भट्ट्यांवर मालकी करणे हा मालकांच्या पोरांचा पिढीजात धंदा! दोन्ही बाजूंनी विचार केला तर 'वर्ग संघर्ष अटळ' असल्याचे जाणवते.

भट्टा–मजुरांची पिळवणूक कशी काय होते हे जाणून घेण्यासाठी अनेक मजुरांना भेटलो. शिवाय भट्टा–मजदूर संघर्ष समितीचे ॲड. रमेश गुप्ता, वगैरेंनी जी माहिती दिली, ती ऐकल्यावर मजुरांची जी पिळवणूक होतीय तिला थांबवणार कोण? असा प्रश्न सारखा मनात घोळायला लागला. आता भट्टीत काम करणे म्हणजे खरं विस्तवाशी खेळण्याचाच प्रकार आहे. भूमिहीन म्हणून रोजगाराच्या शोधात शहरात आलेल्या लोकांना भट्टा मालिक हेरतात व मालकांचे दलाल (जे जमादार म्हणून ओळखले जातात) अशा माणसांच्याकडे जाऊन ५०० रुपये मोठ्या प्रेमाने देतात. मजूर ह्याला 'पेशगी' म्हणतात. ह्याचा साधा सरळ अर्थ असा की तुम्ही एकदा 'पेशगी' स्वीकारली की तुम्ही त्या जमादाराला अनुबंधित झाल्याचे समजण्यात येते व जमादार ह्या पेशगीवाल्यांचा मालक बनतो. म्हणजे भट्टामजूर हा सामान्यपणे (Bonded Labour) म्हणून मानला जातो. आता ह्यामधील एक सत्य असे की, एकदा मजुरांनी बांधून घेतले की त्यांना कामाच्या मोबदल्यात पैशाऐवजी ज्वारी व गव्हाचे पीठ दिले जाते. म्हणजे १ हजार विटा तयार करण्यासाठी ४ माणसांना मिळून १४ रु. चा भाव बांधून दिलेला. १ दिवसात हजार विटा होतात. म्हणजे १ मजुराच्या वाटयास ३ रु. येतात. आता ह्या ३ रुपयांपैकी २ रुपयांचा आटा किंवा धान्य दिले जाते. जेव्हा एखाद्याला 'ॲडवान्स'

पाहिजे असतो तेव्हा 'भट्टा मालिक' २५% रक्कम व ७५% धान्य देतो. ते सुद्धा १० दिवसांसाठी ३–४ किलो. त्याच्या मोबदल्यात कामगाराचे संपूर्ण कुटुंब भट्टीवर राबत असते. आता रक्कम हातात न पडल्यामुळे कामगार 'पेशगीची' रक्कम मालकाला वापस देऊ शकत नाही व गुलामीतच राहतो.

भट्ट्यांमध्ये काम करणाऱ्या मजदुरांची एकूण ३ प्रकारची वर्गवारी करण्यात येते. अर्थात ही मालकांनीच केली असल्याचे अनेकांनी सांगितले. प्रत्येक वर्गास वेगळे नाव देण्यात आलेले आहे. पथेरा, निकासीवाला आणि भराई असे तीन वर्ग.पथेरा म्हणजे काळ्या मातीचा चिखल करून साच्यातून विटा काढणाऱ्यांना 'पथेरा' म्हणतात, तर ह्या ओल्या विटा गरम भट्टीमध्ये ठेवून भाजून बाहेर काढणाऱ्यांना निकासीवाला तर गरम विटा नेऊन ठेवणाऱ्यांना 'भराई' म्हणून ओळखले जाते. अर्थात वर्गवारीप्रमाणे प्रत्येक हजार विटा तयार करणाऱ्या पथेरावाल्यांना १४ रु. निकामीवाल्यांना ५ रु. ३० पैसे तर भराईवाल्यांना ५ रु. २० पैसे असा भाव मिळतो. अर्थात पथेरावाल्यांनी मुळात १ दिवसातच जेमतेम ५०० विटा तयार केल्या तर पुढच्या दोघांना व पर्यायाने सर्वांना कमी पैसे मिळतात. तसे होऊ नये म्हणून सर्व कुटुंब ( पथेरावाल्यांचे ) राबविले जाते. म्हणजे जेमतेम एका माणसाचे पोट भरण्यापुरते पैसे मिळत असतानासुद्धा भट्टा मालिक एका नव्या आयडियाने आपली पिळवणूक चालूच ठेवतो. ह्या मालकाच्या आयडियाला संपूर्ण भट्टा उद्योगधंद्यात '*टामा और परिया*' म्हणून मान्यता मिळाली आहे. अडाणी कामगारांची पिळवणूक कशी होते ह्याचे घृणास्पद उदाहरण म्हणजे ही पद्धत असे म्हणावे लागेल. ह्यामध्ये ज्या तीन प्रक्रियांतून विटा तयार होतात त्या प्रत्येक प्रक्रियेच्या वेळेस काही तरी कारण दाखवून जमादार ४० विटा खराब निघाल्या म्हणून काढतो. शेवटी ४० विटा ह्या तर जमादाराच्या खास अधिकारात कापल्या जातात म्हणजे एकूण १५० विटा कमी लावल्या जातात. त्यामुळे १ हजार विटा जरी मजुरांनी तयार केल्या तरी फक्त ८५० विटांचे पैसे दिले जातात. ह्या पद्धतीचा खरा फटका पावसाळ्यात पथेरावाल्यांना बसतो. पावसाचा एखादा जरी थेंब विटेवर पडला तरी वीट भाजून निघाल्यावर त्यावर पांढरे डाग दिसतात. जमादार अशा विटा खराब म्हणून मजुराच्या नावावरून कमी करतो. ( ह्याबाबत एका विटांच्या मक्तेदारांनी सांगितले की, ह्या पांढऱ्या विटा अत्यंत उत्कृष्ट दर्जाच्या म्हणून बाजारात विकल्या जातात. ) म्हणजे पथेरावाल्यांनी हजार विटा जरी बांधल्या तरी त्याला ८०० विटांचेच पैसे मिळतात. पथेरावाल्यांच्या विटा कमी केल्या की आपोआपच निकासी व भराईवाल्यांना पैसे कमी मिळतात. म्हणजे १४ रुपयांच्या कामासाठी २०–२५ कुटुंबे राबविली जातात. शिवाय जमादार व मालकाची गुलामी असल्यामुळे इतर कामे करावीच लागतात. ७-८ माणसांच्या कुटुंबाला महिन्यात फक्त ५० ते ६० रुपये मिळावेत ! त्यातून पेशगीची रक्कम वापस करून 'मानेवरचे जू' भट्टा मजूर काढणार तरी कसे ? एकदा भट्टीत कामाला माणूस लागला की त्याच्या बायका-पोरांवर भट्टीचे व विटांचे इतके प्रेम बसते की भट्टी मजुरांना दूर जाऊ देत नाही व एके दिवशी भट्टीच मजुराला खाऊन टाकते ! श्रमिकांची हुकूमशाही व लेबर पार्लमेंटच्या गप्पा मारल्या जात आहेत. दुसऱ्यांच्या घरावर मजले बांधण्यासाठी विटा तयार करणाऱ्या मजुरांना त्याचे काय ? वेठबिगार रद्द करण्याच्या गप्पा मारणाऱ्यांनी जरा दिल्लीच्या बोटक्लबवर येऊन ह्या मजुरांची साधी विचारपूससुद्धा करू नये, ह्यासारखे दुर्दैव ते काय ?

स्वातंत्र्याबरोबरच भाकरी देणाऱ्या जनता पक्षाच्या राज्यात स्वातंत्र्य व भाकरी दोन्हीसाठी ३०० भट्ट्यांतील मजुरांनी १५ फेब्रुवारीपासून भट्ट्या थंड पाडल्या आहेत. १७५ रुपयांना हजार विटा बाजारात विकून १२५% नफा कमावणाऱ्या मालकांची सुडबुद्धी त्यामुळे अधिकच उफाळून आलीय. १९७५ मध्ये बी. पी. मौर्य ह्या काँग्रेसनेत्यांनी प्रथम ह्या मजुरांची संघटना बांधण्याचे ठरविले; पण मौर्यसाहेब राजकारणात इतके अडकले की त्यांनी भट्ट्यांना वाऱ्यावर सोडले. त्यानंतर लगेच पँथर्सवाल्यांनी आपले हातपाय पसरले. १९७५ मध्येच ( आणीबाणीपूर्वी ) संप झाला. २ रुपयांची वाढ देण्यात आली. ह्या संपानंतर सहाजिकच मालकांनी मजुरांना त्रास देण्यात सुरुवात केली.-मोठ्या मुश्किलीने बांधण्यात येत असलेल्या ह्या संघटनेला पुन्हा विस्कळित स्वरूप प्राप्त झाले. अत्याचार जास्त वाढल्यानंतर १५ फेब्रुवारी ७८ रोजी भट्टामजदूर संघर्ष समितीने संपाचे आवाहन केले. भराभर आजूबाजूच्या भट्ट्या विटेअभावी स्वत:ला जाळून घेऊ लागल्या.

संपाला प्रचंड प्रतिसाद मिळतोय हे पाहून भट्टा मालकांनी गुंडांच्या सहाय्याने मजुरांना धाक दाखवून कामाला जुंपण्याचा प्रयत्न सुरू केला. ह्यातूनच संघर्षाला सुरुवात झाली. ११ मार्चची घटना. शहाबादमधील दौलतपूरमधील टेकचंदच्या मालकीच्या भट्टीतील ही घटना. टेकचंदसाहेब नुकसान होतंय म्हणून ह्या ना त्या कारणाने मजुरांना कामावर आणण्यासाठी प्रयत्न करतात; पण काहीच उपयोग होत नाही. दुपारी ४ च्या दरम्यात २–३ मजुरांना टेकचंद व जमादार अडवतात व 'तुम्हाला पैसे पाहिजे असतील तर त्या कुत्र्यांच्या (म्हणजे पँथर्स) नादी लागू नका, कामावर चला !' असे सांगतात. पण मजूर ऐकत नाहीत. टेकचंदच्या काठ्या उगारल्या जातात व मजुरांच्या अंगावर पडतात. ह्यांमध्ये पन्नालाल नावाचा २२ वर्षांचा पोरगा धीराने काठ्या अडवितो. त्याला बेदम मारले जाते. सर्व मजूर घाबरून पँथर्सच्या ऑफिसकडे पळायला लागतात. आपल्या पोराला मारताहेत हे पाहून त्याची आई, गेंदादेवी पोराला वाचविण्यासाठी येते. तेवढ्यात टेकचंद मालकाचे गुंड दगड मारायला सुरुवात करतात. अेक मोठा दगड ६५ वर्षे वयाच्या गेंदादेवीच्या छातीवर बसतो. बाई कोसळते व ४० वर्षे मातीच्या विटा बनविण्यासाठी आयुष्य झिजविलेल्या भट्टीजवळ मरण पावते. पँथरचे काही कार्यकर्ते जवळच्या पोलिसस्टेशनला फोन करतात. पोलिसइन्स्पेक्टर सुद्धा अेका भट्टीचा मालक असल्यामुळे गुन्हा नोंदवून घेण्यास नकार दिला जातो. शेवटी कंट्रोलरूमला कळविले जाते. दरम्यान मालक टेकचंद व पोलिस 'डेडबॉडी' जाळून टाका म्हणून मागे लागतात. शेवटी पँथरचे बाबूराव फकीरडे ह्यांची परवानगी असल्याशिवाय आम्ही तुम्हाला हात लावू देणार नाही असे सांगितल्यावर पोलिस परततात. शेवटी पोलिसांनी गुंडांना पकडावे म्हणून गेंदादेवीचे प्रेत बोटक्लबच्या हिरवळीवर आणले जाते. दोन दिवस प्रेताचे प्रदर्शन दिल्लीकरांना घडविले जाते. बोटक्लबच्या हिरवळीवर प्रेमचाळे करणाऱ्या व बोटिंग करणाऱ्यांना त्याचे काहीच वाटत नाही. पोलिस सुद्धा गुंडांची

बाजू घेऊन ही 'मेड अप स्टोरी' असल्याचे सांगतात. तर गेंदादेवीचा मुलगा पन्नालाल डोळ्यांत पाणी आणून आपल्या जखमा दाखवीत मला आपली कहाणी सांगत असतो. बसंती व चंदा ह्या चाळिशीतील दोन स्त्रिया आपला चेहरा झाकून कहाणी सांगतात व मालक टेकचंदच्या दगडांनी केलेल्या जखमा दाखवतात. कैलास भट्टयात १०-१२ मजुरांना ठोकले जाते. अेकाला बाजूच्या शेतात चक्क दाबले जाते. ७-८ जण आजही इंदापूरच्या हॉस्पिटलमध्ये अॅडमिट आहेत असे देवीलाल नावाचा अेक मजूर सांगत असतो. २७ फेब्रुवारीची अजून अेक घटना–पालयच्या रूपचंद भट्ट्यात अेक चिमणी (विस्तवाची) अेका मजुराच्या अंगावर पडते. अेरव्ही १०-१५ जणांना न उचलणारी ही चिमणी २-३ मजदूर बाजूला करीपर्यंत त्या मजुराचा देह जळलेला असतो. भवनपूरच्या भट्ट्यात विटांच्या ओझ्याखाली अेका मजुराचे प्रेत सापडते. अशा किती तरी घटना. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या. १५ तारखेपासून घडायला लागल्या.

उत्तर व दक्षिण दिल्लीत प्रामुख्याने असणाऱ्या ह्या भट्ट्यातील काही चालक शेवटी माघार घेतात. सतबडी, धीटीरनी, किशनगढ, समालका, खानपूर येथील सर्व भट्टा मालकांची बैठक होऊन पँथर्सच्या नेत्यांशी व भट्टा मजदूर संघर्ष समितीशी बोलणी करायला सुरुवात होते. सर्वच भट्ट्यांतील कामगारांना पेशगीतून व पर्यायाने गुलामीतून मुक्त करावे अशी मागणी प्रथम मजुरांतर्फे पुढे येते. पथेरावाल्यांना १७ रुपये. निकासीवाल्यांना ६ रु. १० पैसे, भराईवाल्यांना ६ रुपये, जलाईवाल्यांना २४० रुपये महिना अशा वेतनाबाबतच्या मागण्यांना मालक मान्यता देतात. ढाचा और पढीचा ही पद्धत बंद करून संपूर्ण १ हजार विटांची रक्कम देण्यात येईल असे सुद्धा मालक मान्य करतो. ३ हजार मजुरांचा संप संपतो.

परंतु ह्या भट्ट्यांव्यतिरिक्त इतर मालक ह्या मागण्या मान्य करीत नाहीत असे लक्षात येताच सर्व आजूबाजूच्या भट्ट्यांतील मजूर पुन्हा सामान घेऊन बोटक्लबवर येतात. पँथरवाले कंबोडियन कम्युनिझमच्या पद्धतीवर सर्वांचे दालरोटीचे वाटप करतात. सरकारकडे मागणी केली जाते. श्रममंत्री अत्यंत थंडपणे सांगतात की, ह्या प्रश्न माझ्या अधिकारात नाही हो! तुम्ही उत्तर प्रदेश सरकारकडे जायला पाहिजे! पँथर व मजूर चिडतात. दुसऱ्या दिवशी जेवणखाण मिळावे म्हणून संसदेच्या समोर बंदीहुकूम मोडून ४ हजार मजदूर सत्याग्रह करतात. ४–५ दिवसांची काळजी सुटते. पुन्हा बोटक्लबवर १ हजार कुटुंबे संसार थाटतात. बोटीतून फिरायला पाणी आहे; पण आम्हाला पाणी नाही असा काही बायका ओरडा करतात; पण आपल्या बायकांच्या कौतुकात मग्न असणाऱ्या दिल्लीवाल्यांना ह्याचे सोयरसुतक वाटत नाही. उलटपक्षी बोटक्लबचे मैदान 'घाण' होत असल्याची तक्रार अनेकजण करतात.

आता महिना होत आलाय संप सुरू होऊन. सरकार प्रश्न सोडवायला तयार नसल्यावर वाटाघाटीला मध्यस्थी कोण करणार? ह्या प्रश्न दिल्लीच्या पँथरवाल्यांना एवढ्या संघर्षानंतर सुद्धा पडत नाही. ह्याचे खरे तर आश्चर्य वाटले पाहिजे. पण पँथरचा अध्यक्ष फकीरडे ह्याचा आत्मविश्वास व जिद्द इतकी दांडगी की, आमच्या ताकदीवर आम्ही भट्टा मजुरांना स्वातंत्र्य मिळवून देऊ! मजुरांचा पँथरवाल्यांवर इतका विश्वास की वकीलसाहेब (श्री. फकीरडे) जेव्हा सांगितील तेव्हा आम्ही कामावर जाऊ' असे अनेक मजूर जेव्हा सांगायला लागले तेव्हा मात्र खरोखरच पँथरच्याविषयी चांगले विचार मनात आले. भट्टीतील असंख्य मजूर स्वतंत्र होतील किंवा नाही हा प्रश्न पुढचा आहे. त्यांचे वेतन वाढले नाही तरी पँथरनी जो संघर्ष छेडलाय तो महत्त्वाचा व पँथरच्या राजकीय परिपक्वतेच्या दृष्टीने शुभसूचक मानला जायला हरकत नाही.

राष्ट्र सेवादलाच्या शाखांवर जाऊन 'समाजवादी साथी गाती' असे म्हणणाऱ्या किंवा आराम पक्ष–दक्ष करणाऱ्या संस्कृतिवाल्यांनी किंवा साहित्यसंमेलनात गोंधळ उडवून देणाऱ्या पुण्या–मुंबईतील बोलघेवड्या क्रांतिकारकांनी व महाराष्ट्र दलित पँथरनी भट्टा मजदूर संघर्षातून काही तरी शिकलेच पाहिजे. अन्यथा विद्यापीठाचे नाव बदला म्हणून आपली शक्ती आम्ही किती दिवस वाया घालवणार आहोत? भट्टा मजूर मुक्त होतील असा विश्वास आज मला तरी वाटत आहे. ☐

[ जागेअभावी सदाशिव पेठकर यांची संकलित दिल्ली वार्तापत्रे या अंकात जाऊ शकली नाहीत. पुढील अंकापासून ती सुरू होतील. –संपादक ]